शीलं परं भूषणम् ।

नीतिपर व बोधप्रद पुस्तकमाला.

पुष्प दुसरें.

नीतिमार्गप्रदीप

पुस्तक दुसरें.

लेखक

रंगो रामचंद्र अष्टेकर

किंमत बारा आणे.

C 9

नीतिपर व बोधप्रद पुस्तकमाला.

पुष्प दुसरें

नीतिमार्ग प्रदीप पुस्तक दुसरें,

रंगो रामचंद्र अष्टेकर यांनीं लिहिलें.

आवृत्ति पहिली.

प्रति एक हजार.

पुणें येथें " चित्रशाळा " छापखान्यांत छापिलें.

सन १९२१

किंमत बारा आणे.

शंकर नरहर जोशी यांनीं पुणें, ' चित्रशाळा '
छापखान्यांत (१०२६ सदाशिव पेठ)
येथें छापिलें.

रंगो रामचंद्र अष्टेकर यांनीं मु० रहिमतपूर, ता० कोरेगांव.
जि० सातारा येथें प्रसिद्ध केलें.

प्रस्तावना.

याच लेखकानें लिहिलेलें "नीतिमार्ग प्रदीप पुस्तक पाहिलें" याची जी प्रस्तावना आहे तीच या पुस्तकास लागू आहे. सबब तिचाच सारांश खालीं दिला आहे.

" मनुष्य जन्मतः चांगला किंवा वाईट असत नाहीं. त्या वेळीं ईश्वरानें मनुष्याच्या मनांत चांगला अगर वाईट यांपैकीं कोणताही विचार ठेविलेला नसतो. परंतु मनुष्य जसजसा मोठा होत जातो, तसतसे चांगले व वाईट असे दोन्ही परस्परविरोधी विचार त्याच्या मनांत उत्पन्न होऊं लागतात, व क्रमाक्रमानें त्याच्याबरोबर वरच्यांपैकीं एक विचार वाढत जाऊन दुसऱ्या विचारापेक्षां प्रबल होतो. या दोन विचारांपैकीं आपल्या अर्भकांबरोबर कोणचा विचार वाढूं द्यावा हा निर्णय आईबापांनीं करावयाचा असतो. कोणत्याही आईबापाला आपलें लेंकरूं वाईट निपजावें असें वाटत नसतें, ही गोष्ट खरी आहे; तथापि पुष्कळ आईबाप आपल्या मुलांच्या वयाबरोबर कोणचा विचार वाढतो आहे, हें मुळींच पहात नाहींत. वाईट विचार जागच्या जागीं खुडून टाकिले असतां ते पुढें प्रबल होण्याची भीति नसते. ह्या विचारांची वाढ भोंवतालच्या परिस्थितीवरही अवलंबून असते. तेव्हां वाईट विचारांचें बीजारोपण मुलांच्या मनांत होऊं न देण्याकरितां आईबापांनीं व शिक्षकांनीं भोंवतालच्या परिस्थितीकडे अवश्य लक्ष दिलें पाहिजे व त्यांना भल्याच्या संगतीला ठेविलें पाहिजे. कारण संगति व शिक्षण हीं जशीं असतील त्याप्रमाणें मनुष्याच्या अंगीं चांगुलपणा अथवा वाईटपणा येतो.

संगति व शिक्षण यांशिवाय मनुष्य चांगला किंवा वाईट होण्यास तिसरें कारण पुस्तकें होय. लहान मुलांनीं वाईट पुस्तकें वाचल्यास त्यांचीं मनें खात्रीनें बिघडतात. यासाठीं मुलांच्या

हातांत चांगलीं पुस्तकें देण्याची खबरदारी पालक व शिक्षक यांनीं घेतली पाहिजे. उपदेश व उदाहरणें यांच्या योगानें मुलांचे वर्तनावर चांगला परिणाम घडतो, व त्या योगानें तीं चांगलीं नीतिमान् होतात असा नित्याचा अनुभव आहे, म्हणून अशा तऱ्हेचीं जितकीं पुस्तकें विद्यार्थ्यांच्या हातांत पडतील तितकें फार चांगलें. नैतिकशिक्षण देणारीं जितकीं पुस्तकें निघतील तितकीं आज आपणांस हवींच. अशा पुस्तकांच्या वाचनानें तरुणांचें शील उत्कृष्ट बनतें. पाश्चात्य देशांत अशीं शेंकडों पुस्तकें नेहमीं पाश्चात्य भाषेंत बाहेर पडतात. अशा पुस्तकांची आपल्या मराठी भाषेंत बरीच उणीव भासते ती अंशतः तरी दूर व्हावी म्हणून हीं " नीतिपर व बोधप्रद पुस्तक माला " सुरू केलेली आहे. प्रत्येक पुस्तक सुमारें सव्वाशें पानांचें छापण्याचा विचार केलेला आहे. यापुढील पुस्तकें बाहेर पडणें केवळ लोकाश्रय व राजाश्रय यांवर अवलंबून आहे. यश देणार ईश्वर समर्थ आहे."

सध्यां छपाईचे दर इतके भयंकर वाढले आहेत कीं, याच पुस्तकाएवढ्या, हजारों प्रति थोडक्या वेळांत खपणाऱ्या व कोऱ्या रोजनिशांचीही किंमत पधरा आणेपर्यंत ठेवणें भाग पडलें आहे. त्या मानानें या पुस्तकाची बारा आणे किंमत म्हणजे केवळ जेमतेम खर्च भागण्यापुरतीच ठेविली आहे असें आढळून येईल. याचें कारण पुस्तककर्त्यावर लक्ष्मीची कृपा आहे हें नव्हे; तर प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातीं असलीं पुस्तकें पडावींत व त्यांचें शील उत्कृष्ट बनावें हाच ह्या लेखकाचा प्रधान हेतु आहे, हें होय.

मु० रहिमतपूर ता० कोरेगांव
जि० सातारा
ता० १ फे० स० १९२१

रंगो रामचंद्र अष्टेकर.

नीतिमार्गप्रदीप.

पुस्तक दुसरें

अनुक्रमणिका

शीलं परं भूषणम् ॥

नीतिमार्गप्रदीप

पुस्तक दुसरें.

(१) शील

प्रश्न—कोऽलंकारः म्हणजे अलंकार कोणचा ?
उत्तर—शीलं " शील हाच अलंकार आहे.

व्यवहारांत रुपें, सोनें, मोतीं व रत्नें यांच्या विशेष प्रकारच्या व शरीराच्या निरनिराळ्या भागांत चांगल्या रीतीनें बसतील अशा रीतीनें तयार केलेल्या वस्तूंना " अलंकार " म्हणण्याचा परिपाठ आहे. व साधारण लोक त्यालाच महत्त्व देतात.

परंतु असल्या बाह्य भूषणांनीं शरीर बाहेरून जरी किती चांगलें दिसलें तरी त्याच्या आंत किती तरी दुष्कर्म रूपी घाण व कलंक सांठलेला असण्याचा फार संभव आहे. यास्तव प्रत्येक पुरुष, स्त्री व मूल यांचा खरा अलंकार " शील " हेंच आहे. शील म्हणजे शुद्ध वर्तन व करारीपणा. नल, हरिश्चंद्र, युधिष्ठिर, सीता व दमयंती इत्यादि थोर पुरुष व स्त्रिया बरेच दिवस वरील बाह्य

अलंकारांनीं रहित होत्या. परंतु त्यांचा शील हा अलंकार नेहमीं त्यांच्यापाशीं असल्यामुळें किंवा तो इतर अलंकारां-प्रमाणें शत्रूंना जिंकून घेतां येण्याजोगा नसल्यामुळें ते त्या अलंकारानें रहित असे कधींच झाले नाहींत. व त्यामुळेंच त्यांचें नांव अजरामर झालें आहे. नाहींतर जगाच्या आरंभापासून आजपर्यंत, पायाच्या नखापासून डोक्याच्या केंसाच्या अग्रापर्यंत दागिन्यांनीं व उंची वस्त्रांनीं नटणारे असंख्य पुरुष व स्त्रिया मरून गेल्या असतील. परंतु त्यांचीं नांवेंही आम्हांला माहीत नाहींत. तेव्हां अलं-कारापेक्षां शील या अलौकिक अलंकाराचें महत्त्व किती आहे याचा विचार प्रत्येकानें करावा. शरीराला भोंकें पाडून त्यांत घालावयाचे व शरीराला भारभूत होऊन दुस-ऱ्यांचे नेत्रांना सुंदर भासणारे अलंकार संपादन करण्यापूर्वी विचारी स्त्री, पुरुष व मुलें यांनीं मनाला व शरीराला भारभूत म्हणजे जड न होणारा, व आपल्या मनाला आल्हादरूपानें पदोपदीं फलद्रूप होणारा शील हा अलं-कार अगोदर संपादन करावा.

कारण सर्व सृष्टीचे सुखास शील ही अवश्यक गोष्ट आहे. जगांतील सुख वाढविण्यास व दुःख कमी करण्यास अत्यंत उपयोगी अशी मनुष्याच्या हातची गोष्ट शीला-शिवाय दुसरी कोणतीही नाहीं. कारण मानवी कृतीमुळें जें दुःख होतें, तें मुख्यतः स्वार्थीपणाच्या व अन्यायाच्या कृतींनीं होतें. मानवी दुःखाच्या कारणाबद्दल जर थोडा विचार केला तर आपणांस असें आढळून येईल कीं, मनुष्याचें दुःशील हेंच सदर दुःखाचें कारण आहे. जगांत

प्रामाणिकपणा, सत्य व न्याय हीं जर वाढतील तर जगांतील दुःख नाहींसें होऊन सुखाची समृद्धि होईल. मनुष्यजातीचें सुख वाढण्यास मनुष्याधीन गोष्टींमध्यें शीलाइतकी अवश्यक गोष्ट दुसरी कोणतीही नाहीं.

आपलें आयुष्य चांगल्या किंवा वाईट रीतीनें जाणें हें बहुतेक अंशीं आपल्यावरच अवलंबून आहे. आपण जर सद्वर्तनानें वागलों तर आपलें आयुष्य खात्रीनें सुखांत जाईल, व आपण अनीतीनें वागलों तर तें दुःखांत जाईल. आपल्या सद्वर्तनानें आपण आपलेंच जीवित्व सुखी करतों असें नाहीं, तर दुसऱ्याचें जीवित्वही सुखी करण्यास आपण मदत करीत असतों. आनंदी माणसाच्या सहवासांत असलेलीं सर्वच मनुष्यें आनंदी व उत्साही असतात. कारण मनुष्यप्राणी हा अनुकरणप्रिय आहे. व तो आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांचें व स्नेहीसोबती यांचें अनुकरण करीत असतो. मुलांच्या अंगीं तर हा गुण विशेष असतो. जसें आपण असूं तसेंच दुसरे आपल्या सहवासांतील असतील, म्हणजे आपल्या स्वभावाचें प्रतिबिंब आपल्या सहवासांतील दुसऱ्या मनुष्यांत पहावयास सांपडेल.

मनुष्याच्या अंतःकरणांत कांहीं उच्च कांहीं नीच व कांहीं या दोन्ही विशेषणांस अपात्र अशा मनोवृत्ति उत्पन्न होत असतात. त्यांत उच्च मनोवृत्तीचा परिपोष व नीच मनोवृत्तींचें निर्दालन हीं योग्य प्रसंगीं झालीं नाहींत तर, चांगलीं व वाईट झाडें अव्यवस्थितपणें वाढलेल्या बागेची स्थिति मनाला प्राप्त होते. अशा बागेंत बहुधा वाईट

झाडें व वेली माजतात व आपल्या पसरण्यानें व जोमानें चांगल्या झाडांची वाढ खुंटवितात; त्याचप्रमाणें नीच वृत्ति उच्च वृत्तींना दडपून टाकतात. मनोवृत्तींची शक्ति अचाट आहे. या मनोवृत्तींची योग्य जोपासना करून शीलसंवर्धनाकडे उपयोग करून घेणें हें प्रत्येकाचें आद्य कर्तव्य आहे. कारण सर्व साहित्य असून एक मीठ नसेल तर सर्व अन्न बेचव लागतें. त्याप्रमाणें अंगीं बुद्धिमत्ता, विद्वत्ता व संपत्ति वगैरे सर्व गोष्टींची अनुकूलता असून जर शील चांगलें नसेल तर सर्व गुण निरुपयोगी होतात. नानाविध चमत्कारांनीं पूर्ण असणाऱ्या सृष्टीचा उपयोग जसा आंधळ्या मनुष्यास करून घेतां येत नाहीं, तसा शीलहीन मनुष्यास त्याच्या अंगच्या गुणांचा उपयोग व्हावा तसा होत नाहीं.

श्रीमान् होण्याचा प्रयत्न चांगल्या रीतीनें होत असेल तर मनुष्यानें अवश्य करावा. तरी सर्वांसच तो साध्य होईल अशी त्याच्याविषयीं खात्री नसते. परंतु, तेंच प्रत्येक मनुष्यानें असें जर म्हटलें कीं, माझें शील मी उत्तम प्रकारचें ठेवीन, अर्थात् माझें आचरण मी निष्कलंक ठेवीन, तर हें बरीक त्यास खचित साध्य होणार आहे. जी थोडबिहुत आपल्यास ईश्वरानें बुद्धि दिली आहे तिचा चांगल्या कामाकडेच उपयोग करूं म्हटल्यास खचित करतां यणारे आहे. तसेंच सत्य, नीति व प्रामाणिकपणा ह्यांचें लहानसान गोष्टींत देखील सदैव अवलंबन शक्य आहे. करितां तें सर्वांनीं अवश्य करावें.

ज्याच्या अंगीं सद्गुण असतात व ज्याच्या हातून सदाचार घडतो, तोच जिवंत आहे म्हणावयाचा.— सद्गुण आणि सदाचार हीं ज्याच्या ठायीं नाहींत, त्याचें जीवित निष्फळ होय. सुभाषित

———

भाग्याला सुजनत्व भूषण असे, कीं मौन शौर्यास तें ॥
ज्ञानाला शम, त्या श्रुतास विनय, द्रव्यास दातृत्व तें ॥
अक्रोधत्व तपा, क्षमा प्रभुपणा, धर्मास निर्दंभता ॥
या सर्वांसहि मुख्य भूषण पहा सच्छील हें तत्वतां ॥ १

वामन पंडित

———

उत्तम पाठ

—:o:—

सातार प्रांतीं, कृष्णा नदीच्या किनाऱ्यास एक गांव आहे. तेथें एका विद्वानापाशीं कांहीं विद्यार्थी विद्याभ्यास करीत असत. एक दिवस सुटी होती, त्या दिवशीं, गोविंदा नांवाचा एक विद्यार्थी गुरुजींबरोबर सहल करावयास निघाला. ते गुरुजी मोठे प्रेमळ असून विद्यार्थ्यांशीं फार ममतेनें व सलगीनें वागत. यावरून सर्व लोक त्यांस विद्यार्थ्यांचा मित्र असें म्हणत. जातां जातां त्यांना एक खादीचें जाडेंभरडें फाटकें धोतर व तसलीच एक बंडी वाटेवर पडलेली दिसली. जवळच एका शेतांत एक गरीब मजूर, आपलें त्या दिवसाचें काम संपवून घराकडे

जाण्याचे बेतांत होता. त्याचींच तीं वस्त्रें असावींत असें त्यांना वाटलें.

तेव्हां तो विद्यार्थी गुरुजींकडे वळून म्हणाला "गुरुजी, आपण या म्हाताऱ्या मनुष्याची थोडीशी मौज करूं या का ? याचीं हीं वस्त्रें दडवून ठेवून, तीं न सांपडल्यामुळें याची कशी तारंबळ उडते ती पाहणेसाठीं आपण या आम्रवृक्षाच्या आड दडून बसूं." यावर गुरुजी म्हणाले, "बाळा, गरिबांची अशा प्रकारें कुचेष्टा करून आपली करमणूक कधींही करून घेऊं नये. तूं श्रीमान् आहेस. तेव्हां या गरीब मनुष्याशीं अन्य तऱ्हेनें वागून तुला आपलें मन रमवितां येईल. या मनुष्याच्या धोतरांत एक, व बंडींत एक अशा दोन मोहरा घालून ठेव. व नंतर आपण या आम्रवृक्षाच्या आड दडून बसूं, व त्या वृद्ध मनुष्यास काय वाटतें तें पाहूं. गोविंदानें त्याप्रमाणें केलें, व ते दोघेही जवळच असलेल्या आंब्याच्या झाडाच्या आड पुढें काय होतें तें पाहण्यासाठीं दडले.

इतक्यांत तो गरीब मनुष्य आपलें काम संपवून तें शेत ओलांडून आपल्या पांघरुणांपाशीं आला. अंगांत घालण्याकरितां त्यानें बंडी वर उचलली. तों त्यांतून एक मोहर पटकन् खालीं पडली. काय पडलें तें पाहण्यासाठीं तो चटकन् खालीं वांकला. तों त्यास ती मोहर दिसली. ती पाहून तो अगदीं आश्चर्यचकित झाला. त्यानें ती न्याहाळून पाहिली. पुनः पुनः तिला खालींवर करून तिच्याकडे आश्चर्यानें पाहूं लागला. नंतर त्यानें आसपास पाहिलें, पण कोणीही त्यास दिसलें नाहीं. नंतर त्यानें

ती बंडी आंगांत अडकविली व खिशांत ती मोहर जपून ठेविली. नंतर धोतर उचलून वर घेतलें. तों त्यांतून दुसरी मोहर खालीं पडली. ती पाहून तर तो आश्चर्यानें अगदीं थक्कच होऊन गेला. त्यास मोठा गहिंवर आला. त्यानें गुडघे टेंकले व आकाशाकडे दृष्टि लावून परमेश्वराची मोठ्या प्रेमानें प्रार्थना केली. तो म्हणाला "देवा, तूं किती दयाळू आहेस ! माझी बायको आणि मुलें आजारी असून तीं उपासानें मरत आहेत, असें पाहून तूंच ही देणगी कोणा कृपाळू, दयाशील महात्म्याच्या हातून मला न कळत मजकडे पाठविलीस, असें मी समजतों. तुझ्या या योग्य वेळीं दिलेल्या देणगीनें माझीं बायकामुलें दुखण्यांतून व उपासमारींतून आतां खास वांचतील, यांत संशय नाहीं.

हें पाहून गोविंदाचा कंठ अगदीं दाटून आला. त्याचे डोळे प्रेमाश्रूनें अगदीं भरून गेले. तेव्हां गुरुजी त्यास म्हणाले "काय गोविंदा, त्या गरीब मनुष्याचीं वस्त्रें दडवून ठेऊन तुला जी मौज वाटली असती, त्यापेक्षां हलींचा आनंद जास्त नाहीं काय ?" यावर गोविंदानें उत्तर दिलें, "गुरुजी, आपण आज मला हा नीतीचा उत्तम पाठ दिला. हा मी केव्हांही विसरणार नाहीं. 'घेण्यापेक्षां देण्यांत जास्त सौख्य आहे' असें आपण नेहमीं आम्हांस शिकवितां, पण त्या शब्दांचें रहस्य आजच मला बरोबर समजलें."

सुखी कोण ?

प्राचीन काळीं ग्रीस देशांत साक्रेतीस या नांवाचा एक मोठा तत्ववेत्ता व साधु पुरुष होऊन गेला. एकदां, एका गृहस्थानें त्यास असा प्रश्न केला कीं, इराणचा बादशहा अर्चिलास हा आजकाल सर्वांकडून महा भाग्यवान् समजला जातो, त्याला तुम्ही सुखी समजत नाहीं काय ? साक्रेतिसानें उत्तर दिलें, मला ठाऊक नाहीं. कारण मीं त्याच्याशीं कधीं संभाषण केलें नाहीं. गृहस्थ म्हणाला, तर मग इराणच्या बादशहास देखील तुम्हीं सुखी मानीत नाहीं काय ? साक्रेतिसानें उत्तर केलें, जर मला तो किती सज्जन आहे, किंवा विद्वान् आहे हें माहीत नाहीं; तर मीं त्यास सुखी कसें मानावें ? गृहस्थ म्हणाला, तर मग सुख या गुणांनीं प्राप्त होतें असें तुमचें म्हणणें ? साक्रेतिस म्हणाला " होय; सज्जन हे सुखी व दुर्जन दुःखी असें मी समजतों. ?" गृहस्थ म्हणाला "तर मग अर्चिलस दुःखी काय ?" "होय, जर तो सात्विक व शीलवान नसेल तर तो दुःखीच समजला पाहिजे," असें साक्रेतिसानें उत्तर केलें.

(२). बंधुभगिनीप्रेम

श्लोक

मातेच्या उदरीं समग्र असती एकाच जे जन्मले।
तैसें बाळपणांत एकवटुनि एके स्थळीं खेळले॥
वाढी मोदभरें सदैव जननी तें अन्न जे जेवले।
त्यांनीं तें विसरून वाद करितां कैसें दिसे चांगलें॥ १
एकाला दिधला जरी जननिनें खाऊ कधीं थोडका।
सर्वांना दिधल्याविणें तरि कुणीं लावूं नये त्या धका॥
ज्यांनीं बालपणीं असें जननिला स्वप्रेम हो दाविलें॥
त्यांनीं तें विसरून वाद करितां कैसें दिसे चांगलें॥२॥

(उपदेशमालाकार).

भावंडांनीं परस्परांशीं प्रेमानें वागण्यांत फार सुख व आनंद आहे, म्हणून त्यांनीं एकमेकांवर प्रीति करावी. एकमेकांना सुख देण्याचा प्रयत्न करावा. त्यांनीं आपलपोटेपणानें स्वतःच्याच सुखाची इच्छा करूं नये. आपणाप्रमाणें दुसऱ्या भावंडांनाही सुख झालें पाहिजे असें नेहमीं मनांत वागवावें. परस्परांविषयीं खरें प्रेम असणें, एकमेकांच्या हिताविषयीं कळकळ वाटणें, एकमेकांच्या सुखदुःखाचे भागीदार होणें, संकटांत परस्परांस मदत करणें व प्रसंगीं त्यांना योग्य सल्लामसलत देणें हीं बंधुत्वाचीं लक्षणें होत.

आईबापांचें सर्व मुलांवर सारखें प्रेम असतें. त्यांना वाटतें आपल्या सर्व लेंकरांनीं एकमेकांवर प्रीति करावी व

एकमेकांशीं गोडीगुलाबीनें वागावें; व त्यांना असें वाटणें साहजिक आहे. कारण तुम्ही सर्व भावंडें त्यांच्याच कृपाछत्राखालीं नेहमीं जेवतां, बसतां, खेळतां, व मौज मारतां. तंटा बखेडा न करितां सर्व मुलें आनंदित असलीं म्हणजे आईबापांना फार सुख व समाधान वाटतें. त्यांनीं भावंडांना भांडतांना पाहिलें म्हणजे त्यांना फार दुःख होतें. म्हणून तुम्ही आपल्या भावंडांवर प्रीति करा. त्यांना त्रासवूं नका व वाईटसाईट नांवें ठेवून हिणवूं नका. त्यांना मारण्याकरितां आपला हात कधींही उगारूं नका. तीं दुखणाईत किंवा संकटांत पडलीं तर त्यांचें समाधान करण्यास तुम्ही रात्रंदिवस झटा. तुम्हांस हवी अशी वस्तु त्यांजपाशीं असेल तर ती त्यांच्यापासून हिसकावून व रागें भरून घेऊं नका. त्यांना आवडणारी वस्तु तुम्हांजवळ असल्यास ती त्यांना द्या. जेव्हां तुम्हां-भावंडांत क्षुल्लक बाबतींत तंटे उत्पन्न होतात तेव्हां ते तंटे तुम्ही आपआपसांत समजुतीनें तोडीत जा. ते विनाकारण वडील माणसांपर्यंत नेऊन त्यांना त्रास देणें केव्हांही चांगलें नाहीं.

सर्व मुलांची बुद्धि व प्रकृति सारखी नसते. म्हणून ज्याच्या त्याच्या प्रकृतिमानाप्रमाणें वडील माणसें त्यांना शिक्षण देतात, व प्रसंगविशेषीं त्यांची राहण्याची जेवणा-खाण्याची व कपड्यालत्त्याची निराळी योजना करतात. एवढ्यावरून मुलांनीं रागावून आईबापांविषयीं गैरसमज होऊं देऊं नये. म्हणजे आईबाप अमक्यावर अधिक प्रेम करतात व आपल्यावर कमी प्रेम करतात असें मनांत येऊं

देऊं नये. व ज्याच्याविषयीं ते अधिक काळजी दाखवितात त्याविषयीं ते मनांत हेवा व मत्सर उत्पन्न होऊं देऊं नये. कारण आईबापांच्या मनांत सर्व मुलांचें सारखेंच हित व कल्याण व्हावें असें असतें.

भावांनीं बहिणींशीं तर नेहमीं विशेष प्रेमळपणानें वागावें. कारण मुली ह्या मुलांपेक्षां अधिक प्रेमळ व कोमल स्वभावाच्या असतात. त्यांना स्वभावतः दांडगाई व उद्धटपणा अगदीं आवडत नाहीं. त्यांना कोणीं टाकून बोललें, अगर त्यांशीं कोणीं कठोर भाषण केलें म्हणजे तें त्यांना फार झोंबतें. त्या फार थोड्या दिवसांच्या आपल्या सोबती असतात. कारण मुली ह्या बोलूनचालून परक्याचें धन आहे, त्या चार दिवस आपल्या येथें मुक्कामास आलेल्या असतात. त्या लग्न होऊन एकदां परक्याच्या घरीं गेल्या म्हणजे त्यांचें दर्शन होणेंसुद्धां दुर्लभ होतें. म्हणून जेवढा त्यांचा सहवास घडेल तेवढ्या वेळांत त्यांशीं प्रेमळपणानें वागून त्यांना सुख देण्यास झटावें. आईबापांच्या पश्चात् त्यांचा नेहमीं समाचार घेत जावा.

भावंडांवर प्रीति करण्यामुळें जें सुख उत्पन्न होतें तें फार उत्तम असतें. संकटप्रसंगीं या सुखासारखीं उद्वेग हरण करणारीं दुसरीं फारच थोडीं सुखें असतील. बंधुभगिनीप्रेम हा सद्गुण फार आनंदप्रद आहे. यापासून दुसरा कोणताही प्रत्यक्ष फायदा झाला नाहीं तरी आपण आपल्या भावंडांवर प्रीति करतों या विचारानें मनास जें समाधान वाटतें तें सुद्धां कांहीं कमी नाहीं.

बंधूविषयीं कोणत्याही गोष्टी संबंधीं कपट आपले मनांत

ठेवूं नये. धाकट्या बंधूवर पुत्राप्रमाणें प्रेम करावें. व वडीलबंधूच्या ठिकाणीं पित्याप्रमाणें पूज्यबुद्धि ठेवावी. बंधूवर नेहमीं विश्वास ठेवावा. त्यांचा घातपात करण्याचें व त्यांशीं लबाडी करून त्यांना फसविण्याचें मनांतसुद्धां येऊं देऊं नये. एखाद्या मनुष्यास विश्वासू बनविण्याचा खात्रीलायख उपाय म्हटला म्हणजे त्याच्यावर पूर्ण विश्वास टाकणें हा होय.

भावाभावांचे हितसंबंध बहुतेक समसमान असतात. म्हणून जी गोष्ट एकास अनिष्ट असते तीच दुसऱ्यास इष्ट कधींही व्हावयची नाहीं. म्हणून परस्परांनीं एकमेकांच्या हितसंबंधास झटणें म्हणजे आपल्या स्वतःच्याच कल्याणा-करितां झटण्यासारखें आहे. म्हणून भावाभावांनीं सलो-ख्यानें वागून परस्परांच्या सहाय्यानें कोणतीही गोष्ट तडीस नेणें यांतच उभयतांचें कल्याण असतें. म्हणून आपण कोणत्याही स्थितींत असलों तरी एकमेकांच्या उपयोगीं पडण्यास सर्वदा झटावें. जो विपत्तींत असेल तींतून त्याला मुक्त करावें. जो मार्ग चुकून भलत्याच आडमार्गानें भटकत असेल त्याला चांगला मार्ग दाखवावा. असें एकमेकांच्या उपयोगीं पडणें म्हणजे आपलें कल्याण करणेंच होय.

आपल्या बंधूंचा वडिलार्जित मिळकतींत जो योग्य हिस्सा असेल तो त्यांस देण्यास आपण नेहमीं तयार असावें. आपल्या बंधूंनीं आपलें कितीही नुकसान केलें असलें तरी आपण आपल्या बंधुधर्मास जागून त्यांच्या संबंधाचें हरएक कर्तव्य मनापासून करीत असावें. बंधु-

प्रीति ही नेहमीं निर्हेतुक असावी, म्हणजे कोणताही स्वार्थपर हेतु मनांत न धरतां बंधुप्रेम ठेवावें. मनांत हेतु धरून बंधुप्रेम करणें हा अगदीं गौणपक्ष होय. आपण सर्व एकाच हाडामांसाचे आहों हें मनांत वागवून बंधुबंधूंनीं एकमेकांवर ममता करावी. एकमेकांशीं स्नेहभावानें, न्यायानें व समतेनें वागावें. आपल्यापासून दुसऱ्यास दुःख किंवा भीति वाटणार नाहीं असें सर्वदा वर्तन ठेवावें. ईश्वरकृपेनें जर तुम्हांस त्यांच्यापेक्षां अधिक विद्या प्राप्त झाली, किंवा संपत्ति अधिक मिळाली, तर तुम्ही त्यांची हेटाळणी करूं नका. त्यांशीं नेहमीं मर्यादेनें वागा. एकमेकांविषयीं मत्सर व हेवादावा मनांत केव्हांही बाळगूं नका. एकमेकांची निंदा किंवा नुकसान करण्याचें मनांतसुद्धां येऊं देऊं नये. कोणीं आपलें थोडेंबहुत नुकसान केलें तरी तें मोठ्या मनानें सहन करावें. कारण बहीण भावंडें हीं एकमेकांच्या उपयोगीं पडण्यासाठीं जन्मलेलीं असतात. म्हणून एकमेकांच्या ठिकाणीं कांहीं उणेपणा दिसल्यास त्यांना उपदेश करून वाटेवर आणणें व त्यांना निभावून नेणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय.

धाकट्या बंधूंची ज्याप्रमाणें योग्यता अधिक अधिक वाढत जाईल, त्या त्याप्रमाणें त्यांजवर अधिक अधिक जोखमीचीं व विश्वासाचीं कामें सोंपवीत जावें, म्हणजे त्यांस त्यांचें महत्त्व वाटून त्यांचे मनांत वडील बंधूविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न होते. दुसऱ्यांदेखत धाकट्या बंधूस मान देणें व हलकीं कामें त्यास करावयास न सांगणें हें फार चांगलें. असें

करण्यानें धाकट्या भावाचा लोकांत मान राहातो. त्याचप्रमाणें धाकट्या भावानें वडील भावाची मर्यादा राखणें हें उभयतांसही भूषणास्पद आहे. असें वागण्यानें वेगळे राहाण्याचा प्रसंग टळेल. व आपल्या हिंदुसमाजांत फार प्राचीन काळापासून चालत आलेल्या अविभक्त कुटुंबपद्धतीचें पोषण केल्यासारखें होईल.

कारण ती पद्धत फार चांगली आहे. या पद्धतीप्रमाणें ह्मटलें ह्मणजे घरांतील वडील पुरुष—मग तो बाप, चुलता किंवा भाऊ—कोणीही असो, हा घरांतील खरा यजमान असतो, व इतर सर्व मनुष्यें त्याच्या तंत्राप्रमाणें चालतात. मोठे कर्ते भाऊ झाले तरी ते वडील भावाचा बापाप्रमाणें मान ठेवतात. मुलगा मोठा वयस्कर, विद्वान् व अधिकारसंपन्न झाला तरी घरांत वृद्ध बाप आहे तोंपर्यंत त्याला आपली सत्ता घरांत चालवावी असें वाटत नाहीं. त्याला जेवावयाचें बाहेरचें आमंत्रण आलें तरी तो तें स्वतः न घेतां बापाकडे जावयाला सांगतो. त्याची कर्ती सवर्ती हुषार बायको हळदीकुंकवालासुद्धां सासूची आज्ञा झाल्याखेरीज बाहेर जात नाहीं. बरोबरीच्या जावा व नणंदा एकमेकींच्या कलाप्रमाणें वागतात.

या अविभक्त कुटुंबपद्धतीमुळें घरांत एकतंत्रीपणा राहातो. बजबजपुरी माजत नाहीं. संघशक्तीचे सारे फायदे घराण्याला मिळतात. घराण्याची इभ्रत, दरारा, व वजन बाहेरच्या लोकांवर पडतें, व सर्व स्त्रीपुरुषांस शांतिसौख्याचा उपभोग घ्यावयास सांपडतो. घराण्यांत सर्व जीव एका प्रेमरज्जूनें बद्ध असले, व अशीं पुष्कळशीं घराणीं संघशक्ती-

मुळें सकस व प्रबळ अशीं राष्ट्रांत असलीं कीं राष्ट्राचेंही संघबळ वाढतें. पूर्वापार चालत आलेले सुसंस्कार व चालीरीति यांनीं ज्या घराण्याला दृढ धरिलें आहे तें घराणें सर्वदा सुखी असतें. ह्मणूनच मोरोपंत म्हणतातः—

यश सुख पुण्य मिळें, मग बंधूनीं
कां न नीट नांदावें १ ॥
(आदीपर्व. ३६)

विभक्त होऊन काय मिळविलें?

कोंकणप्रांतीं एका डोंगराच्या पायथ्याशीं एक टुमदार गांव आहे. तेथें रामराव देशमुख म्हणून एक खानदानीचे गृहस्थ होऊन गेले. त्यांच्या पश्चात् थोडेच दिवसांत, त्यांचे चार मुलगे विनाकारण विभक्त झाले. त्यांनीं आपआपली शेतवाडी व कुळेंडाळें वाटून घेतलीं. त्यांच्या येथें जमाखर्च ठेवीत असत. त्याजवरून वर्षाचे वर्षास प्रपंचास लागणाऱ्या खर्चाचें टांचण ते करीत असत.

एके दिवशीं त्यांच्या वडिलांची चार स्नेही मंडळी, आपआपला नित्याचा व्यवसाय आटोपून चांदण्यांत शिळोप्याच्या गप्पागोष्टी करीत बसली असतां, त्या चारी बंधूंचीं जमाखर्चाचीं टांचणें एके ठिकाणीं आणवून पाहिलीं. तेव्हां ते एकत्र असतांना जो खर्च होत असे, त्याच्या तिपटीनें अधिक खर्च लागल्याचें त्यांच्या नजरेस आलें. कारण एका चुलीच्या चार चुली झाल्या, व एका दिव्या-

च्या ठिकाणीं चार दिवे लागूं लागले. एकत्र असतां गांवांत जो बस व कुळांवर वचक होता तो ढिला पडला. वसुला-करितां एका गांवीं एका शिपायाच्या ऐवजीं चौघांचे चार शिपाई जाऊं लागले. यामुळें साहजिकच खर्च वाढला व प्राप्ति तर मुळींच वाढली नाहीं.

हे सर्व बंधू एकत्र असतां त्यांच्या घरीं स्वयंपाकाला बाई, पाणी भरण्यास ब्राम्हण, पूजेस भटजी, व लिहिण्यास एक कारकून असे. विभक्त झाल्यावर प्रत्येकास इतके नोकर ठेवणें अगदीं अशक्य झालें. यामुळें त्यांना व त्यांच्या बायकांना घरांतील सर्व हलकींसालकीं कामेंसुद्धां स्वतः करणें भाग पडलें. शिवाय खर्च तिप्पट लागला तो लाग-लाच. तेव्हां त्या मंडळींपैकीं एक वृद्ध गृहस्थ त्या चौघां भावांस म्हणाला ' तुम्हीं विभक्त होऊन काय मिळविलें ?" यावर ते चौघेही निरुत्तर झाले.

तित्तिरपक्ष्याचें घरटें.

जंगला लगतच्या एका शेतांत दोघां भावांस एक तित्तिरपक्ष्याचें घरटें आढळलें; त्यांतील अंड्यांवर मादी बसली होती ती त्यांनीं हलकेच जाऊन धरली.

त्यांत जो मोठा भाऊ होता तो धाकट्यास म्हणाला, "तूं अंडीं घे, मी आपल्याला ही मादी ठेवतों; अंडीं कांहीं कमी नाहींत, तीं मादीच्या किंमती बरोबरीनेंच आहेत." लहान भाऊ म्हणाला, " असें आहे तर, मला मादी

दे, आणि तूं आपल्याला अंडीं ठेव. " असा त्यांचा वाद चालतां चालतां हातघाईवर प्रकरण येऊन, एकमेकांच्या शेंड्या ओढूं लागले. भांडण्याच्या गडबडींत थोरल्या भावाजवळून मादी निसटून गेली. आणि धाकट्यानें गैर सावधपणांत तीं अंडीं तुडवून टाकलीं, शिल्लक कोणासच कांहीं राहिलें नाहीं. असें पाहून परस्परांस ते म्हणाले " आपल्या बाबांनीं (खालीं लिहिलेलें) जें काय वचन सांगितलें आहे, तें अगदीं खरें आहे. "

" प्रेमद्वारें प्रत्येकजण आपला वांटा मिळवील. कलहानें हरएकजण तो खचित गमवील. "

बंधुप्रेम.

रामराव पाटील म्हणून एक मोठा जमीनदार होता. आपले पूर्व वयांत मोठा उद्योग करून त्यानें स्वकष्टानें पुष्कळ जमीनजुमला संपादन केला होता. त्याचा वडील मुलगा दुर्गुणी निघाला, सबब त्यानें आपली सर्व मालमत्ता धाकट्या मुलास दिली. पुढें वडील मुलास पश्चात्ताप होऊन त्यानें आपले दुर्गुण टाकून दिले. व चांगल्या रीतीनें वागूं लागला. त्यावरून त्याच्या धाकट्या भावानें एके दिवशीं मेजवानीचा बेत करून आपल्या भावासही जेवावयास बोलाविलें. मग पक्वानांनीं भरलेलीं ताटें सर्व मंडळींपुढें ठेविल्यावर एक झांकलेलें ताट आपल्या भावा-

पुढें ठेऊन तें त्यास उघडण्याविषयीं त्यानें सांगितलें. त्यानें तें उघडलें तों त्यांत बापाच्या मालमत्तेचे सर्व कागद-पत्र त्याच्या दृष्टीस पडले. मग धाकट्या भावानें वडील भावास सांगितलें कीं, " सांप्रत तूं आपली वर्तणूक सुधारली आहेस; ही अशीच जर आपल्या बापाच्या दृष्टीस पडती, तर त्यानें ही दौलत खचित तुला दिली असती; सबब ही आतां मीं तुझ्या स्वाधीन केली आहे. " हें पाहून त्या वडील भावास किती आनंद झाला असेल, व तेथें जमलेल्या मंडळीस तें विलक्षण बंधुप्रेम पाहून किती आश्चर्य वाटलें असेल, याचा विचार वाचकांनींच करावा !

---

(३). विद्याव्यासंग.

विद्या ददाति विनयं, विनयाद्याति पात्रताम् ॥
पात्रत्वाद्धनमाप्नोति, धनाद्धर्मस्ततः सुखम् ॥

भावार्थ–विद्या विनय देते (शिकविते) विनयापासून अंगीं पात्रता उत्पन्न होते, पात्रतेपासून द्रव्य मिळतें, द्रव्यामुळें हातून धर्म घडतो व धर्मापासून सुख होतें.

सारांश, विद्यादेवीला एकदां प्रसन्न करून घेतलें म्हणजे तिच्यापासून सर्व कांहीं मिळतें.

मनुष्यें अनेक प्रकारचे उद्योग करून कालक्रमणा करितात. परंतु त्या सर्व उद्योगांमध्यें विद्याव्यासंगांत काल घालविण्यासारखा उत्तम उद्योग दुसरा कोणताही नाहीं. या व्यवसायांत जें समाधान आहे त्यापेक्षां विशेष समाधान दुसऱ्या कोणत्याही व्यवसायांत नाहीं. विद्याव्यासंग हा शाश्वतसुख प्राप्त करून घेण्याचा राजमार्गच आहे. विद्येनें मनुष्याचे अंगीं एक प्रकारचें दिव्य सामर्थ्य व तेज उत्पन्न होतें. विद्येनें सत्यदेवतेचें प्रसन्न व सुंदर मुख दृष्टीस पडतें. विद्या ही एक प्रकारची तेजस्वी शक्ति आहे. विद्येच्या योगानें पुढें कल्याण होतें, हें तर उघडच आहे, परंतु विद्याभ्यास चालू असतांनासुद्धां सुख होतें. नवीन नवीन गोष्टी समजूं लागतात. मागें ज्या गोष्टी कळत नव्हत्या त्या कळल्या म्हणजे जो एक प्रकारचा आनंद होतो तो तर अवर्णनीय आहे. विद्येनें ज्ञानांत

नित्य भर पडत जाते. अशा तऱ्हेनें ज्ञान वाढलें म्हणजे तो सर्व सृष्टींतील पदार्थांकडे चिकित्सक बुद्धीनें पाहूं लागतो. व अशा तऱ्हेनें तो पाहूं लागला म्हणजे सृष्टीच्या रचनेंत परमेश्वरानें जें आपलें अगाध चातुर्य योजिलें आहे तें त्याच्या दृष्टीस पडूं लागतें. त्यामुळें तो ईश्वरचरणीं जास्त लीन होऊन प्रशांत व गंभीर होतो.

विद्याध्ययनापासून मनाला आनंद होतो. भाषणाला शोभा येते व बुद्धि वाढते. एकांतवासांत व निवांतस्थळीं असतां मनाची करमणूक करण्याला विद्या हेंच मुख्य साधन आहे. प्रत्येक कामाचा विचार करून त्याची तेथें योजना करण्यास विद्येचा फार उपयोग होतो. विद्याध्ययनानें अंगीं उपजत असलेले गुणधर्म परिपक्व होतात. कारण उपजतबुद्धि ही आपोआप उगवलेल्या झाडांप्रमाणें आहे. तिची जर नीटनेटकी व्यवस्था केली नाहीं व तिला विद्येनें योग्य वळण लाविलें नाहीं तर तिचा विस्तार अस्ताव्यस्त होऊन ती प्राणिमात्राच्या सुखांत भर घालण्याऐवजीं ती त्यांच्या सुखाच्या आड मात्र कारण-परत्वें येण्याचा संभव फार असतो.

विद्येनें बुद्धि विशाल होते, दृष्टीला व्यापकता येते व विचार प्रगल्भ होतात. म्हणून जे विद्याव्यासंगांत काळ घालवितात त्यांसच विद्वान् ही संज्ञा प्राप्त होते. विद्वान् ही संज्ञा प्राप्त होणेसाठीं मनुष्यानें इतर सर्व उद्योगधंदे सोडून विद्येच्याच पाठीमागें लागलें पाहिजे असें नाहीं. आजवर जे नामांकित विद्वान् होऊन गेले त्यांपैकीं पुष्कळांच्या मागें संसार हा लागलेलाच होता; व तो यथासांग

पार पाडणेकरितां संसारांतील इतर कर्तव्येंही त्यांस करावीं लागतच असत. परंतु हे असले मार्ग कितीही उपद्याप असतांनासुद्धां फावलेला वेळ ते विद्याव्यासंगांत घालवीत व विद्येंत भर घालीत असत. कारण त्यांना विद्येची तशी गोडीच लागलेली असे. यामुळें ते नेहमीं विद्याध्ययनांत फुरसतीचा काळ घालवीत व वाचून वाचून व मनन करून ते विद्वान् झाले होते.

अशा तऱ्हेनें मनुष्य एकदां विद्वान् झाला म्हणजे त्याची कीर्ति चोहोंकडे पसरते, तो सर्वत्र वंद्य व पूजनीय होतो. त्याची सर्वत्र प्रतिष्ठा होते. सर्व लोक त्यांस मान देऊं लागतात. संपत्ति त्यास मिळूं लागते. संस्कृतांत एके ठिकाणीं म्हटलें आहे:—" स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते" (म्हणजे राजे लोकांना मान फक्त त्यांच्या राज्यांतच मिळतो पण विद्वान् मनुष्याला तो सर्वत्र ठिकाणीं मिळतो.) हें अगदीं खरें आहे. याचा अनुभव आपणास नित्य व्यवहारांत येतोच. प्रत्येक मनुष्यास राजा किंवा लहान मोठा अधिकारी होणें शक्य नाहीं. परंतु प्रत्येक मनुष्यास विद्याव्यासंग चालू ठेवून कोणत्या तरी विषयांत प्राविण्य मिळवितां येईल. म्हणून प्रत्येकानें आपला फुरसतीचा वेळ आपणास आवडणाऱ्या विषयावरील व सर्व साधारण उपयुक्त पुस्तकें वाचण्यांत घालवावा हें उचित आहे. कारण मनुष्य स्वतःच्या प्रयत्नानें जें शिक्षण मिळवितो तें जसें त्याच्या अंगीं बाणून जातें, तसें दुसऱ्याचें शिक्षण अंगीं बाणत नाहीं. पुष्कळांची अशी कल्पना असते कीं, शाळा सोडली म्हणजे आपलें शिक्षण संपलें.

पण खरोखर म्हटलें तर त्या वेळीं शिक्षणास कोठें नुकती सुरवात होते; व मनुष्याच्या अंतापर्यंत तें चालूच असतें.

विद्याव्यासंग करण्यास अमुक वय, अमुक काळ व अमुक संपत्ति लागते असें नाहीं. तो कोणत्याही काळीं गरीब व श्रीमंत या दोघांनाही सारखाच करतां येतो. फक्त एक दृढ निश्चय मात्र पाहिजे. लहान वयांत विद्वान् होतां आलें तर फारच चांगलें. पण तसें होणें सर्वांस शक्य नाहीं. पण थोर वयांतसुद्धां विद्याव्यासंगानें पंडीत व विद्वान् होतां येतें. आजवर जे नामांकित विद्वान् होऊन गेले आहेत त्यांपैकीं बहुतेकांनीं थोर वयांतच विद्या संपादन केलेली आहे. याचीं उदाहरणें प्राचीन व अर्वाचीन इतिहासांत पुष्कळ सांपडतात. विद्वान् लोक विद्येवर जे परिश्रम करीत असतात त्यांबद्दल लोकांनीं आपणांस मान द्यावा किंवा त्यांपासून आपणास द्रव्य प्राप्ति व्हावी; ही गोष्ट त्यांच्या मनांत सहसा वागत नाहीं. प्लेटो, आरिस्टाटल, पाणिनी, भास्कराचार्य, रा. बा. केरो लक्ष्मण छत्रे, विष्णुशास्त्री चिपळूणकर वगैरे यांसारख्या विद्याव्यसनी पुरुषांस आपआपल्या विद्येंत गर्क होऊन रहाणें व आपल्या शोधांनीं मनुष्यमात्राच्या सुखवृद्धीचा अभिलाष धरणें याहून कांहींही इष्ट नसतें. असे थोर पुरुष ज्या विषयांच्या मागें लागलेले असतात त्यांत गुंग होऊन गेले म्हणजे त्यांस कशाचेंही भान रहात नाहीं.

सर्व विषयांवरील सामान्य वाचन व ज्ञान हें आपल्या अंगीकृत म्ह० हातीं घेतलेल्या विषयास नेहमीं उपयोगीं पडतें. आपल्या धंद्यांत तेवढें प्रावीण्य मिळवून बाकीच्या

अन्य विषयांविषयीं अज्ञानांधकारांत राहिल्यास त्यास पारंगतता म्हणतां येणार नाहीं. विशेषतः श्रेष्ठ प्रतीच्या उद्योग धंद्यांत या गोष्टीची प्रचीति प्रत्यक्ष अनुभवास येते. वकिलास कायद्याच्या ज्ञानाबरोबर इतर सर्वसाधारण विषयांचें सामान्य ज्ञान मिळालें असल्यास तो फार चांगल्या प्रतीचा वकील ठरतो. कारण अनेक प्रसंगीं अशा गहन व व्यापक प्रश्नांचा वकिलास खल करावा लागतो कीं, त्यास केवळ कायद्याचेंच उत्तम ज्ञान पुरेसें होत नाहीं; तर अनेक अन्य विषयांचें साधारण ज्ञान त्यास अवश्य लागतें. त्याचप्रमाणें वैद्याला जसें निरनिराळीं औषधें व त्यांचीं रसायनें यांचे गुण व रोगाचें निदान व चिकित्सा यांचें ज्ञान असणें अवश्य आहे तसेंच मानवी स्वभाव व मानवी अंतःकरण यांचीही पूर्ण ओळख असणें जरूरीचें आहे. धार्मिक, सामाजिक व राजकीय विषयांवर व्याख्यानें देण्यास तर दुसऱ्या सर्व विषयांवरील सामान्य ज्ञानाची अत्यंत अवश्यकता आहे. कारागीर, इंजिनीअर व व्यापारी वगैरे धंदेवाले लोकांस वाङ्मय, साहित्यशास्त्र कलाकौशल्य वगैरे विषयांच्या अध्ययनापासून शारीरिक व मानसिक सौख्य प्राप्त होईल यांत संशय नाहीं. गायनाची प्रत्यक्ष व्यवहारांत उपयुक्तता दाखविणें जरी कठीण आहे तरी त्यापासून मनावर जे अनेक उपयुक्त परिणाम होतात त्याचें महत्त्व जास्त आहे. गायनकलेनें आपल्यांत एकवाक्यता येतें. आपलें डोकें शांत होतें. दमलेल्या व थकलेल्या माणसास गायन ही एक मोठी करमणूक आहे.

प्राचीन व अर्वाचीन भाषाज्ञान, चित्रकला, गायन-

कला, प्राणिशास्त्र, व वनस्पतिशास्त्र वगैरे नानाविध शास्त्रांच्या अध्ययनानें व वाचनानें बुद्धीचा चांगला विकास होतो. ज्याला उत्तम ग्रंथकार व्हावयाचें असेल त्याला तर नेहमीं विविध वाचनापासून चांगलाच उपयोग होतो. कारण अशा वाचनापासून त्याच्या लेखनकलेस बरेंच सहाय्य होतें. नवीन विचार, नवीन आचार, नव्या कल्पना वगैरे हरएक बाबींचें ज्ञान त्यास मिळतें. व त्या ज्ञानाचें प्रतिबिंब त्याच्या ग्रंथांत उतरून तो ग्रंथकार सर्वमान्य होऊन त्याची विद्वानांत गणना होते. सारांश कोणत्याही एका विषयांत पारंगतता मिळविणें व दुसऱ्या अनेक विषयांत थोडाफार प्रवेश करणें यांसच विद्वत्ता व पूर्ण शिक्षण म्हणतात. अशा तऱ्हेच्या विद्याव्यासंगा-पासूनच बुद्धीचा विकास होऊन ज्ञानार्जनाची लालसा वाढत जाते. करितां प्रत्येकानें कोणता तरी विद्याव्यासंग नेहमीं करीत असावें. हें त्यास अत्यंत भूषणावह आहे.

" एक श्लोक, किंवा अर्धा श्लोक, किंवा त्याहूनही कमी अक्षरें प्रतिदिवशीं शिकावीं. दानधर्म, अध्ययन, व सत्कर्म यांच्या योगानें प्रत्येक दिवस फलद्रुप करावा. "

सुभाषित.

दरिद्री विद्वान् आणि धनवान् मूर्ख.

एकदां एक दरिद्री विद्वान् आणि एक धनवान् मूर्ख ह्यांचा फार स्नेह पडला, यामुळें बहुतेक लोकांस असें वाटलें कीं, विद्वानाचा तो स्नेहीही विद्वान् असेल. म्हणून एके

दिवशीं त्या दोघांसही सभेचें बोलावणें आलें. तेव्हां ते दोघेही सभेस गेले. तेथें त्या उभयतांचें खरें स्वरूप ओळखलें गेलें. म्हणून सभेंतील लोकांनीं विद्वानाचा मात्र योग्य आदरसत्कार केला. तें पाहून त्या मूर्ख धनवानास फार वाईट वाटलें. तेव्हां तो आपल्या मनांत म्हणाला, अरे, मी मूर्ख कसा झालों! जर मी विद्वान् असतों तर सर्व लोकांनीं मला मान दिला असता. मी धनवान् आहें खरा; परंतु धन माझ्याबरोबर सभेस येत नाहीं. विद्या सर्वत्र बरोबर जाते. म्हणून आजपासून माझें सर्व धन खर्चून विद्या संपादण्याविषयीं मी प्रयत्न करीन. असा त्यानें तेथें त्या वेळीं आपल्या मनाशीं निश्चय केला.

मग सभा उठल्यावर ते दोघे घराकडे परतले. वाटेनें धनवान् विद्वानास म्हणतो, " मित्रा, जर तूं मजवर कृपा करशील तर आपणा उभयतांचें कल्याण होईल." विद्वानानें विचारलें " तें कसें ? " मूर्ख बोलला " माझें सर्व धन तूं घे आणि तुझी सर्व विद्या मला दे." विद्वान् म्हणाला "तूं मला आपलें सर्व धन या घटकेस देऊं शकशील; ह्यांत कांहीं कठीण नाहीं. परंतु मला मात्र माझी सर्व विद्या या क्षणीं तुला देतां येणार नाहीं. कारण तसें करणें माझ्या शक्ती-बाहेरचें आहे. "त्यावर तो धनवान् मूर्ख म्हणाला" अरे मी द्रव्याचा लोभ सोडावयास सिद्ध झालों, आणि तुला विद्येची ममता सुटेना काय? " विद्वानानें उत्तर केलें" ह्या विषयीं मीं सांगितल्यानें तुझी खातरी व्हावयाची नाहीं. करितां आपण दोघेही राजाकडे जाऊं या, म्हणजे तो या गोष्टीचा निवाडा करील. "

असें बोलून ते दोघेही राजाकडे गेले, आणि सर्व वर्तमान त्यांनीं राजास सांगितलें. राजानें तें सर्व ऐकून घेऊन तत्क्षणींच दरिद्री विद्वानास आपल्या जामदार खान्यांतील धन देऊन धनवान् केलें, आणि मूर्खास म्हणाला " अरे, जर तुला या क्षणीं धनाप्रमाणें विद्या देतां आली असती तर ती मी तुला आतांच देऊन विद्वान् केलें असतें. परंतु तसें मला करतां येणें शक्य नाहीं, आतां तुला जर विद्वान् होण्याची इच्छा असेल तर तूं शाळेंत जाऊन झटून विद्याभ्यास कर, म्हणजे कांहीं काळ गेल्यानंतर तूं विद्वान् होशील, व त्यामुळें तूं प्रतिष्ठा पावशील.

सारांश, विद्येमुळें विद्वानास धन वाटेल तेव्हां सहज मिळणें शक्य असतें. पण विद्याहीनास विद्या सहज आयत्या वेळीं मिळत नाहीं. तीस वर्षानुवर्ष अभ्यासच केला पाहिजे. करितां मुलांनीं लहानपणापासूनच विद्या संपादण्याविषयीं झटत असावें.

मोरोपंतांचा विद्यासंग.

मोरोपंत म्हणून एक सुप्रसिद्ध कवि अठराव्या शतकांत महाराष्ट्रांत होऊन गेले, हें सर्वांस माहीत आहेच. त्यांचा विद्याव्यासंग फार जबर होता. त्यांनीं विद्यार्जन स्वतःच केलें. त्यांचें वाचन सतत चाललें असे. त्यांच्या वेळीं हल्लीं सारखे ग्रंथ मिळणें सुलभ नव्हतें, कारण तेव्हां छापण्याची कला इकडे निघाली नव्हती. तेव्हां ग्रंथ जवळ असणें हें

श्रीमंतांशिवाय किंवा आस्थेवाईक विद्यार्थ्यांशिवाय इतरांस सुलभ नव्हतें. म्हणून ते बारामतीस असतांही कोल्हापूर, कऱ्हाड, पंढरपूर फार काय पण काशीहूनही ग्रंथ आणवीत. कांहीं वाचून परत करीत व कांहींच्या नकला घेत. अनेक ग्रंथांचा शोध लावून ते संपादन करीत. त्यांची लेखनक्रिया सारखी चाललेली असे. त्यांची ही लेखनक्रियाच त्यांच्या ग्रंथ रचनेच्या कामीं पुष्कळ उपयोगीं पडली. कारण लेखनक्रियेनें आयासावांचून सहज पाठांतर घडतें, व अध्ययन चांगलें परिपक्व होऊन मुरतें. त्यांचा विद्याव्यासंग दांडगा होता म्हणूनच त्यांच्या कविता इतक्या सरस वठल्या आहेत. संस्कृत नाटकें, काव्यें, वैद्यशास्त्र, वेदांतशास्त्र, व्याकरण-शास्त्र वगैरे वरील अनेक ग्रंथांचें त्यांनीं चांगलें परिशिलन केलेलें होतें. रामायण, भारत व भागवत हे ग्रंथ तर त्यांना पुराण सांगून सांगून करतलमलवत् झाले होते. त्याचप्रमाणें त्यांनीं मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, वामन, श्रीधर, नामदेव, तुकाराम, मुक्तेश्वर महिपती वगैरे मराठी कवींच्या कविताही चांगल्या वाचलेल्या होत्या. त्यांनीं हिंदी भाषेतील तुलसीदासाचें रामायण व कबिराचे दोहरे वगैरेही वाचल्याचें दिसून येतें. इतकें करून त्यांनीं सुमारें एक लाख उत्तम मराठी कविता लिहिलेल्या आहेत. याप्रमाणें सर्व बाजूंनीं त्यांचा व्यासंग तीन तपांपेक्षां अधिक वर्षें अव्याहत चालला होता.

लॉर्ड बेकन् याचें विद्येसंबंधीं म्हणणें.

लॉर्ड बेकन् या नांवाचा एक मोठा ग्रंथकार सतरावे शतकांत इंग्लंड देशांत होऊन गेला. अनेक कारणांनीं त्याचें मन व्यग्र झालें असतांही त्यानें आपला अभ्यास कधींही सोडला नाहीं. ऐन मानसिक दुःखांत व प्रापंचिक संकटांत तो अगदीं बुडून गेला असतां त्यानें इंग्लंडचा इतिहास, इंग्लंडच्या कायदेकानूंची व्यवस्था, व तत्वज्ञ कारस्थानी हे ग्रंथ लिहून ते तडीस नेले. त्यानें विद्येसंबंधीं एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं:—

" विद्या ही विश्रांतीकरितां मंचक, निवांत एकटें फिरण्याकरितां मठ, उंच उभे राहून दुसऱ्यास तुच्छ मानण्याकरितां बुरूज, दुसऱ्याशीं युद्ध करण्याकरितां किल्ला, अथवा व्यापार धंद्याचें व किफायतीचें दुकान, अशी नसावी ! तर जेणें करून आपली मानसिक उन्नति होईल व परमेश्वराचें वैभव जगतांत गाजेल अशा साधनांचें विद्या हें भांडार असावें. "

(४) विनय.

भो नारायण, सुष्ठु शोभसे विनयेन ।

—डॉक्टर भांडारकर—

भावार्थः—हे नारायणा तूं विनयामुळें चांगला शोभतोस. मनुष्याचें भूषण विद्या, आणि विद्येचें भूषण विनय होय. फूल स्वतः शोभायमान पदार्थ खरा, पण त्यास सुगंधानें जशी अधिक योग्यता येते, तसा विद्येस विनयानें अधिक थोरपणा येतो. विनयामुळें सर्व दोष झांकले जाऊन गुण तेवढेच लोकांस दिसूं लागतात. जो मनुष्य पुढें पुढें करून आपल्या गुणांचे प्रदर्शन न करितां, विनयाच्या झिरझिरींत पडद्यांतून ते प्रकट करितो त्याचेच गुण अधिक शोभायमान दिसतात. कमलादिक फुलें पूर्ण विकास पावण्यापूर्वी जशीं खुलून दिसतात तशीं पूर्ण विकास पावल्यावर तीं दिसत नाहींत. म्हणून विनय हा मनुष्याच्या सद्‌गुणरूपीं अलंकारांतील बहुमोल हिराच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कुरूप मनुष्यही अलंकारानें थोडासा शोभिवंत दिसतो; त्याप्रमाणें वाईट मनुष्याससुद्धां विनयामुळें थोडासा मान मिळतो. मनुष्य सुस्वरूप असूनही वाईट साईट कपडे वापरणारा व वेडावांकडा पोषाक करणारा असला म्हणजे त्याचा सहवास सुखकर होत नाहीं. त्याप्रमाणें मनुष्य विद्वान असूनही उद्धट असला तर त्याची संगति नकोशी वाटते. कोणतेंही कृत्य विनयानें केलें असतां तें अधिक शोभतें.

विनयी व सभ्य मनुष्याची संगति लोकांस प्रिय व सुखावह होते. कित्येकांस विनयाचें मोठेसें माहात्म्य वाटत नाहीं. पण सदाचरण देखील विनयशील नसेल तर तें शोभत नाहीं. विनयानें मनुष्याचें वजन लोकांत वाढतें. दुसरे पुष्कळ गुण अंगीं असून जर विनय म्ह० नम्रता अंगीं नसेल तर सदर गुणांचें व्हावें तसें चीज होत नाहीं. बोलण्या चालण्याच्या रितीभातींवरून दुसऱ्याच्या मनांत जो ग्रह प्रथम उत्पन्न होतो तो सहसा जात नाहीं. विनय व सभ्यपणा अंगीं असल्यास हा ग्रह चांगला होतो. मनुष्याच्या अंगीं दांडगेपणा व आचरटपणा असला म्हणजे, त्यानें कोणाचें नुकसान केलें नाहीं तरी लोकांस त्याचा त्रास येतो. सभ्य अथवा विनयशील मनुष्यापासून कांहीं लाभ नसला तरी तो लोकांस फार आवडतो त्रासिक व दांडगा मनुष्य मनाचा कोमल असला तरी तो लोकांस नकोसा वाटतो.

विनय ही एक सदाचरणाची खूण आहे, त्यावरून मनुष्याचे विचार, आवड, स्वभाव व संगति यांचें बरेंच ज्ञान होतें. लुच्चेगिरीनें मुद्दाम खोटा विनय धरतात तो वेगळा, पण सुशिक्षणानें वाढलेला स्वाभाविक सभ्यपणा हा थोर मनुष्याच्या योग्यतेचें चिन्ह होय. मन सुसंस्कृत झाल्याखेरीज खरा विनय सहसा उत्पन्न होत नाहीं. यावरून " विद्या ददाति विनयं " म्हणजे विद्येनें विनय प्राप्त होतो, अशा अर्थाचें संस्कृतमध्यें एक वाक्य आहे, तें या गोष्टीची सत्यता पटवितें. यावरून आणखी असें सिद्ध होतें कीं, ज्याच्या अंगीं विनय आहे त्याच्याच मनावर

विद्येचा सुपरिणाम झालेला आहे. जरी अंगीं मोठी विद्या व पदरीं मोठी धनदौलत असली तरी जर अंगीं विनय नसेल तर दोन्हींही कवडी मोल होत. याकरितां विद्वत्ता व संपत्ति याप्रमाणें विनयही संपादन करण्याकरितां प्रत्येकानें झटलें पाहिजे.

विनयामुळें मनुष्याचे गुण दुसऱ्याचे मनांत तेव्हांच भरतात. म्हणून विनय हा एक शहाणपणाचा भाग समजतात. अंगीं खरा विनय व सभ्यपणा नसतां केवळ बाहेरून वस्त्रप्रावर्णाची व पोषाकाची ठाकठिकी करून व बोलण्याचालण्यांत सभ्यपणाची ऐट आणणें केवळ व्यर्थ आहे. मनाच्या कोमलपणाशिवाय शरिराचा चांगुलपणा हा सुगंधरहीत फुलासारखा होय.

खरा विनय व प्रामाणिकपणा यांचा अगदीं निकट संबंध आहे. प्रामाणिकपणाशिवाय नुसती नम्रता किंवा विनय हीं मुलाम्यासारखीं आहेत. त्यास खऱ्या सोन्याची शोभा किंवा किंमत यावयाची नाहीं. खरा विनय व दया हीं एकमेकांपासून फार दूर नाहींत. दुसऱ्याचें अंतःकरण तिलप्रायही न दुखविणें हें तर विनयशीलपणाचें मूळ लक्षण आहे. आपण लोकांशीं नम्रतेनें व सभ्यपणानें वागलों तरच लोक आपणांशीं तसें वागतील.

विनयी मनुष्य आपल्या खऱ्या मोठेपणाचाही डौल मिरवीत नाहीं. पण छचोर मनुष्य सर्व गोष्टींत आपलीच बढाई मारीत असतो. नम्र मनुष्य चांगली गोष्ट बिनबोभाट करितो, पण छचोर मनुष्य कांहींही न करितां नुसती बडबड मात्र पोकळ ढगासारखी करितो. दांडगा

मनुष्य दुष्ट असतो असें नाहीं. पण त्यास असें वाटतें कीं, आपण मात्र मनास येईल तसें वागावें, आपल्यापासून त्रास झाला तरी लोकांनीं तो सोसून घ्यावा, व त्याविरुद्ध लोकांनीं ब्रहि काढूं नये; पण लोकांच्या दांडगेपणाचा जसा आपणास त्रास येतो, तसा आपल्या-दांडगेपणाचा त्यांस त्रास येत असेल, ही गोष्ट त्याच्या स्वप्नींही येत नाहीं. त्याच्यानें आपल्या मनास मुळींच आवरतां येत नाहीं. ज्याचें मन अनावर आहे त्यांशीं वागणें मोठें कठीण आहे. अशा मनुष्यापासून कोणासही सुख होणार नाहीं, इतकेंच नव्हे, तर उलटा त्याचा त्रास येऊन तो जवळ नसावा असें वाटेल. अंगीं इतर गुण असूनही, एक विनय नसल्यामुळें मनुष्याचा व्हावा तसा नफा होत नाहीं.

कित्येकांस अशी एक वाईट खोड असते कीं, कोणी कांहीं बोललें तरी त्याचें खंडन करण्याचा प्रयत्न करावयाचा ही खोड फार वाईट आहे. या दुष्ट खोडीमुळें असें होतें कीं, मनुष्य आज ज्या गोष्टीचें मंडन करितो, तिचेंच उद्यां खंडन करूं लागतो. कोणीं कांहीं म्हटलें तरी त्याच्या उलट बोलणें जसें वाईट, तसेंच कोणीं कांहींही म्हटलें असतां त्यास होय म्हणणें हेंही वाईट आहे. नुसत्या होस हो ठोकून दिल्यानें मनुष्य विनयशील होत नाहीं. होस हो म्हणणें, व कोणत्याही गोष्टींत आपल्या सदसद्विवेक बुद्धीच्या विरुद्ध मत देणें, हा विनय नव्हे. ह्यास लुब्रेपणा किंवा तोंडपुजेपणा म्हणतात. विनयाची खरी रीत म्हटली म्हणजे आपलें जें प्रामाणिक मत झालें असेल तेंच नम्रतेनें

पुढें मांडणें, हें होय. दांडगेपणा जसा वाईट तसाच किंवा त्याहून लुब्रेपणा हा वाईट आहे. म्हणून मनुष्यानें विनयरूपीं रम्य उपवनाची शोभा अवलोकन करण्याच्या भरांत लुब्रेपणारूपीं कांटेरी कुंपणांत न पडण्याची खबरदारी ठेवावी.

विनयी विद्वान्.

प्रसिद्ध लॉर्ड बेकन् हा एकदां आजारी पडला असतां त्यास फ्रान्सचा वकील भेटावयास गेला, व त्यानें बेकन्‌ची अतीच प्रशंसा केली. तो म्हणाला, " देवदूत, देवदूत " म्हणून कोणी आहेत असें मी आजवर नुसतें ऐकतच होतों. पण त्यांच्या दर्शनाचा लाभ आजवर मला कधीं मिळाला नाहीं. तो आज मला मिळाला. कारण आपण त्या कोटींतले आहांत. यावर बेकनचें उत्तर त्याच्यासारख्या तत्त्ववेत्त्यास शोभण्यासारखेंच होतें. तो म्हणाला " लोक मला देवदूत म्हणतील तर खुशाल म्हणोत. पण माझे दोष व शारीरिक पीडा मला " तूं मनुष्य आहेस "असें अगदीं स्पष्टपणें सांगतात.

नद्या व वेत.

समुद्रानें कोणे एके वेळीं सर्व नद्यांना विचारलें कीं " मोठमोठ्या धिप्पाड अशा झाडांना, त्यांच्या मुळांसकट

उपटून घेऊन येतां, परंतु त्या वेताला घेऊन येत नाहीं. तो फार मोठा नसून त्याचें सामर्थ्यही फार मोठें नाहीं, व तो अगदीं तुमच्या कांठाला वाढतो. त्याला तुच्छ समजून तुम्ही आणीत नाहीं, कां त्यानें तुमचें कांहीं केलें आहे म्हणून तो तुमचा कांठ सोडून मजकडे येत नाहीं." तेव्हां सर्वश्रेष्ठ गंगेनें त्याला पुढील उत्तर दिलें.

ती म्हणाली, "हीं झाडें आपली जागा अगदीं न सोडतां मोठ्या ताठ्यानें उभीं राहतात. या ताठ्यामुळें त्यांना आम्ही जागा सोडावयाला लावितों; वेताची गोष्ट तशी नाहीं. आमच्या येणाऱ्या जोरापुढें तो नमतो व आमचा जोर निवून गेल्यावर तो आपल्या जाग्यावर पुन्हां आपला कायम राहतो. त्याला वेळ प्रसंग समजतो. तो नेहमीं नम्र असतो. माऱ्याच्या जोरापुढें जे ताठा न धरतां वाकतात त्यांचा पराभव होत नाहीं."

वटवृक्ष आणि लव्हाळा.

गर्विष्ठ, अभिमानी, ताठर होतील ते पडतील, नमून वागतील ते आपला पगडा बसवतील.

रात्रीं भयंकर तुफान वावटळ झाल्यानंतरच्या सकाळीं, रामचंद्रपंत आपला मुलगा रंगू, यास बरोबर घेऊन, रात्रीच्या वाऱ्यानें कांहीं नुकसान झालें आहे कीं काय, म्हणून पाहण्यासाठीं बागांत गेले.

रंगू म्हणला, "बाबा, तें पाहा पलीकडे, केवढें मोठें

धिप्पाड वडाचें झाड जमिनीवर उलथून पडलें आहे तें? आणि हे इकडे ओढ्याच्या बाजूस निर्जिव व लेचेपेचे लव्हाळे जसेच्या तसेच ताठ उभे आहेत. प्रत्येक वावटळीस न जुमानणाऱ्या ह्या प्रौढ वटवृक्षांपेक्षां लव्हाळ्यांचाच या वाऱ्यानें विशेष स्वल्प रीतीनें नाश केला असेल असेंच मला वाटलें होतें. "

बाप म्हणाला, " मुला हा दांडगा वड मोडलाच पाहिजे. कारण त्यास वाऱ्यापुढें वांकवतच नाहीं! परंतु हे लव्हाळे पाहा! वारा आला म्हणजे वाकून जमिनीवर आडवे पडण्यापर्यंतची त्यांची तयारी असते. तेथें वारा त्यास काय त्रास देऊं शकतो ? म्हण आहे, गर्वाचें घर खालीं !

———

(५) वाणीचा सदुपयोग

बहु काळींचा मित्रसंबंधु ॥ तोडी एक वोखटा शब्दु ॥
जैसा कांजीचा स्वल्पबिंदु ॥ घटची नाशी दुग्धाचा ॥

वाणी ही अमोलिक देणगी कृपाळु परमेश्वरानें मनुष्यास दिली आहे. तिचा चांगला किंवा वाईट उपयोग करणें हें मात्र त्याच दयाघन परमेश्वरानें मनुष्याच्या हातीं ठेविलें आहे. तिचा जर आपण सदुपयोग केला तरी ती सन्मित्राप्रमाणें सुखदायक होते, आणि दुरुपयोग केला तर ती शत्रूप्रमाणें हानिकारक होते. विचार न करितां वेडें-वांकडें बोलण्यांत जीभ लांब केली तर विनाकारण मोठमोठाले अनर्थ ओढवतात. यासाठीं वाणीचा उपयोग सुखकारक व हितकारक होईल असा करीत जावा.

वायफळ पुष्कळ बोलण्याची संवय ठेवूं नये. फार बोलण्यानें शब्दाचें महत्त्व नाहींसें होतें, व चुका होण्याचा संभव असतो. गोड वाणीनें सत्य भाषण करण्याची संवय ठेवावी. फाजील थट्टा केल्यानें मोठमोठे अनर्थ ओढवतात. थट्टेखोर भाषण हें दुसऱ्यास मान खालीं घालावयास लावतें. दुसऱ्याच्या खोडी व दुर्गुण वर्णन केल्यानें त्यास राग व त्वेष हीं उत्पन्न होतात. दुसऱ्याच्या मनाला लागेल अशी त्याची थट्टा करणें हें फारच वाईट व सभ्यपणाला हानिकारक आहे. बोलतांना निंदास्पद शब्द न उच्चारण्याविष-

यीं खबरदारी घ्यावी. दुसऱ्यांचीं व्यंगें बाहेर काढून त्यांची चिकित्सा करीत बसणें फारच अनर्थकारक आहे. दुसऱ्याच्या वाईट खोडी असल्या तरी त्या बाहेर काढण्याचा कोणालाही अधिकार नाहीं.

बोलतांना पदोपदीं शपथा घेण्याची संवय सोडून द्यावी. बोलण्यांत देवाची खोटी शपथ वाहणें म्हणजे देवाचा मोठा अपमान केल्यासारखें आहे. खोटी शपथ वाहणें हें नीच कर्म आहे. खोटें भाषण करूं नये. तेणेंकरून मनुष्याचें मोल जातें. खोटेपणाचा परिणाम खोटाच होतो. वाणीचें खरें भूषण सत्य बोलणें हेंच होय. तेंच वाणीला भूषवितें. गूळ नाहीं, पण गुळासारखी गोड वाचा तरी मनुष्यानें ठेवावी.

गोड बोलण्यानें मनुष्य तर वश होतोच; पण त्यानें मुके प्राणी सुद्धां वश होतात. कठोरपणापेक्षां प्रेमळपणानें मोठें काम होतें. सात्विक मनुष्यें मिष्टान्नापेक्षां गोड शब्दांचीच भुकेलेलीं असतात. सभ्यपणानें बोलण्यानें मनुष्याची योग्यता वाढते. चांगली वाणी ही भाग्यश्री वाढविणारी आहे. गोड व सत्य वाणी हें मनुष्याचें सौंदर्य आहे. गोड व सत्य वाणीनें जीवित दिव्य व रमणीय होतें.

आपण जसे शब्द उच्चारावे तसेंच त्याचें उत्तर दुसऱ्याकडून मिळत असतें. आपण प्रेमाचे शब्द उच्चारले तर आपणासही प्रेमाचेच शब्द ऐकावयास मिळतात. आपण रागानें किंवा उद्दामपणानें भाषण केलें तर त्याचा जवाब तशाच भाषणांत मिळतो. “ अरे ” तर “ कांरे ” असा सर्व साधारण जगाचा नियम आहे. कारण, मनुष्याचेंच

काय, पण कोणत्याही प्राण्याचें अंतःकरण हें अति स्वच्छ आरसा आहे. त्या आरशापुढें जो जो मनोविकार धरावा, त्याचें अगदीं हुबेहूब प्रतिबिंब दिसून येतें. एखाद्या जनावराच्या अंगावर काठी उगारली अगर रागानें त्याजकडे पाहिलें तर तें आपणाकडे रागानें टवकारून पाहूं लागतें. पण त्यालाच जर आपण प्रेमानें हाक मारून कुरवाळूं लागलों, तर तें शेपूट वर करून आपणास चाटूं लागतें. इतर प्राण्यांची जर ही गोष्ट, तर मग समंजस व बुद्धि असलेल्या मनुष्यासंबंधीं कशाला जास्त सांगावयास पाहिजे.

त्यांतल्यात्यांत लहान मुलांचें अंतःकरण अत्यंत प्रेमळ व निर्मळ असतें. त्यांच्यापुढें ज्याप्रकारचे शब्द बोलावेत त्याच प्रकारचा प्रतिध्वनि त्यांच्या कडून निघत असतो. म्हणून लहान मुलांसमक्ष नेहमीं मृदु व गोड बोलावें.

मृदु व गोड भाषण ही खरोखर एक अमोलिक चीज आहे. तें बोलण्यास कांहींच खर्च पडत नाहीं. तें अल्प जरी असलें तरी तें अंतःकरणाच्या खोल प्रदेशापर्यंत पोंचून कालांतरानें चांगल्या फळास येतें. प्रेमळ व मधुर भाषण करावयास फार प्रयास पडतात असें नाहीं. पण गर्वामुळें ही अगदीं सोपी गोष्टसुद्धां कित्येकांच्या हातून होत नाहीं. गोड भाषण हें बोलणारा व ऐकणारा या उभयतांसही आनंद देतें, उलट अभद्र, कठोर व रागाचें भाषण केल्यानें दोघांनांही त्रास होतो. परमेश्वरानें जीभ हाडावांचून केली आहे. यांत त्याचा उद्देश ती नेहमीं मृदु असावी असा आहे. म्हणून तिला कधींही कठोर होऊं देऊं नये.

जीभ स्वाधीन असली तर ती सर्व लोकांस वश करील.

आणि जर ती स्वाधीन नसली तर सर्वांचे मनांत आपले-विषयीं द्वेष उत्पन्न करील. तिचा शहाणपणानें उपयोग केला तर ती प्राणसुद्धां वांचविते. व मूर्खपणानें तिचा उपयोग केला तर ती प्रसंगविशेषीं प्राणघातकही होते. ज्यानें जीभ स्वाधीन ठेविली त्यानें सर्व शरीर स्वाधीन ठेविलें म्हणून समजावें. आपण घोड्याच्या तोंडांत लगाम घालतों, यामुळें त्याचें शरीर आपणास पाहिजे तिकडे वळवितां येतें. त्याप्रमाणें आपण जर आपली जीभ स्वाधीन ठेविली तर, आपणासही आपलें शरीर स्वाधीन ठेवतां येईल.

रागानें उत्तर देणें हा वेडेपणा होय. पण एखाद्याची थट्टा करणें हें त्याहीपेक्षां मूर्खपणाचें लक्षण आहे. पुष्कळ लोक एखादी दुखापत सोसतील; पण त्यांना कोणी हंसलेलें खपणार नाहीं. त्यांना दुसरें कांहीं केलें तरी तें घटकाभर विसरतील, पण त्यांची टवाळकी केली तर ते त्याचा राग मनांत ठेवतील.

विचार करून जे शब्द येतील तेच बोलावे. वाचाळपणा किंवा कांहीं तरी बोलण्याची ज्याला संवय असते, त्याला बहुधा आपल्या कामांत यश येत नाहीं. पुष्कळ लोक बोलण्याच्या भरांत जें मनांत असतें त्याहून भलतेंच कांहीं तरी बोलून जातात. व मागाहून त्यांना असें वाटतें कीं, असें आपण बोललों नसतों तर फार बरें झालें असतें. कित्येक कांहीं तरी गैरशिस्त गोष्ट बोलतात. ती बोलण्यांत त्यांचा कांहीं विशेष हेतु असतो असें नाहीं; पण त्यांच्या जिभेला कांहीं तरी चाळा करावासा वाटतो. अशा प्रका-

रची बडबड करण्याची ज्याला संवय आहे, त्याला अनेक अडचणी व त्रास उत्पन्न होतात. ज्याला उद्देशून ती बडबड असेल, त्याच्या मनांत तर त्वेष उत्पन्न होतो व प्रसंगविशेषीं त्या दोघांत कलह माजतो व पूर्वीची थोडीशी सहज नाहींशी होण्यासारखी चुरस असली तरी ती अशा बडबडण्यानें विनाकारण वाढते.

यासाठीं प्रत्येकानें निरंतर गोड भाषण करावें, अभद्र भाषणानें कोणीं आपली जीभ विटाळूं नये. ईश्वरानें आपणास जी सोन्यासारखी वाचा दिली आहे, ती कठोर भाषण करण्यास किंवा अपशब्द उच्चारावयास दिलेली नाहीं. तर ती ऐकणारास आनंद होईल व बोलणाराची मनोवृत्ति प्रफुल्लित राहील असें मधुर, रुचकर आणि गोड भाषण करण्याकरितांच दिलेली आहे.

श्लोक

प्रसवति बहुकामा घालवी दुर्दशेसी ॥
उपजवुनि सुकीर्ती दुष्कृतातें विनाशी ॥
सतत सदय माता मंगलाचीच मानूं ॥
सुकवि वदति वाचा सुनृता कामधेनू ॥

परशरामपंत गोडबोले

जीभ ही जशी श्रेष्ठ तशीच ती दुष्ट आहे!

झांथस नांवाचा एक तत्त्ववेत्ता होता. तो मोठा गुणग्राही होता. त्यानें ईसापास गुलाम म्हणून विकत घेतलें होतें.

एके दिवशीं सदर झांथस यानें आपल्या कांहीं स्नेह्यांस जेवावयाला बोलाविलें आणि ईसापास सांगितलें कीं, " सर्वांत उत्तम अशा पदार्थांचें जेवण तयार कर. " मंडळी जेवण्यास बसल्यावर पाहातात तों सर्व पदार्थ जिभांचे केलेले आहेत. झांथसनें " असें कां केलें?" म्हणून ईसापास विचारलें. तेव्हां ईसाप म्हणाला, " महाराज, जिभेसारखी उत्तम वस्तु कोणतीच नाहीं. आज जगांत तिच्यापेक्षां उत्तम वस्तु कोणती आहे. तिनें आपल्या मधुरपणानें जितक्या गोष्टी केल्या आहेत, तितक्या कोणीं-सुद्धां केल्या नसतील. सत्कार्य करण्यास प्रवृत्त करणारी परमेश्वराचे व सज्जनांचे गुण वर्णन करणारी तीच. सारांश-सर्व वस्तूंत तीच उत्तम शिवाय सगळ्यांत उत्तम वस्तूंचें जेवण कर म्हणून आपण आज्ञा केली होती. म्हणून तिचेच सर्व पदार्थ तयार केले. "

तें ऐकून झांथसनें, " बरें तर उद्यां सगळ्या जगांत दुष्ट व अधम अशा वस्तूंचें जेवण तयार कर " असा हुकूम त्यास केला.

पण दुसरे दिवशीं पाहातो, तों, पुनः सर्व पदार्थ जिभांचेच.

" अरे हें रे काय? " असें त्या धन्यानें ईसापास विचारलें. त्यावर ईसापानें उत्तर दिलें, " धनीसाहेब, सगळ्या वस्तूंत जीभ ही अधम आहे. जगांतलीं भांडणें, तंटे, गुन्हे या सगळ्यांचें मूळ या आपल्या जिभेंतच आहे. हिनें जितक्या आगी लावल्या आहेत तितक्या दुसऱ्या कोणीं लावल्या नसतील; तेव्हां जीभ ही जशी श्रेष्ठ व उत्तम तशीच ती दुष्ट व अधम आहे.

सारांश—जीभ श्रेष्ठ किंवा दुष्ट करणें हें प्रत्येकाच्या स्वाधीन आहे. तिचा सदुपयोग केल्यास ती श्रेष्ठ ठरून आपणास व दुसऱ्यास सौख्य होईल व तिचा दुरुपयोग केल्यास ती दुष्ट ठरून तिच्यापासून आपणास व इतरांस त्रास होईल.

प्रतिध्वनि.

जसा तुझा आवाज जंगलांत जातो, तसाच तो वाईट किंवा चांगला परत येतो.

जगू म्हणून एक लहान मुलगा होता. त्याला प्रतिध्वनी-विषयीं कांहींच माहीत नव्हतें. तो एके दिवशीं जंगलांत " हू, हूप" म्हणून मोठ्यानें ओरडला. त्या जंगलालगत-एक दरी होती तींतून कोणी तरी "हू, हूप असा जबाब दिल्याचें त्यानें लगेच ऐकिलें. त्यांचें त्याला आश्चर्य वाटून त्यानें "तूं कोण आहेस?" असा प्रश्न केला. आणि त्याचाच " तूं कोण आहेस" असा उलट प्रश्न आला. " कोण आहेरे मूर्ख मुलगा" असा जगू मोठ्यानें पुन्हा ओरडला. आणि त्या दरींतून " मूर्ख मुलगा" असा प्रतिध्वनि उमटला.

यावर जगू फार रागावला आणि मोठ्यानें शिव्या देत सुटला. त्या शिव्या प्रतिध्वनीच्या द्वारें जशाच्या तशाच परत आल्या. त्या काल्पनिक मुलाचा सूड उगवावा म्हणून

जगूनें सर्व जंगल धुंडाळलें; परंतु त्यास कोणीच सांपडलें नाहीं.

यावर जगू फार रागावून पळत आपल्या आईकडे गेला. आणि गाऱ्हाणें सांगूं लागला कीं, "या जंगलांतील झाडींत एक दुष्ट मुलगा लपला आहे, त्यानें मला शिव्या दिल्या.

आईनें सांगितलें "या वेळीं तूंच आपणा स्वतःस दोषी ठरविलेस. तूं आपल्या स्वतःच्या शब्दांच्या प्रतिध्वनी शिवाय दुसरें कांहींच ऐकिलें नाहींस. जर करतां तूं त्या झाडींत ममत्त्वाचें भाषण करतास, तर त्याच्याबद्दल तुला ममत्वाचेच शब्द परत मिळाले असते.

तात्पर्य.

या एकंदर आयुष्यांत आपणास असेच प्रसंग येतात. दुसऱ्यांचें जें काय वर्तन आपणाशीं घडतें, तें बहुतेक आपलें वर्तन त्यांच्याशीं घडतें त्याचा "प्रतिध्वनीच" असतें. आपण दुसऱ्यांशीं मित्रत्वानें वागलों तर दुसरेही आपणाशीं मित्रत्वानेंच वागतील. आपण जर त्यांच्याशीं दांडगेपणानें कपटानें, आणि शत्रुत्वानें वागलों तर, त्याचा मोबदला त्याहून जास्त चांगला मिळण्याची आपणांस आशा करणें नको.

———

[६] क्षमा.

क्षमाशस्त्र जया नराचिये हातीं ।
दुष्ट तयाप्रति काय करी ॥ १ ॥
तृण नाहीं तेथें पडला दावाग्नि ।
जाय तो विझोनि आपसया ॥ २ ॥
तुका म्हणे क्षमा सर्वांचें स्वहित ।
धरा अखंडित सुखरूप ॥ ३ ॥

तुकाराम.

कोणताही सद्गुण हा प्रशंसनीयच आहे. त्यांतल्या त्यांत क्षमा हा सद्गुण सर्वांत मोठा आहे. त्याची बरोबरी दुसरे फारच थोडे सद्गुण करूं शकतात. मनुष्याच्या हातून घडोघडीं अनंत पातकें घडत असतात. त्या सर्वांबद्दल जर परमेश्वरानें मनुष्याला शिक्षा करण्याचें मनांत आणिलें तर मनुष्य एक पळही वांचूं शकता ना. परंतु आपल्या हातून पातक घडलें व जर आपणाला त्याबद्दल पश्चात्ताप वाटून आपण परमेश्वराला शरण गेलों तर तात्काल तो आपणास त्या पातकाबद्दल क्षमा करितो. परमेश्वराच्या अंगीं क्षमा हा गुण वास करीत आहे म्हणून भाविक लोक देवाला आई असें म्हणतात, व कृतकर्माबद्दल त्याला अनन्यभावें शरण जातात. व परमेश्वरही अशा भावीक लोकांना त्यांच्या अपराधांची तात्काल क्षमा करितो. यावरून असें सिद्ध होतें कीं क्षमा करणें हा दैवी सद्गुण

आहे, व क्षमा न करणें हा राक्षसी दुर्गण आहे. म्हणून मनुष्यानें आपल्या अंगीं क्षमा हा गुण आणण्याचा फार प्रयत्न केला पाहिजे.

ज्या मनुष्याच्या हातून चूक होत नसेल त्यानें पाहिजे तर दुसऱ्यास क्षमा न केली तर चालेल. परंतु या जगाच्या पाठीवर ज्याच्या हातून चूक होत नाहीं असा एकही मनुष्य सांपडावयाचा नाहीं. जोंपर्यंत मनुष्याच्या हातून चूक होणें संभवनीय आहे, तोंपर्यंत दुसऱ्यास त्याच्या चुकीबद्दल क्षमा करणें हें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म होय. मनुष्याच्या अंगीं क्षमा नसेल तर जगांत फारच अनर्थ ओढवतील. दुसऱ्यानें अपराध केला असतां त्याबद्दल त्याला क्षमा करून त्याजवर उलटी दया करणें हें अत्यंत थोरपणाचें चिन्ह होय.

क्षमेच्या योगानें मनुष्य देवपणा पावतो. क्षमेच्या योगानें मोठमोठे अनर्थ टळतात. क्षमा व दया यांच्या योगानें शत्रूंचे मित्र होतात. पण क्षमा न करतां सूड उगविण्याची इच्छा मनुष्यानें धरल्यास अनर्थाची परंपरा ओढवते. क्षमाशील मनुष्यास सर्व लोक वंदनीय मानतात. क्षमा हें साधुत्वाचें मुख्य लक्षण आहे. ज्याच्या अंगीं क्षमा व दया हे गुण नाहींत तो साधुच नव्हे. ज्या मानानें मनुष्याच्या अंगीं क्षमा अधिक त्या मानानें तो अधिक श्रेष्ठ. मानव जातीपेक्षां अनंतपट अधिक क्षमा देवाच्या अंगीं आहे म्हणूनच तो सर्वांहून श्रेष्ठ आहे. देवाच्या खालोखाल राजा हाच श्रेष्ठ मानिला आहे. परंतु हें राजाचें श्रेष्ठत्व त्याच्या वैभवांत नसून क्षमेंतच आहे.

क्षमाशील अंतःकरण असणें ही सर्वांत मोठी ईश्वरी

देणगी आहे. क्षमा ही राजदंड धारण करणाऱ्यास जशी शोभते तशी ती सामान्य मनुष्यासही शोभते. जे बलवान् आहेत त्यांस तर क्षमा अधिकच भूषणावह होते. ईश्वरानें मनुष्यास ज्याप्रमाणें बुद्धि ही देणगी दिली आहे, त्याप्रमाणें क्षमा ही देणगी त्यानें फक्त मनुष्यासच दिली आहे. पशुपक्ष्यांत क्षमा करण्याचा धर्म आढळून येत नाहीं. म्हणून मनुष्यानें क्षमा धारण करावी हें त्यास उचीत आहे. त्यानें जर क्षमा धारण केली तर त्यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं. परंतु तोच जर क्षमा धारण न करील तरच आश्चर्य आहे. कारण क्षमा धारण करणें हें मनुष्यत्व आहे, व ती न धारण करणें हा पशुपणा आहे. क्षमा धारण करण्यास कांहीं खर्च लागत नाहीं. किंवा मोठी विद्या संपादन करावी लागत नाहीं. थोड्याशा विचारानें ती सहज प्राप्त होण्यासारखी असते.

महान् साधु तुकाराम महाराज यांचा क्षमाशीलपणा तर सर्वश्रुतच आहे. त्याचप्रमाणें रामदास स्वामी व साक्रेटीस यांचा क्षमाशीलपणा जागोजाग कसोटीस लागलाच आहे. ज्याप्रमाणें साधुलोक क्षमाशील असतात त्याचप्रमाणें कित्येक राजदंड धारण करणारे राजेही क्षमाशील असतात हें अधिक होय. तैमुरलंग फार क्रूर व कडक होता. तरी त्यानें एके ठिकाणीं आपणाविषयीं असें लिहून ठेविलें आहे कीं " जेव्हां माझे शत्रु दांतीं तृण धरून मला शरण आले, तेव्हां मीं त्यांस त्यांच्या अपराधाची क्षमाच केली आहे. " पाहा केवढें आश्चर्य आहे! जो रणांगणांत उभा राहिला म्हणजे हजारों लोकांचे प्राण एका क्षणांत घेत असे, तोच

तैमुरलंग शरण आलेल्या लोकांचें रक्षण करीत असे. ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे.

अहिल्याबाई होळकरीण ही महासाध्वी पतिव्रता होती. ती सहसा कोणास देहांत शासन करीत नसे. ती म्हणे " ज्या प्राण्यास परमेश्वरानें उत्पन्न केलें आहे त्यास आपण कसें मारावें. " व ती वारंवार म्हणे कीं, " जीव घेण्यापेक्षां क्षमा करणेंच मला अधिक आवडतें. " खरें आहे. जोंपर्यंत मनुष्याला प्राणी उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नाहीं, तोंपर्यंत कोणाताच प्राणी मारूं नये हें इष्ट आहे.

एखाद्यानें आपला अपराध केला तर त्यास आपण क्षमा करावी. अशा वेळीं जर आपलें मन त्यास क्षमा करण्यास तयार नसेल, तर आपण असा विचार करावा कीं, दुसऱ्यांनीं जर आपल्याशीं असेंच खुनशीपणाचें वर्तन केलें तर त्यापासून आपलें हित होईल काय? थोर पुरुष आहेत ते केव्हांही क्षमा सोडीत नाहींत. क्षमा ही अशक्तांचें बल व सशक्तांचें भूषण आहे. क्षमेच्या योगानें पाहिजे त्यास वश करून घेतां येतें. क्षमावान् पुरुषास या जगांत असाध्य असें कांहीं नाहीं. सर्व पांडवांमध्यें धर्मराजाची योग्यता मोठी कां? तर तो केवळ मूर्त्तिमंत क्षमेचा अवतारच होता. एकेवेळीं भीम गदा घेऊन भर सभेंत कौरवांचा नाश करण्यास उद्युक्त झाला. त्या वेळीं त्या धीरोदात्त क्षमाशील पुरुषाच्या मुखांतून पुढील उद्गार बाहेर पडले.

जरी क्रोध नावरे तुझिया चित्ता ।
तरी गदा ओपीं गा माझिया माथा ॥

मुक्तेश्वर.

या क्षमाशील धर्मराजाचे असे किंवा यांहून जास्त उदात्त व गंभीर प्रसंग भारतांत जागोजाग आढळून येतात. त्या सर्वांचें येथें वर्णन करणें शक्य नाहीं. असो. सारांश, क्षमा हा सद्गुण फार चांगला आहे. व त्याचें फलही मोठें आहे. क्षमेच्या योगानें सदाचरण घडतें, व सदाचरणाच्या योगानें स्वर्ग प्राप्ति होते. म्हणून क्षमा हा गुण प्रत्येकानें संपादन करावा.

क्षमाशील महाराणी.

महाराणी व्हिक्टोरीआ ह्या गादीवर बसल्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्यांचे मुख्य प्रधान डयूक ऑफ वेलिंगटन् यांनीं एका मनुष्यास फांशी देण्याच्या हुकुमावर सही करण्याकरितां एक कागद त्यांच्या पुढें ठेविला. महाराणी साहेबांचा असल्या हुकुमावर सही करण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. ती शिक्षा एका पलटणींतील शिपायास द्यावयाची होती. कारण तो तीन वेळ पलटणींतून पळून गेला होता. तो हुकूम महाराणी साहेबांनीं चार वेळ वाचून पाहिला. तेव्हां त्यांस अतिशय वाईट वाटून त्यांचे डोळे पाण्यानें भरून आले. त्यांनीं हातांत टाक धरला. व तो दौतींत बुडवून सही करण्याच्या विचारांत होत्या. पण सही करण्यास त्यांचा हात धजेना. कागदापर्यंत हात जाई, पुन्हां मागें येई असें दोन चार वेळ झाल्यावर त्या डयूक साहेबाकडे पाहून म्हणाल्या "काय हो, तुम्हांला या अपराध्याच्या वतीनें कांहींच का बोलतां येत नाहीं?"

डयूकसा० म्हणाले– " नाहीं सरकार ! पलटणीचा नियम मोडून तो तीन वेळ पळून गेलेला आहे. "

तरी महाराणी साहेबांचा हात सही करण्यास धजेना. त्या मोठ्या अडचणींत पडल्या. त्यांना "इकडे आड व तिकडे विहीर " असें झालें. एका बाजूला दया व क्षमा, व दुसऱ्या बाजूला देशाचा कायदा. या दोन बिकट दरींच्यामध्यें त्या अडकल्या. या चिमट्यांतून बाहेर कसें पडावें याचा त्या मनांतल्या मनांत विचार करूं लागल्या व पुन्हां त्या डयूक साहेबास म्हणाल्या-"याच्या अंगीं एकही गुण तुम्हांला सांपडत नाहीं असें कसें होईल ? याच्या अंगीं एखादा तरी गुण असलाच पाहिजे. ज्याच्या अंगीं एकही सद्गुण नाहीं, तो मनुष्य कसला! पाहा नीट विचार करून, एखादा गुण असल्यास सांगा. " यावर डयूक म्हणाले—

" महाराज, तो मनुष्य फार चांगल्या चालीचा असून शूर आहे अशाबद्दल मला दोन तीन साक्षीदारांनीं सांगितलें आहे. "

" तर मग शौर्य व चांगली वर्तणूक हे दोन गुण क्षमा करण्यासारखेच आहेत.

आपण हे दोन गुण माझ्या नजरेस आणले याबद्दल मी आपली फार आभारी आहें. "

असें ह्मणून मोठ्या आनंदानें पुढें ठेविलेल्या हुकुमाच्या कागदावर " क्षमा केली आहे," असें मोठ्या ठळक अक्षरांनीं लिहून राणीसाहेबांनीं त्याखालीं आपली सही केली.

———

शत्रुनाशाचा उत्तम उपाय.

कोणे एके वेळीं चीन देशामध्यें एक मोठें बंड झालें आणि तेणेंकरून बादशाहास फार त्रास होऊं लागला. तेव्हां त्यानें आपले सगळे सरदार दरबारामध्यें बोलावून आणून बंडवाल्यांवर स्वारी करण्याचा निश्चय केला; आणि मोठ्या आवेशानें असें म्हटलें कीं, " बंडखोर आमचे शत्रु आहेत, त्यांचा समूळ नाश केल्यावांचून परत यावयाचें नाहीं. " नंतर बादशहाचा क्रोध पाहून ते बंडवाले भ्याले आणि त्यास शरण आले. त्यांस बादशहानें त्यांच्या अपराधाची क्षमा केली; येवढेंच केवळ नव्हे, तर ते शुद्धीवर आले म्हणून त्यांस एक चांगली मेजवानी देण्याचा विचार ठरविला. तें पाहून त्याचा मुख्य प्रधान त्यांस म्हणाला—"महाराज, आपण दरबारामध्यें त्या दिवशीं बोललां काय, आणि आज हें करतां काय ? शत्रूंचा समूळ नाश करावयाचा ना ? " त्यावर थोडें हंसून बादशहानें उत्तर दिलें—"होय, शत्रूंचा समूळ नाश करावयाचा असें मीं म्हटलें होतें, तें मीं शब्दशः खरें केलें आहे. पहा, आतां हे लोक माझे शत्रु नाहींत; हे माझे मित्र झाले आहेत; त्यांचा मीं नाश केला तर बोललों एक आणि केलें एक असें होऊन मित्रघाताचें पातक माझ्या माथीं येणार नाहीं काय ? " हें भाषण ऐकून तो मुख्य प्रधान निरुत्तर झाला.

सूक्ष्मावलोकन.

बुद्धि संस्कृत व्हावयास व तिचा विकास व्हावयास वाचन व प्रवास हीं जितकीं अवश्य आहेत, तितकेंच किंबहुना जरा जास्त सूक्ष्मावलोकन हें अवश्य आहे. वाचन, प्रवास व सूक्ष्मावलोकन हे तीन आत्माशिक्षणाचे मार्ग आहेत. यांचा परस्पर फार निकट संबंध आहे, म्हणून सूक्ष्मावलोकनासंबंधानें थोडेंसें येथें सांगतों.

स्वतःविषयीं, दुसऱ्याविषयीं किंवा जगांतील कोणत्याही वस्तूविषयीं जें मनःपूर्वक, बारकाईनें व शोधक बुद्धीनें लक्ष देऊन पाहाणें तें सूक्ष्मावलोकन होय. असें अवलोकन करण्याची संवय लहानपणीं सर्वांस सारखी असते असें दिसतें. कारण मुलें हीं लहानपणीं फार जिज्ञासु असतात. कोणतीही गोष्ट पाहिली किंवा ऐकली म्हणजे तीं तिजविषयीं साहजिक अनेक प्रश्न विचारतात. अशा वेळीं त्यांना दरडावून किंवा रागेंभरून त्यांचा हिरमोड करू नये. त्यांच्या या जिज्ञासेला जेथल्या तेथें दडपून टाकूं नये. तर अशा वेळीं त्यांच्या या शोधक बुद्धीस योग्य वळण देऊन त्यांना अवलोकनाची संवय लावावी. त्यांना अशी संवय लावणें म्हणजे सृष्टींतील ज्ञानसागरांत त्यांना पोहण्याचा पहिला धडा घालून देणेंच होय. कारण ज्ञानाप्राप्तीमध्यें निरीक्षण म्ह० अवलोकन ही पहिली क्रिया आहे. ज्या वस्तूचें ज्ञान प्राप्त करून घ्यावयाचें ती प्रथम इंद्रियगोचर झाली पाहिजे. मुलें आपल्याकडून वस्तुनिरीक्षण करण्याकरितां यत्न करीत असतात.

लहान मुलांचें एखाद्या वस्तूकडे लक्ष्य वेधलें म्हणजे तिचें अधिकाधिक ज्ञान करून घेण्याची त्यांस इच्छा होते. अशा इच्छेची प्रेरणा झाली म्हणजे मूल ती वस्तु तोंडांत घालून तिची चव घेऊन बघतें; तिला स्पर्श करून ती मऊ आहे किंवा टणक आहे, खडबडीत आहे किंवा गुळगुळीत आहे, कठीण आहे किंवा ठिसूळ आहे, असा नानाप्रकारचा अनुभव घेतें; इकडे तिकडे ती फेंकून बघतें. अशा तऱ्हेनें शक्य तितकें त्या वस्तूचें ज्ञान स्वतःच प्राप्त करून घेण्याचा यत्न करतें. अगदीं लहान मुलांची ही गोष्ट झाली. पुढें तें जरा जाणतें झालें, त्यास चांगलें बोलतां येऊं लागलें म्हणजे त्याची ही जिज्ञासा म्हणजे जाणण्याची इच्छा इतक्यानेंच तृप्त होत नाहीं. मग तें वडील माणसास त्या वस्तूचें नांव व तिचा उपयोग याबद्दल प्रश्नावर प्रश्न विचारीत सुटतें; व अशा प्रकारें विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें ऐकून तें ज्ञान अंतःकरणांत सांठवून ठेवण्याचा यत्न करतें. अशा तऱ्हेनें बालकांस ज्ञान प्राप्त करून घेण्याची ही उपजतबुद्धि परमेश्वरानें त्यांचे ठिकाणीं ठेवलेली असते.

पण आईबाप, पालक व शिक्षक यांना ही ईश्वरी योजना माहीत नसली कीं, अगोदर मुलांस ते प्रश्नच विचारूं देत नाहींत. व मोठ्या मेहरबानीनें कांहीं प्रश्नांचें उत्तर दिलेंच व तोच तो प्रश्न मुलांनीं पुनः विचारला तर ते त्रासतात; व मुलेंही पुढें भीतीनें असे प्रश्न विचारीतनाशीं होतात. म्हणून त्यांच्या निरीक्षणशक्तीची वाढ खुंटूं लागते. मुलें घरांतले घरांतच, अगर फार झालें तर घराचे आसपास हिंडलीं तर त्यांचे नजरेसमोर तेच ते

देखावे येत जातात. यामुळें अवलोकनास भरपूर वाव न मिळून त्यांची निरीक्षणशक्ति मंदावते; व तीं किरकिरीं व त्रासिक होतात. मुलांना बाहेर दूर जाण्याची जी हौस असते तिचें कारण, त्यांना नवीन नवीन देखावे बघण्याची इच्छा असते. ती इच्छा पूर्ण करण्याचा पालकांनीं शक्य तितका प्रयत्न केला पाहिजे. मुलांना रोजच्या रोज सकाळ-संध्याकाळ गांवाबाहेर मोकळ्या हवेंत, कधीं डोंगरावर, कधीं नदीकिनाऱ्यावर, कधीं बागेंत असें फिरावयास न्यावें. सारांश—शक्य तितके चमत्कृतिजनक सृष्टीचे देखावे मुलांचे नजरेस येतील अशी योजना करावी. मुलांना बाहेर नेल्यानंतरही त्यांस कोंडल्यासारखें वाटूं देतां कामा नये. व बाहेर नेल्यावर ज्या वस्तु विशेष पाहाण्यासारख्या असतील त्यांकडे त्यांचें लक्ष्य वेधेल असें केलें पाहिजे. नंतर मुलें जे जे प्रश्न विचारतील त्यांचीं उत्तरें देऊन त्यांचें समाधान करावें; म्हणजे त्यांची शरीरप्रकृति चांगली राहून त्यांची निरीक्षणशक्तीही वाढेल. अशा तऱ्हेनें लहान मुलांच्या अवलोकन करण्याच्या संवयीचें पोषण केलें म्हणजे ती त्यांची संवय हळुहळू वाढत जाऊन मनुष्य चौकस, बहुश्रुत व बुद्धिमान् होतो.

पुढें थोर वयांत प्रत्येक मनुष्य या भूतलावर आपल्या परिस्थितीप्रमाणें अनेक वस्तु पहातो; परंतु या नुसत्या पाहाण्यानें त्यानें आपल्या नेत्रांचा खरा उपयोग केला असें क्वचितच म्हणतां येईल. कोणतीही वस्तु आपण पाहिली म्हणजे तिचें सूक्ष्मावलोकन झालें असें म्हणतां येणार नाहीं. म्हणून कोणतीही वस्तु आपले नजरेस पडली म्हणजे तिचें

नुसतें बाह्य स्वरूप न पाहातां त्या वस्तूचे गुणधर्म समजावून घेण्याचा प्रयत्न करावा. ती कशी बनलेली आहे, ती अशीच कां आहे, ह्यापेक्षां भिन्न स्थितींत असती तर काय झालें असतें, इचें कायमचें व सतत टिकणारें हेंच स्वरूप आहे काय? वगैरे सर्व गोष्टींचा बारकाईनें शोध करावा व अशा शोधापासून प्राणिमात्रांचे सुखांत भर कशी घालतां येईल हें मुख्यत्वेंकरून पहावें. असें केलें तरच आपण आपले नेत्रांचा ती वस्तु पाहाण्याकडे खरा उपयोग केला असें म्हणतां येईल.

शहाणपण जसें चांगल्या पुस्तकांच्या वाचनानें येतें, तसेंच तें सभोंवार चाललेल्या परिस्थितीच्या अवलोकनानें-ही प्राप्त होतें. कित्येक असामान्यबुद्धीचे लोक जगाचा व्यवहार काळजीपूर्वक अवलोकन करूनच अलौकिक कार्यें करण्यास समर्थ होतात. प्लेटो व अरिस्टॉटल या नांवाचे दोन फार प्रख्यात तत्त्ववेत्ते यूरोपखंडांत होऊन गेले. त्यांच्या वेळीं विश्वविद्यालयें नव्हतीं; तरी त्यांचे तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ आजही जगास चकित करून सोडीत आहेत. न्यूटनला गुरुत्वाकर्षणाचा नियम लोकांनीं लिहिलेलीं पुस्तकें वाचून सांपडला नाहीं. समाजाचें, व्यक्तीचें व भोंवतालच्या परिस्थितीचें निरीक्षण करूनच शेक्सपिअरनें जगास वेड लावून सोडणारीं नाटकें लिहिलीं आहेत. आबालवृद्ध, सुशिक्षित व अशिक्षित यांना सारखाच भक्तिरस व ज्ञानामृत पाजणारा सुप्रसिद्ध गाथाग्रंथ लिहिण्यास तुकाराम महाराज फारच थोडें वेदांतशास्त्र व काव्यशास्त्र पढले असतील. शिवाजी महाराजांनीं युद्धशास्त्र व राजकारणशास्त्र यांवरील ग्रंथ फारच

थोडे वाचले असतील. डॉक्टर सर रवींद्रनाथ टागोर हे विश्वविद्यालयाच्या पदव्यांनीं फारच थोडे विभूषित झाले असतील. तेव्हां साहजिक असा प्रश्न उद्भवतो कीं, यावच्चंद्रदिवाकरौ जगन्मान्य होण्याइतकें असामान्य शहाणपण या लोकांनीं कोठून पैदा केलें? तर त्यांनीं तें वाचनाबरोबरच भोंवतालच्या परिस्थितीचें व सृष्टीचें सूक्ष्मावलोकन करूनच मिळविलें.

सृष्टि ही सर्व ज्ञानाचा सांठा आहे. ती ईश्वर निर्मित मोठा ग्रंथच आहे. या ग्रंथाच्या अवलोकनापासून मोठें सुख व ज्ञान प्राप्त होतें. या सृष्टिरूपी ग्रंथाचे आकाश, चंद्र, सूर्य, तारे, पर्वत, नद्या, समुद्र, सरोवरें, मनुष्य, पशु, पक्षी, कीटक, झाडें, वेली, फुलें वगैरे असंख्य भाग आहेत. त्या प्रत्येक भागाच्या अवलोकनापासूनच विद्वानांनीं प्राणिमात्रांच्या सुखांत आजवर भर घातली आहे.

ज्या थोर पुरुषांनीं आपल्या नेत्रांचा खरा उपयोग करून अद्भुत शोध लावले व प्राणिमात्रांच्या सुखांत भर घातली अशीं कांहीं उदाहरणें थोडक्यांत पुढें देतों.

वाफेच्या शक्तीचा शोध.

लंडन टॉवरमध्यें सुमारें दोनशें वर्षांपूर्वीं मार्किस ऑफ वुरसेस्टर या नांवाचा एक इसम कैदी होता. त्यानें किटलीच्या तोंडांतून वाफ (आंतील पाण्यास आधण आल्यामुळें) बाहेर येत असलेली पाहिली. तेव्हां त्याचे मनांत असें आलें कीं, ह्या किटलीची तोटी व झांकण बंद करावें व काय

परिणाम होतो तो पहावा. तोटी व झांकण बंद केल्यावर ती किटली फुटून गेली. यावरून वाफेची शक्ति फारच मोठी आहे असें त्याचे लक्षांत आलें. व वाफेनें चालणारें इंजिन त्यानें तयार केलें. परंतु हा शोध प्रथमच लागल्यामुळें त्यांत बरेंच वैपुण्य राहून गेलें.

पुढें इ० स० १७३६ मध्यें स्कॉटलंड देशांत जेम्स् वॅट नांवाचा एक इसम जन्मला. तो लहान असतां त्यानें वर सांगितल्याप्रमाणें किटलीचे तोंडांतून वाफ येत असतां पाहिली. नंतर वाफेचे शक्तीबद्दल त्यानें फारच परिश्रम करून प्रयोग करून पाहिले. व वाफेच्या इंजिनमध्यें त्यानें महत्त्वाच्या सुधारणा केल्या. हल्लीं आगगाड्या, आगबोटी व मोटारी वगैरे प्रवासाचीं जीं सुलभ साधनें आपणांस लाभलीं आहेत, तीं वर लिहिलेल्या शोधांचीं फळें आहेत, हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

लोंबता पूल.

कॅपटन् ब्राऊन या नांवाचा एक थोर पुरुष युरोपखंडांत होऊन गेला. तो एके दिवशीं सकाळीं आपले बागेंतून फिरत असतां एक कोळ्याचें जाळें हवेंत लोंबत असलेलें त्यानें पाहिलें. बराच वेळ विचार केल्यावर त्यास असें वाटलें कीं, लोखंडी तारेचा त्या जाळ्याच्या नमुन्याप्रमाणें एक लोंबता पूल बांधतां येईल. शेवटीं त्यानें पुष्कळ परिश्रम करून एक लोंबता पूल तयार केला व या त्याच्या कृतीस चांगलें यश आलें.

टेम्स् नदीचा बोगदा.

भुंगे लांकडांस वाटोळीं भोंकें पाडतात असें आपण नेहमीं पाहातों; परंतु या गोष्टीचें आपणांस कांहीं आश्चर्य वाटत नाहीं अगर या प्राण्यांचे कृतीपासून कांहीं नवीन शिकण्यासारखें आहे किंवा कसें याबद्दल विचार करण्याचें आपले मनांत सुद्धां येत नाहीं.

शिप्वर्म म्हणून एक किडा आहे. तो गलबतांचे फळ्यांस भोंकें पाडतो. असा एक किडा भोंक पाडीत असतां सर इसाम्बार्ड ब्रुनेल या नांवच्या एका गृहस्थानें पाहिला. त्यानें त्याच्या या कृतीचें सूक्ष्म दृष्टीनें निरीक्षण केलें. व पुढें मोठ्या प्रमाणावर त्याच कृतीचें अनुकरण करून प्रसिद्ध टेम्स्-बोगदा बांधिला.

अशा रीतीनें अल्प वस्तूंचें योग्य निरीक्षण केलें तरच नेत्रांचा खरा उपयोग झाला असें म्हणतां येईल. कोणतीही वस्तु पहिल्यानें अगदीं क्षुल्लक दिसते. परंतु जसजसें त्या वस्तूचें निरीक्षण करीत जावें तसतशी त्या वस्तूची खरी किंमत आपणांस कळून येते व अनेक महत्त्वाचे शोध लावतां येतात. यासाठीं प्रत्येकानें निसर्गानें निर्माण केलेल्या वस्तु लक्ष्यपूर्वक पहाव्यात व आपआपल्या बुद्धिसामर्थ्याप्रमाणें त्यांचेपासून प्राणिमात्रांच्या सुखांत जास्त भर घालण्याचा प्रयत्न करावा.

हरवलेला उंट.

एक दरवेशी एका ओसाड मैदानांत एकटाच फिरत असतां त्यास दोन व्यापारी अकस्मात् भेटले. तेव्हां तो त्यांस म्हणाला-"तुमचा एक उंट हरवला आहे काय?" ते ह्मणाले-"होय-" दरवेशी म्हणतो "तो उजव्या डोळ्यानें आंधळा व डाव्या पायानें लंगडा होता काय?" "होय, तो तसा होता." असें व्यापाऱ्यांनीं उत्तर दिलें. दरवेशी आणखी विचारतो-"त्याचा पुढचा एक दांत पडला होता ना?" ते ह्मणाले-"होय-"दरवेशी आणखीं ह्मणाला--"त्याच्या पाठीवर एका बाजूला मधाचे बुधले व दुसऱ्या बाजूला धान्याचे गोण लादले होते काय?" ते म्हणाले"होय खरोखर तो तसाच लादलेला होता. आणि ज्याअर्थीं तूं त्यास नुकताच इतक्या बारकाईनें पाहिला आहेस—त्याअर्थीं तो कोठें आहे हें आम्हांस लवकर दाखीव." यावर दरवेशी म्हणाली,--"माझ्या मित्रांनों,तुमचा उंट कसला आहे तो मी डोळ्यांनीं आजवर केव्हांच पाहिला नाहीं; व तो होता अशाबद्दल या पूर्वीं कधीं ऐकलेंही पण नाहीं." तेव्हां ते व्यापारी म्हणाले-तो तूं आम्हांस दाखव अगर नको दाखवूं कारण ती अगदीं क्षुल्लक बाब आहे; पण त्याच्या पाठीवराल गोणींत रत्नें होतीं तीं कोठें आहेत? "मीं तुमचा उंटही पाहिला नाहीं व रत्नेंही पाहिलीं नाहींत" असें जेव्हां दरवेशी पुनः पुनः सांगूं लागला, तेव्हां त्यांनीं त्यांस पकडलें व काजीकडे घेऊन गेले.

तेथें काजीनें त्याची कसून झडती घेतली. पण त्याच्या जवळ कांहींही सांपडलें नाहीं; अगर त्याला चोरीबद्दल अथवा फसवणुकीबद्दल शिक्षा करण्यासारखा कांहीं पुरावाही मिळेना. तेव्हां हा चेटकी माणूस आहे असें म्हणून त्यावर काम चालविण्याच्या बेतांत ते होते; इतक्यांत तो दरवेशी मोठ्या शांतपणानें त्या न्यायाधिशास म्हणाला—“ तुमची अशी तारंबळ उडालेली पाहून मला मोठी मजा वाटते. व तुम्हांला माझ्याबद्दल असा संशय आला तोही अगदीं निराधार नाहीं हें मी कबूल करतों. मी पुष्कळ दिवस असाच एकटा रहात आहें; पण ओसाड मैदानांत सुद्धां अगदीं बारकाईनें पाहण्यासारख्या पुष्कळ गोष्टी मला आढळतात.

मी मैदानांतून चालत असतां उंटाचीं पावलें मला दिसलीं; पण उंटाच्या पाठोपाठ अगर आसपास मनुष्यांचीं पावलें उठलेलीं कोठेंही मला आढळलीं नाहींत. यावरून मीं असें ताडलें कीं, हा उंट आपल्या धन्यापासून सुटून गेला आहे. रस्त्याच्या फक्त डाव्या बाजूचा झाडपाला त्यानें खाल्लेला मला दिसला यावरून मला असें वाटलें कीं, तो उंट उजव्या डोळ्यानें आंधळा असावा. तो मागच्या डाव्या पायानें लंगडा असावा असें म्हणण्याचें कारण हें कीं, त्या पायाच्या खुणा वाळवंटावर अगदीं पुसट उठल्या होत्या. त्यानें जेथें जेथें गवत खाल्लें होतें, तेथें तेथें मध्येंच थोडेसें गवत अगदीं जसेंच्या तसेंच त्याच्या चाव्याच्या तडाक्यांतून वांचलें होतें. यावरून मी असें म्हणतों कीं, त्या प्राण्याचा एक दांत पडला होता. त्याच्या

पाठीवरच्या ओझ्याबद्दल जें मीं अनुमान काढलें त्यास कारण हें कीं, तो जेथें जेथें बसला होता तेथें तेथें त्याच्या एका बाजूला उद्योगी मुंग्या व दुसऱ्या बाजूला घों घों आवाज करणाऱ्या माशा यांचे थवेच्या थवे जमले होते. ”

हें ऐकून तो काजी खूष झाला व त्या दरवेशाच्या निरीक्षणशक्तीची तारीफ करून त्यानें त्यास सोडून दिलें.

———

(८) धारिष्ट.

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें ॥
मना बालणें नित्य सोशीत जावें ॥
रामदास.

कोणतेंही संकट आलें असतां त्याला धैर्यानें तोंड देणें ह्याला धारिष्ट म्हणतात. धारिष्ट हा फार महत्त्वाचा सद्गुण आहे. म्हणून तो सर्वांच्या अंगीं असणें अत्यंत जरूर आहे. प्रवासांत तर धारिष्टासारखा दुसरा मित्र नाहीं. ज्याच्या अंगीं हा गुण नाहीं, त्याला पुरुष हें नांव शोभत नाहीं. आपण होऊन कोणी सहसा आपले अंगावर संकट ओढून घेत नाहीं, पण अपरिहार्य कारणामुळें व अकस्मात् संकट-प्रसंग प्राप्त झाला, तर त्या वेळीं भित्रेपणा अगदीं दाखवूं नये. कारण, त्यामुळें तो प्रसंग अधिकच भीतिदायक व भयंकर होतो. अशा प्रसंगीं धैर्य धरणें हाच स्वसंरक्षणाचा उत्तम मार्ग होय. हितोपदेशांत यासंबंधानें असें म्हटलें आहे कीं;

तावद्भयस्य भेतव्यं यावद्भयमनागतम् ।
आगतं च भयं वीक्ष्य प्रहर्तव्यमभीतवत् ॥

म्हणजे जोंपर्यंत संकट आलें नाहीं, तोंपर्यंतच त्याची भीति बाळगावी; पण तें एकदां आलें म्हणजे धैर्य धरून त्याशीं टक्कर द्यावी.

शारीरिक, नैतिक व मानसिक गोष्टींत मार्दव हा जसा स्त्रीजातीचा मुख्य सद्गुण आहे, तसा या तिन्ही बाबतींत

मर्दपणा अंगीं असणें हा पुरुषवर्गाचा मुख्य पौरुष गुण आहे. यावरून स्त्रीजातींत हा गुण असूं नये असें मात्र होत नाहीं. जर दुर्दैवानें त्यांच्या अंगीं हा नसेल, तर ती गोष्ट क्षणभर क्षम्य होईल, इतकेंच काय तें. हा गुण ज्याचे अंगीं नसेल त्याचे बद्दल इतरांना फार तर दया वाटेल व कींव येईल; पण आदर वाटणार नाहीं. करितां धारिष्ट हा गुण अंगीं आणण्याविषयीं लहानपणापासूनच प्रयत्न करीत असावें. कारण राष्ट्रांत काय किंवा व्यक्तींत काय, इतर सात्त्विक व राजस सद्गुण कितीही वसत असले, तरी त्याचे अंगीं शौर्य, धैर्य, धिमेपणा, करारीपणा वगैरे क्षात्रधर्म कोणत्या तरी रूपानें वसत नसतील, तर त्याला जगांत कोठें-ही मान मिळणार नाहीं.

धैर्य व उत्साह हे गुण अंगीं असले तर मनुष्य आपल्या शहाणपणानें जगांत केवढाले अद्भुत चमत्कार करील याचा नेम नाहीं. पाहा! कोलंबसानें नवीन महाद्वीपाचा शोध लावण्यास आरंभ केला, तेव्हां नानाप्रकारचीं संकटें त्याच्या-वर आलीं, अज्ञानी लोकांनीं हसून त्याची टर उडविली; त्याच्या बरोबरच्या खलाशांनीं निराश होऊन त्यास समु-द्रांत टाकण्याचा प्रयत्न केला; तथापि त्यानें धैर्य सोडलें नाहीं. आपला बेत त्यानें तडीस नेला. यामुळें प्राणिमा-त्राचे सौख्यांत किती तरी भर पडली आहे, हें आपण आज पहातच आहों.

धैर्य व दया हे गुण वेगळे नाहींत; इतकेंच नव्हे, तर त्यांचा एकमेकांशीं अगदीं निकट संबंध आहे. कारण धैर्याशिवाय दयेचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. भित्रा मनुष्य दुस-

त्यास संकटांतून सोडविण्यास कसा पुढें येईल? जे मोठे शूर असतात ते तसेच दयाशीलही असतात.

धैर्यवान् कोणाला म्हणावयाचें? ज्याचे दोन्ही समर्थ बाहू कितीही भयंकर संकटपरंपरा प्राप्त झाली, सभोंवार विपन्नावस्थेचें कितीही विस्तृत जाळें पसरलेलें असलें, तरी त्यांचा चक्काचूर करून टाकण्यास नेहमीं तत्पर असतात त्यासच शत्रु असो किंवा मित्र असो; संकटाच्या वेळीं त्याचें रक्षण करण्याकरितां जो नेहमीं पुढें सरसावतो, ज्याला स्वतःच्या सौख्यापेक्षां दुसऱ्याच्या सौख्याची जास्त कळकळ वाटते तोच खरा शूर होय. असे शूर व थोर पुरुष कसाही प्रसंग असला तरी सावधपणा राखून चित्त शांत ठेवतात व संकटांतून दुसऱ्याची व आपली सुटका करितात. खरा शूर असतो तो मोठा उदार असतो. अंगीं धारिष्ट नसेल तर मनुष्य दुष्ट, खोटा, क्रूर, कुत्सित, निरुद्योगी व व्यसनी होतो. धैर्याशिवाय नीति व सदाचार हीं क्वचितच राहातात. धैर्यवान् पुरुष मोठे क्षमाशील असतात-संकटसमयीं कित्येकांची अशी घांदल होऊन जाते कीं, त्यांना त्या संकटांतून निभावण्याचा कांहींच उपाय सुचत नाहीं. यामुळें ते खबुतराप्रमाणें उगीच जिवास मुकतात. जेव्हां एखादें मांजर येतें, तेव्हां खबुतरें आपले डोळे मिटतात. त्यांना वाटतें कीं, आपण डोळे मिटले म्हणजे आपणांस मांजर दिसत नाहीं म्हणून मांजरास सुद्धां आपण दिसत नसूं ! मांजर पण त्यांना खाऊन टाकतेंच. तसे भ्यालात तर मांजर तुम्हांलासुद्धां त्रास देईल. खेड्यांतून हिंडतांना आपण यत्किंचित् जरी भ्यालों तरी कुत्रीं आपल्या अंगावर धांवून येतात;

तेच आपण निर्भयपणें चाललों व जरा धारिष्टाची ऐट आणून त्यांच्याकडे टक लावून पाहिलें कीं, लागलींच तीं शेंपूट खालीं करून पळून जातात; याचा अनुभव सर्वांस थोडा फार आहेच. त्याचप्रमाणें जर आपण धारि नें वागलों, तर वाघ, सिंह, लांडगा वगैरेवर सुद्धां सरशी मिळवूं. घरसोडीनें आणि भीतीनें आपण आपणांवर विनाकारण संकट ओढून घेतों. कोणत्याही प्रसंगानें चित्ताचा स्थिरपणा बिघडूं देऊं नये. कोणतेंही संकट संकटाच्या भीतीहून अधिक भयप्रद नसतें.

अविचारीपणा धारिष्टाहून फार भिन्न आहे, हें मात्र लक्षांत ठेवावें. संकटाविषयीं बेफिकीर असणें अथवा अचरटपणा करून विनाकारण वेळोवेळीं आपला जीव धोक्यांत घालणें ह्याचें नांव अविचारीपणा, व संकट प्राप्त झालें असतां धीरानें त्याला तोंड देणें ह्याचें नांव धारिष्ट. कोणतेंही अवघड काम निर्विघ्नपणें तडीस नेण्याच्या कामीं धारिष्टाचाच फार उपयोग होतो. पण तेंच काम अविचारी-पणानें केल्यास त्या कामाचा नाश होतो; एवढेंच नव्हे, तर असें करण्यापासून आपला जीवसुद्धां धोक्यांत येण्याचा फार संभव असतो. करितां कोणतेंही कठिण कार्य तडीस नेतांना संकट प्राप्त झालें असतां धैर्य धरून तें निभावणें हेंच मनुष्यास योग्य व हितकर आहे.

नेल्सनचा धीटपणा.

इंग्लंड देशांत नेल्सन नांवाचा एक मोठा सुप्रसिद्ध आरमारावरील सेनापति होऊन गेला. तो लहान असतांना एके दिवशीं, गांवापासून दूर असलेल्या एका ओढ्याच्या कांठीं पाण्याच्या प्रवाहाची मौज पहात सहज बसला होता. रात्र झाली, अंधार पडला, तरी त्याला त्या गोष्टीची खबरही नव्हती. शेंवटीं बरीच रात्र झाली तरी मुलगा अद्याप घरीं कां आला नाहीं ! म्हणून त्याची आई त्याचा शोध करीत करीत त्या ओढ्यापाशीं आली आणि त्याला घरीं घेऊन गेली. त्याला तिनें जातां जातां सहज विचारलें, "बाळा, तूं तेथें अंधारांत एकटा बसला होतास, तुला भीति कशी वाटली नाहीं?" त्यानें तिला उलट विचारलें, "आई, भीति कसली असते ग? मीं ती कधीं पाहिली नाहीं." लहानपणींसुद्धां ज्याला भीति हा कसला पदार्थ आहे हें ठाऊक नव्हतें, असा हा नेल्सन् पुढें शूर सेनापति झाला, यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं.

नेल्सन व पांढरें अस्वल.

नेल्सन सुमारें पंधरा वर्षांचा असतां त्याला त्याच्या चुलत्याबरोबर जहाजांतून आर्क्टिक महासागरांत जाण्याचा प्रसंग पडला. हा महासागर अगदीं उत्तरेकडे असून तो

नेहमीं बर्फमय असतो. लवकरच त्याचें जहाज बर्फांत अडकलें आणि त्याला त्यांतून बाहेर निघतां येईना. भोंवतालचें पाणी गोठून दगडासारखें कठिण झालें होतें. मध्यरात्रीं सुरेख चांदणें पडलें होतें. तेव्हां नेल्सन आणि दुसरा एक तरुण कामगार यांना दूर बर्फावर एक मोठें पांढरें अस्वल दिसलें. ते दोघे बंदुका घेऊन त्या अस्वलाच्या मागें लागले. दोन तास झाल्यावर ही गोष्ट त्या जहाजावरच्या कप्तानास कळली. तेव्हां त्यानें, त्यांनीं परत यावें म्हणून एका निशाणानें खूण केली. कारण एवढ्याशा दोन मुलांनीं पांढऱ्या अस्वलाशीं लढण्याचा प्रयत्न करणें फारच धारिष्टपणाचें काम होतें. त्या मुलांनीं कप्तानानें केलेली खूण पाहिली आणि ती पाहून नेल्सनचा सोबती माघारी फिरला; पण नेल्सन माघारी फिरेना. त्यानें अस्वलाशीं अगदीं लगट केली; पण त्याची बंदूक उडाली नाहीं. तेव्हां बंदुकीचा दांडक्यासारखा उपयोग करून तिनें त्या अस्वलाचा चांगला समाचार घ्यावा असें त्यानें मनांत आणलें; पण इतक्यांत अस्वल आणि नेल्सन यांच्यामध्यें बर्फाला मोठी थोरली एक भेग पडल्यामुळें त्याला अस्वलाजवळ जातांच येईना. तेव्हां तो जहाजाकडे हळूहळू येऊं लागला. तेव्हां "परवानगी घेतल्याशिवाय जहाजावरून कां गेलास"? म्हणून कप्तानानें त्याला विचारलें. नेल्सननें उत्तर दिलें. "माझ्या मनांत तें अस्वल मारून त्याचें कातडें बाबांना पाठवून द्यावयाचें होतें म्हणून मी गेलों."

धारिष्टवान् लेखक

एके दिवशीं लढाईच्या ऐन वेळीं तोफांची मारागिरी चालली असतां, सैन्याला हुकूम लिहिण्याकरितां कोणी लिहिणारा पाहिजे म्हणून नेपोलियल बोनापार्ट या शूर सेनापतीनें हाक मारली; तेव्हां त्याच्या स्वारीबरोबर जुनो नांवाचा एक इसम इतर सरदारांबरोबर होता, त्याचें अक्षर चागलें व तो जलद लिहिणारा म्हणून पुढें आला. व नेपोलियननें सांगितलेले शब्द त्यानें शाईनें कागदावर लिहून घेतले; इतक्यांत समोरून शत्रूकडून तोफेचा गोळा आला; तो जुनोच्या पयांपाशीं पडून त्याचे धडक्यासरशीं माती उधळली ती सर्वत्र पसरली व कागदावरही पडली. तेव्हां बिलकूल न कचरतां जुनो शांतपणें म्हणालाः—"महाराज, हें बरें झालें; आतां यावर वाळू घालण्याची जरूर नाहीं. ही त्याची हिंमत पाहून या वेळेपासून नेपोलियननें जुनोवर मेहर नजर ठेविली;व पुढें योग्य वेळीं या धैर्यवानाला त्यानें मोठ्या नांवलौकिकास चढाविलें.

———

(९) सहनशीलता.

संपत्कालीं कोवळें सज्जनांचें ॥
होतें चित्त ज्ञातिपंकेरुहाचें ॥
आपत्कालीं शैलही आदळो कां ।
थाके ना जें गाजवी धैर्य–डंका ॥१॥

वामन पंडित.

सहनशीलता म्हणजे सोशिकपणा. एवढीशी गोष्ट मनाविरुद्ध झाली, तर कांहींजण रुसतात; कित्येक अगदीं क्षुल्लक कारणाकरितां सुद्धां रागावतात व कित्येकांस तर अशी खोड असते कीं, थोडेंसें काम अगर श्रम जास्त पडले, कीं लागलीच ते मेटाकुटीस येतात. एवढेंसें संकट किंवा भय उत्पन्न झालें, तर कांहींजणांची अगदीं गाळण उडून जाते; पण अंगीं एक सोशिकपणा असला म्हणजे या सर्व गोष्टींचें कांहीं वाटेनासें होतें. म्हणून सहनशीलता हा सद्‌गुण अंगीं असणें फार चांगलें आहे. थोड्याशा प्रयत्नानें हा गुण अंगीं आणतां येतो; म्हणून तो अंगीं आणण्याचा प्रयत्न सर्वांनीं लहानपणापासून करावा हें फार उत्तम आहे.

पूर्ववयांत आपण अंगमेहनत आणि परिश्रम केले, तर शरीर सुदृढ होऊन आपलें बल वाढतें. पूर्ववयांत मेहनतीनें शरीर जितकें सुदृढ होतें, तितकें तें पुढें होत नाहीं. त्याचप्रमाणें तरुणपणीं करावे लागलेले श्रम व काबडकष्ट, सोसाव्या लागलेल्या आपत्ति, क्लेश आणि चिंता, यांच्या योगानें शरीर व मन हीं तयार होतात, त्यामुळें आपले निश्चय व प्रतिज्ञा तडीस

नेणेस आपण समर्थ होतों; व संकटांना टक्कर देतांना आपण बिलकूल डगमगत नाहीं. शरीराच्या सुदृढपणाला जशी शारीरिक परिश्रमाची आवश्यकता असते, तशीच मन तयार होण्यास आपत्ति आणि अडचणी यांची आवश्यकता लागते.

काबाडकष्ट, क्लेश आणि विपत्ति यांसारखा मनुष्याच्या मनाला शिक्षण देणारा उत्कृष्ट शिक्षक, दुसरा कोणताही नाहीं. शरिराचा व मनाचा दुर्बलपणारूपी रोग घालविण्यास यांच्या सारखा उत्तम वैद्य जगांत कोठेंही नाहीं. लोहार ज्याप्रमाणें लोखंड तापवून त्यावर घणांचे घावांवर घाव घालून त्याला आपल्या मनाप्रमाणें आकार देतो, त्याप्रमाणें काबडकष्ट, दुःख आणि संकटें हीं मनुष्याच्या शरिरावर व हृदयावर निर्दयपणें जोरानें आघात करून त्याला सुदृढ बनवीत असतात. त्यांच्या आघातांनीं आपण अगदीं गांगरून जाऊन हृदयद्रावक अशा आर्त स्वरानें त्यांतून सोडविण्याविषयीं आपण परमेश्वराची करुणा भाकतों; परंतु या संकटरूपी लोहारांच्या हृदयांत अणुमात्र दया नसते. त्यांचें घाव मारण्याचें काम सारखें चालूच असतें. परंतु त्या निर्दय आघातांचा परिणाम मात्र आपणाला न कळत आपल्या पथ्यावर पडत असतो. कारण त्यांच्या आघातांनीं शेंवटीं आपलें शरीर व मन हीं तयार होतात, हृदय सुदृढ बनतें, मनाच्या प्रवृत्ति स्थिर होतात व आपले निश्चय व प्रतिज्ञा लोखंडाप्रमाणें घट्ट होतात.

लहानपणापासून ज्यांचें उत्तम लालनपालन झालेलें असतें, दुसऱ्यांच्या प्रयत्नांनीं आणि परिश्रमांनीं ज्यांचे विद्याभ्यास होतात, ज्यांचें पूर्ववय ऐषआरामांत गेलेलें

असतें व ज्यांना कधीं श्रम, दुःख, चिंता व दुसऱ्यांचीं बोलणीं यांचा गंधही नसतो, अशीं माणसें शरीरानें व मनानें बहुतेक दुर्बळ असतात. अशा माणसांवर पुढें अडचणी उत्पन्न झाल्या तर तीं अगदीं गांगरून जातात व त्यांतून पार कसें पडावें हें त्यांस अगदीं सुचत नाहीं. म्हणून पूर्ववयांत जीं दुःखें दिसतात तीं दुःखें नव्हत, तर ते सोशिकपणाचे धडे शिकविणारे गुरूच आहेत असें समजावें. कारण जेव्हां आपणांवर दुःखें येतात, तेव्हां आपण सहनशीलतेचा एक प्रकारचा धडाच शिकत असतों. दुःखानें आपण दीर्घ निःश्वास टाकतों, तेव्हां आपण आपल्या उन्नतीची चढण चढत आहों असें समजावें.

दुःख होणें, तें विसरणें, अडचणी येणें, त्या नाहींशा होणें, निराश होणें, उमेद बाळगणें, वर चढणें, खालीं पडणें, खालीं पडल्यावर उठून पुन्हा वर जाण्याची इच्छा करणें, या सर्व गोष्टी रात्रीमागून दिवस व दिवसामागून रात्र याप्रमाणें सर्वसाधारण व नैसर्गिक आहेत असें समजावें. दिवस मावळल्यावर काळी कुट्ट रात्र आली म्हणून जसें आपण कधीं दुःख करीत नाहीं, त्याप्रमाणें सुखानंतर थोडेसे दुःखाचे दिवस दुर्दैवानें आल्यास, आपण त्याबद्दल अगदीं विषाद मानूं नये. दुःख, कष्ट, धडपड हीं अनिष्टें दिसतात, अंधकारमय वाटतात तथापि त्यांतच मोठेपणाची किल्ली अडकविलेली असते. कारण त्यांच्यामुळेंच ज्ञानाचा प्रकाश पडतो व उच्च कल्पना व उन्नति यांचा मार्ग दिसूं लागतो.

घर्षणाशिवाय चंदनाचा सुगंध सुटत नाहीं, तावल्याशिवाय सुवर्णाचें उज्ज्वल रूप दिसत नाहीं, त्याचप्रमाणें परिश्रम केल्याखेरीज व संकटें सहन केल्याखेरीज सदाचरणाचें खरें रूप कळावयाचें नाहीं. संकटें सोसणें हा सद्गुण वाढविण्याचा अभ्यासच होय. आरंभापासून सर्व गोष्टी यथास्थित असून ज्यांनीं मोठीं कृत्यें केलीं अशीं उदाहरणें इतिहासांत फारच थोडीं सांपडतील; परंतु पूर्वी संकटें, विपत्ति व दरिद्र यांची पीडा सोसून व अतिशय श्रम करून उदयास आलेल्या पुरुषांचीं उदाहरणें हजारों आहेत. व अशांचीं चरित्रें फार रमणीय असतात.

प्रथमच कार्यसिद्धि झाल्यानें मनुष्य तेवढेंच काम करून बहुतेक आळशी बनतो; परंतु योग्य परिश्रम करून अपजय आल्यानें अधिक उद्योग करून मनुष्य विलक्षण महत्त्वास चढतो. ज्याप्रमाणें कित्येक ठिकाणीं जमीन भाजली असतांच अंकुर जोरदार येतो, त्याप्रमाणें कित्येक वेळां संकटें व अडचणी ह्याच मनुष्याच्या हातून महत्कृत्यें करविण्यास कारण होतात.

म्हणून प्रत्येकानें मन व शरीर सुस्थितींत असतां पुढें प्राप्त होणाऱ्या अडचणीस तोंड देण्याची तयारी करीत असावें. सर्व गोष्टी यथास्थित असतील तेव्हां देहाला अशी संवय लावून ठेवावी कीं, पुढें दैववशात विपत्ति प्राप्त झाली असतां, तिचें त्यास कांहींच वाटूं नये. प्राचीन काळीं ग्रीक लोकांमध्यें मुलांच्या अंगांत लहानपणापासून

तकवा, जोम, सोशिकपणा इत्यादि मर्दुमकीचे गुण येण्याकरितां, त्यांचें निजणें, बसणें, आहार इत्यादिकांचें नियमन फार कडक रीतीनें केलेलें असे. असें शिक्षण रावापासून रंकापर्यंत सर्वांना आपल्या मुलांना अवश्य द्यावें लागे. अशी कडक शिक्षण देण्याची पद्धत जोंपर्यंत ग्रीक लोकांत चालू होती, तोंपर्यंत ते लोक मोठे वैभव व सुख भोगीत होते.

लहानपणापासूनच असें शिक्षण असलें म्हणजे मनुष्य प्रसंग पडेल तसा वज्राप्रमाणें कठिण व फुलाप्रमाणें मऊ बनतो; व जें जें करणें त्यास प्राप्त होईल तें सर्व तो कांहीं एक कुरकूर न करितां करीत असतो. ज्या ज्या वेळीं त्याच्यावर संकट गुदरून, त्याचे मनास पीडा होते, तेव्हां असा मनुष्य असें मानीत असतो कीं, आलेलें संकट हें दुर्दैव नसून तें धैर्यानें सहन करणें, या सारखें दुसरें सुख नाहीं. असा मनुष्य यशप्राप्ति झाली असतां गर्वानें फुगत नाहीं, किंवा अपयश आलें असतां हताश होत नाहीं, पण धीरानें, आशेनें व नेटानें यश प्राप्ति होईपर्यंत त्या कामाचा पिच्छा पुरविणें हें आपलें कर्तव्य आहे असें तो समजतो.

सोशिकपणणाचा संवय लावून घेण्यास प्रवास हें एक उत्तम साधन आहे. कारण प्रवासांत नेहमींच आपल्या मनाप्रमाणें व तब्येती प्रमाणें सर्व सोयी होतात असें नाहीं. कितीही श्रीमंत व अधिकारी पुरुष असला तरी त्यास प्रवासांत अडचणी या उत्पन्न होतातच. अशा अडचणीनें

मनुष्याच्या अंगीं सोशिकपणा सहजच उत्पन्न होतो, कोणत्याही प्रसंगीं मनुष्यानें निश्चयानें व नेटानें वागावें. प्रसंगीं तसें वागण्यासाठीं, त्या गोष्टीचा पूर्वीं बराच अभ्यास झाला पाहिजे. समरांगणामध्यें मागें पाय न घेतां शत्रूशीं निकरानें लढण्याचें धैर्य अंगीं यावें म्हणून शूर योद्धा शांततेच्या वेळीं सतत अभ्यासानें आपल्या ठिकाणीं तशी शक्ति उत्पन्न करीत असतो. परीक्षेच्या वेळीं सहा सहा तास एकाग्र मनानें प्रश्न सोडविण्याची तयारी अगोदरच पुष्कळ दिवस करावी लागते. ती ऐत्यावेळीं करूं म्हटलें तर साध्य होणार नाहीं. त्याच प्रमाणें पहिलवान लोक आपल्या सोबत्यांशीं रोजच्या रोज तालमींत झटूनच प्रतिस्पर्ध्यास कुस्तींत चीत करण्याचा दमदारपणा व सामर्थ्य वाढवीत असतात. हें सर्वांस माहीत आहेच.

त्या प्रमाणेंच पूर्व वयांत जितक्या अडचणी अधिक येतील व श्रम जास्त पडतील तितकी आपली सहनशक्ति जास्त वृद्धिंगत होते. अशी सहनशीलता वाढली म्हणजे चित्ताची शांति सहसा नष्ट होत नाहीं. श्रम व अडचणी सोसण्याचा एकदां सराव झाला म्हणजे त्यांची आपणास बिलकूल परवा वाटत नाहीं, उलट त्यामुळें शरीराचे निरनिराळे अवयव व मनाच्या पृथक शक्ति यांस संकट मूलक क्लेश सहन करण्याचा अभ्यास घडून त्यांस बळकटी येते. व पुढें पुढें तर संकटें, अडचणी व क्लेश यांचें कांहींच वाटेनासें होतें.

गरीबी, संकटें व दुःखें यांशीं झगडतांना अंगांत उद्योग साहस व डावपेच हीं येतात, व तीं पुढें पुढें वाढत जातात.

व त्यामुळें गरगर फिरणाऱ्या या जगरूपीं सहाणेवर मनुष्या-च्या अंगचे निरनिराळे गुणधर्म निरनिराळ्या बाजूनें सतत घासत राहातात, व शेवटीं ते फारच तीक्ष्ण होऊन तेजास चढतात. म्हणून संकटें वगैरे सोसून सहनशील बनलेला मनुष्य हा अष्टपैलूदार हिराच बनतो. व तो जेथें जाईल तेथें आपल्या अंगच्या गुणांनीं चमकूं लागतो.

" हें विषयांतर झालें. "

हेंडरसन् म्हणून इंग्लंडांत एक प्रसिद्ध नट होऊन गेला. तो मोठा सहनशील असे. ऑक्सफर्ड येथें असतांना एका विषयावर एकदां त्याचा आणि त्याच्या एका शाळें-तील सोबत्याचा वादविवाद चालला होता. वादामध्यें आप-ल्यावर बाजू येऊं लागली असें पाहून त्याचा सोबती अतिशय संतापला, आणि समोरच दारूनें भरलेला एक ग्लास होता तो घेऊन त्यानें हेंडरसनच्या तोंडावर फेकला. हेंडरसननें मुका-ट्यानें आपल्या खिशांतील हातरुमाल काढला व त्यानें तोंड पुसलें आणि शांतपणें म्हणाला " हें विषयांतर झालें, आतां चालूं द्या तुमचें काय म्हणणें आहे तें. "

अमूल्य वनस्पति.

दोघी मजूरदारिणी, भिमा आणि चिमा, फळांनीं भर-

लेल्या जड पाट्या डोकीवर घेऊन शहरांत गेल्या. जातांना वाटेंत भिमा वरचेवर कण्हूं, कुंथूं, व पुट् पुटूं लागली; परंतु चिमा तिची थट्टा करून हंसूं लागली.

भिमा म्हणाली, "तुला इतकें हंसूं कसें येतें ? तुझी पाटी माझ्या सारखीच जड आहे, आणि तूं म्हणजे माझ्यापेक्षां अधिक सशक्त आहेस असेंही नाहीं."

चिमानें उत्तर केलें, "मी आपल्या ओझ्यावर एक विशेष प्रकारची लहानशी वनस्पति ठेविली आहे; त्यामुळें या माझ्या ओझ्याचें मला कांहींच वाटत नाहीं."

भिमा म्हणाली, "खरेंच कां ? तर मग ती लहानशी परंतु विशेष मूल्यवान् वनस्पति असली पाहिजे ! तिच्या योगानें मला माझेंही ओझें हलकें करतां येईल. मी तुला हात जोडतें, ती वनस्पति काय आहे, ती कृपा करून मला सांग."

चिमानें पुनः तीस नीट समजावून सांगितलें "ती अमूल्य लहान वनस्पति, जी सर्व अवघड गोष्टी सवघड करते, जी सर्व असह्य दुःखें सह्य करते, जी जड ओझें हलकें फूल करते, जी कठोर व कटु बोलणीं ऐकून घेण्याची ताकद अंगीं आणते, ती वनस्पति सहनशीलता होय." आणखी पुढें ती म्हणाली:—

"बोजा सहन करण्याची धिमाई अंगीं असणें, तेणें होतें मोठ्या आनंदानें मार्ग क्रमणें."

———

सहनशील राजा.

फिलीप म्हणून एक राजा होता. त्याच्याकडे अथेन्स शहरच्या राजाकडून तह करण्याचे इराद्यानें कांहीं वकील आले. त्यांची व राजाची तहासंबंधानें बराच वेळ वाटाघाट झाली. परंतु तह होण्याचें दिसेना. तेव्हां फिलीप राजा कंटाळून उठला व उठतां उठतां त्या वकिलांस म्हणाला " आपलें कांहीं काम असेल तर सांगा. मी तें आनंदानें करीन.यावर त्या वकिलांनीं चिडून उत्तर दिलें " महाराज, जर आपण या वेळीं आत्महत्या कराल तर फार बरें होईल. हें त्यांचें भाषण ऐकून फिलिफ राजाचे सरदार लोक अगदीं खवळून गेले व त्या वकिलांचें पारिपत्य करण्यासाठीं राजाच्या हुकुमाची वाट पाहूं लागले. परंतु त्या सहनशील राजानें त्या वकिलांस उत्तर दिलें कीं, जा आणि आपल्या राजास सांगा कीं, " जे कोणी उर्मटपणाचे आणि अपमानाचे शब्द ऐकून घेऊन क्षमा करितात ते, असे शब्द बोलणाऱ्यांपेक्षां, शांतता राखण्यास अधिक पात्र असतात."

(१०) स्वावलंबन

यद्यत्परवशं कर्म तत्तद्यत्नेन वर्जयेत् ।
यद्यदात्मवशं तु स्यात् तत्तत्सेवेत यत्नतः ॥
सर्वं परवशं दुःखं सर्वमात्मवशं सुखम् ॥

मनु.

भावार्थः—दुसऱ्यावर अवलंबून कोणत्याही कामीं राहूं नये. आपल्या हिमतीच्या जोरावर नेहमीं कार्य करीत असावें. कारण परावलंबन हें दुःख व स्वावलंबन हें सुख असें (मनुनें) म्हटलें आहे.

स्वावलंबन म्हणजे आपण आपल्या स्वतःवर अवलंबून राहणें, आपली, समाजाची, व देशाची उन्नति यांसारखीं महत्कार्यें सिद्धीस नेण्यास स्वावलंबनासारखा दुसरा मित्र नाहीं. स्वावलंबनानें आपलें शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक बल वाढतें, जे कोणी आपल्या कामाकरितां दुसऱ्यावर अवलंबून राहतात, ते भित्रे व मनानें दुर्बल होतात. म्हणून प्रत्येकानें स्वावलंबी होण्याचा प्रयत्न लहानपणापासूनच केला पाहिजे. स्वतःच्या क्षुल्लक कामाकरितां सुद्धां दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग येणें यासारखी लाजिरवाणी दुसरी कोणतीही गोष्ट नाहीं. स्वावलंबनाच्या योगानें कोणाही मनुष्यास आपला चरितार्थ स्वतःच्या श्रमानें चालवितां येतो.

दुसऱ्यावर अवलंबून राहून त्यांचें सहाय्य घेण्याची आपणांस एकदां संवय लागली म्हणजे आपण निःशक्त व

परावलंबी होतों. कारण लोकांचें सहाय्य वारंवार घेतल्यानें आपल्या उद्योगावरील व कर्तबगारीवरील आपला भरंवसा उडतो; व आपल्याच हिमतीवर आपण आपलें कार्य तडीस नेऊं असा भरंवसा आपणांस वाटत नाहीं; व असें आपणांस एकदां वाटूं लागलें म्हणजे आपण वारंवार दुसऱ्याची मदत मागूं लागतों. असें नेहमीं केल्यानें आपण निर्बल होत जातों. पण स्वतःवर भरंवसा असला म्हणजे असें होत नाहीं.

जो विद्यार्थी आपले प्रश्न स्वतः सोडविण्याचा प्रयत्न करीत नाहीं, त्याची बुद्धि वाढत नाहीं. ती तशीच अपरिपक्व राहाते. त्याला आत्मविश्वास नसतो. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यानें आपले प्रश्न आपण स्वतःच सोडविण्याची खटपट प्रथम करावी; म्हणजे बुद्धि वाढून प्रत्येक विषयांत त्याची दिवसेंदिवस प्रगति होत जाईल. मनाला एकदां दुसऱ्यापासून मदत घेण्याची खोड लागली म्हणजे त्याचें स्वावलंबन अगदीं सुटतें. अभ्यासांत घडोघडीं अडचणी येणार, तेव्हां प्रत्येक घटकेस सल्ला देण्यास गुरु कोठून भेटणार ?

त्याचप्रमाणें आपले विद्याभ्यासाचे खर्चाचा भार होतां होईल तों दुसऱ्यावर पडूं देऊं नये. आपल्या या देशांतील बहुतेक विद्यार्थी आपल्या आईबापांवर अगर आप्तेष्टावर अवलंबून राहून विद्याभ्यास करितात. एखाद्या वर्षी त्यांना खर्चाला पैसे आईबापांकडून आले नाहींत कीं, त्यांचा अभ्यास बंद होतो. ज्या आईबापांना मुलांना शिक्षण देण्याचें सामर्थ्य नसतें त्यांचीं मुलें अशिक्षितच

राहातात. फारच झालें तर अशा आईबापांचीं कांहीं मुलें भिक्षांदेहीचें अवलंबन करून कसें तरी थोडेंबहुत शिक्षण संपादन करितात. परंतु अशा तऱ्हेनें शिक्षण संपादणें हा कांहीं स्वावलंबनाचा खरा मार्ग नव्हे. स्वावलंबनाचा खरा मार्ग म्हटला म्हणजे आपल्या स्वतःच्या बाहुबलावर कांहीं तरी उद्योगधंदा करून विद्याभ्यासाकरितां पैसे कमावून शिक्षण संपादन करणें हा प्रशस्त मार्ग होय. इंग्लंड, अमेरिका, जपान वगैरे सुधारलेले राष्ट्रांतील विद्यार्थी आपल्या आईबापांची मदत न घेतां आपल्या स्वतःच्या कर्तबगारीवर आपला विद्याभ्यास तडीस नेतात. ते स्वतः, छापखाने, गिरण्या, शेतें, खाणावळी वगैरे कारखान्यांत कामधंदा करून पैसे मिळवून विद्या संपादन करितात. प्रसंग विशेषीं श्रीमंत लोकांच्या घरीं भांडीं घासणें, दिवाबत्ती करणें, भिंती सारवणें, झाडलोट करणें यांसारखीं हलकीं सालकीं कामें पतकरून सुद्धां ज्ञानार्जनासाठीं ते द्रव्य संपादन करितात. वाडवाडिलांच्या कमाईवर अवलंबून न राहतां आपण स्वतः कांहीं तरी मिळविलें पाहिजे अशी त्यांची ठाम समजूत असते. स्वावलंबनानें जे कोणी विद्याभ्यास करितात त्यांना तिकडे सुशिक्षित लोक फार चाहातात, व सर्व ठिकाणीं त्यांचा गौरव होतो. म्हणून कित्येक कोट्याधिशांचे मुलगे सुद्धां तिकडे या रीतीनें पैसे मिळवून विद्या संपादन करितात. कारण आपण स्वतः काम करणें हें हलकें व कमी दर्जाचें आहे अशी त्यांची समजूत नसते.

हलकें काम करणाऱ्या लोकांचा दर्जा कमी असतो असें

समजणें हें अगदीं चुकीचें आहे. आपले स्वतःकरितां व दुसऱ्याच्या नडीआडीकरितां वाटेल तितकें हलकें काम करण्यास प्रसंगोपात प्रत्येकानें तयार असलें पाहिजे. याचा अर्थ इतकाच समजावयाचा कीं, मनुष्यानें मजूर होणें हें कांहीं त्याचें ध्येय नव्हे. पण हलकीं सालकीं श्रमाचीं कामें करण्याचा त्याला अभ्यास असला पाहिजे. कारण त्यापासून मनुष्य तरतरीत, चलाख, डौलदार व मजबूत होतो. इंग्लंड, अमेरिका, जपान वगैरे सुधारलेले राष्ट्रांत कांहीं सुशिक्षित मोठमोठे धनवान् लोकसुद्धां आपल्या मुलांना गिरण्या, गोदी वगैरे सारख्या कारखान्यांत काम करण्याला पाठवितात. व तीं मुलेंही कांहीं काळपर्यंत सदर कारखान्यांत व गिरण्यांत साधारण मजुरांप्रमाणें मोठ्या आनंदानें काम करितात. लहानपणापासूनच अशीं कामें करण्याचा सराव असला म्हणजे पुढें कितीही कठीण काम पडलें तरी मनुष्य घाबरत नाहीं, व तसा सराव नसला म्हणजे पुढें मनुष्याचें पदोपदीं फार नडतें.

स्वावलंबी लोक कितीही बिकट काम पडलें तरी डगमगत नाहींत. त्यांच्या ठिकाणीं पूर्ण आत्मविश्वास असतो. ते आपलें सर्व काम सुरळीत व धिमेपणानें करीत असतात. ते थोड्याशा साधनानें सुद्धां मोठमोठीं कामें सहज उरकतात. त्यांच्या अंगांतील सर्व गुणांचा पूर्ण विकास होतो. ते आपलीं सर्व कामें सरळ मार्गानें करितात. त्यांना असत्य व लांडीलबाडी अगदीं खपत नाहीं.

दुसऱ्यावर अवलंबून राहणारे लोकांचे विचार फार संकुचित असतात. त्यांना फारशी महत्त्वाकांक्षा नसते. असे

लोक आपलीं कामें लबाडी, आर्जव, किंवा खुशामत इत्यादि निंद्य मार्गांच्या अवलंबनानें करून घेतात. अशांच्या अंगीं असलेले थोडेबहुत गुणसुद्धां स्वावलंबनाच्या अभावीं कवडीमोल ठरतात. असे लोक ज्या समाजांत अगर देशांत असतात तो देश व तो समाज दुर्दैवीच समजला पाहिजे.

कित्येकांना आपलीं कामें स्वतः करण्यास लाज वाटते, म्हणून ते तीं कामें नोकराचाकरांकडून करवितात. पण स्वतःचीं कामें स्वतः करण्यांत लाज कसली आली आहे. लाज वाटलीच तर ती स्वतःच्या क्षुल्लक कामासाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्यांत किंवा दुसऱ्यावर अवलंबून राहण्यांत आहे. जीं कामें स्वतःला करतां येण्यासारखीं आहेत त्यासाठीं दुसऱ्याची मदत घेणें म्हणजे स्वतःचा दुर्बलपणा जाहीर करण्यासारखेंच आहे.

सुधारलेल्या राष्ट्रांतील शेतकरी सुद्धां आपल्या नशिबावर हवाला देऊन पावसाकडे डोळे लावून स्वस्थ बसत नाहींत. कारण ते पक्के स्वावलंबी असतात. ते एकजुटीनें नदी, नाले, व ओढे यांना धरणें वगैरे बांधून अशा प्रत्येक ईश्वर निर्मित साधनांचा आपल्या शेतकीकडे पूर्ण उपयोग करून घेतात. आपल्या पिकांच्या वाढीसाठीं ते नानातऱ्हेचे रासायनिक पदार्थ उपयोगांत आणितात. पिकाला कीड लागली म्हणजे कीड नाशक रासायनिक द्रव्यानें ते सर्व पिकांना स्नान घालतात. त्यामुळें सर्व कीड मरून जाते. थंडीच्या दिवसांत जेव्हां धुक्याची भीति असते तेव्हां ते शेतांत विस्तव पेटवून पुष्कळ धूर करितात. तो धूर वर

जाऊन थंडीमुळें एकेठिकाणीं जमतो व पिकांवर तंबूप्रमाणें आच्छादन करतो. व त्या योगानें पिकांचें धुक्यापासून संरक्षण होतें. पिकांची पैदास अधिक व्हावी म्हणून त्यांची सारखी खटपट सुरू असते. प्रत्येक मक्याच्या ताटाला पुष्कळ कणसें लागावींत असा त्यांचा प्रयत्न चालू असतो. त्याचप्रमाणें गायी म्हशींनीं पुष्कळ दूध द्यावें म्हणून ते बहुत प्रयत्न करितात. व त्यांच्या त्या प्रयत्नास यश येऊन घागरीच्या घागरी भरून दूध देणाऱ्या गाईम्हशी तिकडे पुष्कळ असतात. हें सर्व कशाचें फळ म्हणाल तर स्वावलंबनाचें होय.

मनुष्य कोठेंही असो, त्याची स्थिति कांहींही असो, त्यानें आपलें काम आपण स्वतः करावें. त्याविषयीं दुसऱ्याच्या भरवशावर कधींही राहूं नये. कारण कोणी झाला तरी त्याला स्वतःचें म्हणून कांहींना कांहीं तरी काम असतेंच. आपलें काम एकीकडे ठेवून दुसऱ्याचें काम हातीं घेणारीं माणसें फार विरळा असतात. म्हणून आपलें काम आपण जातीनें केलें पाहिजे. आधीं आपण कंबर बांधावी, आणि मग जरूर तर दुसऱ्यास साह्यास बोलवावें. कामावर "या" म्हणावें, "जा" म्हणूं नये.

प्रसंग विशेषीं दुसरे लोक आपणास मदत करूं शकतील; पण आपणांस सर्व भार स्वतः वरच ठेविला पाहिजे. कारण, आपलें हित अनहित जसें आपणांस कळतें तसें तें दुसऱ्यास कळत नाहीं. आपणांस अनुकूल असलेल्या गोष्टींचा पूर्ण उपयोग करून घेणें झाल्यास स्वावलंबनच अंगिकारिलें पाहिजे. कारण त्यासारखें प्रसंगीं उपयोगीं

पडणारें दुसरें साधन नाहीं. प्रत्येक मनुष्य जर, आपल्यावर आलेलीं अडचणरूपीं कांटेरीं झुडपें स्वतःच बाजूस सारून त्यांतून काढलेल्या मार्गानें जाण्याचा प्रयत्न करील, तर, पुढें पुढें जातां जातां तो एक उत्तम अनुभविक, आणि शहाणा मनुष्य झाल्यावांचून राहणार नाहीं. करितां श्री तुकाराम महाराज सांगतात कीं:—

" आपुलिया बळें बांधवी ती कास ।
धरूं नये आस कोणाचीही ॥

" या " व " जा " यांमधील फरक

एकदां एका गांवांत खुशालराव या नांवाचा एक जमीनदार रहात असे. त्याच्या बापानें राजाची चांगली नोकरी बजाविली होती; म्हणून त्यानें त्याला एक मोठी जमीन इनाम करून दिली होती.

खुशालराव हा एक मूर्ख व निष्काळजी तरुण मनुष्य होता. त्या जमिनीची मशागत करण्यासाठीं त्यानें मजुरी देऊन नोकर ठेविले होते. पण तो त्याचेवर कधींही देखरेख करीत नसे. तो घरीं आळसांत वेळ घालवी. त्याच्या बापानें त्याला पुष्कळ पैसाही मिळवून ठेविला होता. तो त्यानें लवकरच चैनींत उधळून टाकला. चार वर्षांचे आंतच तो कर्ज बाजारी झाला. ज्या सावकाराचें त्यानें कर्ज काढिलें होतें त्यानें त्यास इतका मान दिला कीं तें

कर्ज देऊन टाकण्यासाठीं शेवटीं त्यानें आपल्या जमिनीपैकीं अर्धी जमीन विकून टाकिली. व बाकीची अर्धी त्यानें हंबीरराव या नांवाच्या शेतकऱ्याला खंडानें दिली.

हंबीरराव हा मेहनती व हुषार मनुष्य होता. तो दररोज शेतांत जाई, आणि एका नोकराच्या मदतीनें ती जमीन स्वतः नांगरी. तींत तो चांगलें खत घाली व चांगलें बीं पेरी. तींत तो जें पीक काढी तें, तो जितका खंड देत असे त्याच्या पांच सहा पट किंमतीचें असे. त्या शेतकऱ्यानें आपला बहुतेक पैसा शिलकेस पाडला. कारण त्याच्या गरजा फारच थोड्या होत्या. तो स्वतः करितां फारच थोडा पैसा खर्च करी. तो अगदीं साध्या राहणीनें रहात असे.

एके दिवशीं सकाळीं खुशालराव हा आपल्या तट्टावर बसून खंडानें दिलेल्या शेताजवळून जात होता. तेव्हां हंबीरराव हा त्याच्याजवळ गेला व मोठ्या नम्रतेनें म्हणला, " महाराज, हें शेत आपण विकणार आहात, असें मी ऐकलें आहे. जर तसें असेल तर मी आनंदानें तें विकत घेईन. दुसरे जी किंमत देतील तितकी मी आपणांस देईन. मला आपण हें शेत द्या. "

तो जमिनदार आश्चर्यानें त्यास म्हणाला " तूं मजपासून जी जमीन खंडानें घेतली आहेस, तिच्या दुप्पट जमिनीचा मी मालक होतों. मला खंड द्यावा लागत नसे. तथापि मला कर्ज झालें व माझी अर्धी जमीन गेली. तुझ्याकडे फक्त हल्लीं निम्मी जमीन आहे. तूं मला खंड देतोस; तरी देखील ही जमीन विकत घेण्याइतकी शिल्लक

तूं पांच वर्षांत आपल्या जवळ केली आहेस, हें कसें ? "

हंबीररावानें उत्तर दिलें " महाराज, त्याचें कारण फक्त दोन शब्दांतील फरकांत आहे. आपण म्हणत असा " जा " आणि मी म्हणतों " ये. " "

खुशालराव म्हणाला, " तुझ्या बोलण्याचा अर्थ काय ? " मीं कोणाला " जा " म्हणून सांगितलें आणि तूं कोणाला " ये " म्हणून म्हणतोस ? "

तो शेतकरी म्हणाला " महाराज, तुम्हीं आपल्या नोकरांना शेतांत जाण्यास व तीं नांगरण्यास सांगितलें. तुम्ही स्वतः तेथें कधींही गेला नाहीं. आपल्यावर कोणी-ही नजर ठेवीत नाहीं असें जेव्हां त्या नोकरांनीं पाहिलें, तेव्हां ते फक्त अर्धेंच काम करीत. तुम्ही घरीं स्वस्थ बसून राहतां, व सर्व वेळ आळसांत व झोंपेंत काढतां "

" माझ्या विषयीं म्हणाल तर, मी भल्या पहाटेस उठतों. मी आपल्या नोकराला म्हणतों, " मजबरोबर चल. " मी पुढें होतों व तो माझ्या मागोमाग येतो. सकाळपासून संध्याकाळपर्यंत मी गड्यासह फार झटून काम करतों. मी स्वतः आपल्या गड्यावर देखरेख करतों. मी व माझा गडी दिवसभर फार नेटानें काम करितों व रात्रीं फक्त घरीं येतों. मला फायदा कां होतो व तुम्हांला कांहींच फायदा कां झाला नाहीं याचें कारण हें आहे. कारण आपल्या घरच्या कामाची काळजी आपण जितकी बाळगितों, तितकी चाकर बाळगीत नसतात; होईल तसें होवो, असें म्हणून ते निश्चिंत असतात. ज्याचें अन्न खावें त्याचें हित होईल तें करावें. हा जो सेवकांचा धर्म,

तो त्यांच्या स्वप्नींही नसतो. त्यांचें चित्त सर्वकाळ आपल्या स्वार्थावर असतें. तो ज्यांत साधेल तें ते करीत असतात. त्या पुढें धन्याचें हित त्यांस दिसत नाहीं. आंगच्या उधळेपणामुळें जसे कांहीं श्रीमंत मोडकळीस आलेले असतात, तसेच चाकरांनीं नाडिल्यामुळें धुळीस मिळालेले असे पुष्कळ श्रीमंत असतात. यासाठीं धन्यानें आपल्या कामास आपण स्वतः सावध असावें. केवळ चाकरांच्या विश्वासावर त्यानें राहूं नये."

गुरुवर्य केरोपंत छत्रे.

थोड्या वर्षांपूर्वीं रावबहादूर केरो लक्ष्मण छत्रे या नावाचे एक विद्वान व विद्याव्यासंगी पुरुष होऊन गेले. ते पुंणे येथील ट्रेनिंग कॉलेजांत गणिताचें मुख्य अध्यापक होते. एकदां सदर कॉलेजांत विद्याव्यासंगा संबंधानें बोलणें निघालें असतां एका विद्यार्थ्यानें सदर गुरुवर्यांना नम्रतेनें विचारलें कीं, "नानासाहेब, आपण पहिल्यापासूनच गणितांत असे तरबेज होता काय ?" यावर ते म्हणाले "वर्गांत, गणित विषयांत, माझा चवथा, पांचवा नंबर होता. त्यावर त्या विद्यार्थ्यानें पुनः प्रश्न केला "मग आपल्या वर असलेले विद्यार्थी मागसले व आपण पुढें सरसावलां हें कसें ?" तेव्हां ते म्हणाले "अहो, वर्गांत नंबर कितवा आला ह्याची काळजी मी करीत नसें. गणिताचे जे प्रश्न गुरुजी घालीत त्यांचीं उत्तरें मला बरोबर

कां देतां येत नाहींत ह्याचीच फिकीर मी करीत असें. प्रत्येक प्रकरणाची उपपत्ति बरोबर समजल्यावर, त्या प्रकरणांतील प्रश्न सोडवितां आलेच पाहिजेत. तरच त्यांत मौज आहे, व त्यांतच मनाचें खरें समाधान आहे. केवळ वर नंबर आणण्याकरितां ज्यांची धडपड असे, ते दुसऱ्यास विचारून किंवा ज्यांत प्रश्न सोडविले आहेत अशा पुस्तकांत पाहून तयारी करीत असत. मला ही गोष्ट मुळींच पसंत नसे. त्यामुळें मला जेव्हां एखादा प्रश्न अडे, तेव्हां तो मी तसाच वहींत टिपून ठेवीत असें. व फुरसतीच्या वेळीं, जेव्हां मन सुप्रसन्न असेल, तेव्हां तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असें. यामुळें जेवढा विषय मी सोपपत्तिक शिकलों, तेवढा माझे मनांत पक्का बिंबला."

स्वतःच्या परिश्रमानें शिकलेल्या कोणत्याही गोष्टीचें असेंच आहे. स्वतः मेहनत घेऊन श्लोक लावणें व भाषांतराचीं पुस्तकें वांचून किंवा कोणीं कांहीं टिपणें केलीं असतील, तीं पाहून श्लोक लावणें ह्यांत पुष्कळ अंतर आहे. दुसऱ्याच्या साह्यानें संपादन केलेलें ज्ञान तात्पुरतें असतें, परंतु आपल्या परिश्रमानें मिळविलेलें ज्ञान दीर्घकाळपर्यंत टिकतें.

---

(११)प्रवास.

यो न संचरते देशान् यो न सेवेत पण्डितान् ॥
तस्य संकुचिता बुद्धि र्घृतबिंदुरिवाम्भसि ॥ १ ॥
यस्तु संचरते देशान् यस्तु सेवेत पंडितान् ॥
तस्य विस्तारिता बुद्धिस्तैलबिंदुरिवाम्भसि ॥ २ ॥

भावार्थः—जो अनेक देशांत फिरत नाहीं, किंवा जो विद्वानांशीं सहवास करीत नाहीं, त्याची बुद्धि, पाण्यांत तुपाचा बिंदु जसा संकुचित होतो, त्याप्रमाणें संकुचित असते. (१)

जो अनेक देशांत फिरतो, व विद्वानांचा सहवास करितो, त्याची बुद्धि, पाण्यांत तेलाचा बिंदु जसा विस्तृत होतो, त्याप्रमाणें विस्तार पावते. (२)

प्रवास करणें हा एक शिक्षणाचाच भाग आहे. कारण प्रवासानें ज्ञानाची वृद्धि होते. मनुष्य स्वभावाचें अध्ययन करण्याला तर प्रवासासारखें दुसरें सुलभ साधन नाहीं. पुस्तकांच्या सहाय्यानें घरीं बसल्या बसल्या अनेक प्रकारचें ज्ञान मिळवितां येतें. कारण चांगला पुस्तकसंग्रह म्हणजे एक विश्वविद्यालयच होय. ही गोष्ट जरी खरी आहे, तथापि सृष्टिदेवतेच्या अफाट ग्रंथाचें निरीक्षण प्रवासामध्यें करणें याच्यासारखी ज्ञानार्जनाची सुलभ सुखकर व मनोवेधक अशी दुसरी पद्धत नाहीं म्हटलें तरी चालेल. मात्र प्रवासाच्याद्वारें ज्ञान प्राप्त करून घेण्यास मनुष्याच्या अंगीं उत्तम चौकस बुद्धि, तीव्र निरीक्षणशक्ति,

उत्कृष्ट ग्रहणशक्ति आणि निरनिराळ्या ठिकाणच्या लोकांचे स्वभाव ओळखण्याची तारतम्यबुद्धि इत्यादि गुण अवश्य असले पाहिजेत. प्रवास म्हणजे केवळ एक करमणुकीचें साधन एवढाच विचार करून जो प्रवास करील त्याला प्रवासापासून करमणुकीपेक्षां जास्त फायदा होणार नाहीं, हें उघड आहे.

मनुष्यांत चातुर्य येण्याला प्रवास अवश्य आहे हें कोणीही कबूल करील. परंतु नुसतें देशाटन केल्यानें मनुष्य चतुर होईलच होईल असें मात्र म्हणतां येणार नाहीं. चातुर्य येण्यासाठीं देशाटन हें एक केवळ साधन आहे. त्याचा जर योग्य उपयोग करून घेतला नाहीं तर विशेष फायदा होणार नाहीं. कारण असें जर नसतें तर सर्व पृथ्वीवर भटकणारे खलाशी, देशोदेशीं एंजिनापाठीमागें बसून त्याबरोबर धांवणारे एंजिनड्रायव्हर, आसेतुहिमाचल म्हणजे सेतूपासून हिमालय पर्वतापर्यंत जा ये करणारे भाविक यात्रेकरू, सर्व तीर्थें हिंडणारे श्रद्धाळू वगैरे सर्व लोक चतुरच चतुर बनले असते. पण अनुभव कांहीं तसा नाहीं. याचें कारण त्या लोकांना या साधनाचा हवा तसा उपयोग करून घेतां येत नाहीं, अगर ते करीत नाहींत, हेंच होय. प्रवासांत किंवा नित्य व्यवहारांत देखील मनुष्यानें आपले कान व डोळे उघडे ठेविले व जिज्ञासा जागृत ठेविली तर तो चतुर झाल्याखेरीज राहात नाहीं. कारण बहुतेक ठिकाणीं, रानांत वनांत, खेड्यापाड्यांत, शहरांत, कसब्यांत, कांहींना तरी नवीन शिकण्यासारखें अवश्य आढळेल. कोठें ऐतिहासिक लेख सांपडतील. कोठें

ऐतिहासिक दंतकथा ऐकू येतील; कोठें लोकांचें खाणेपिणें, रीतिरिवाज वगैरे चमत्कारिक व्यवहार कळतील, तर कोठें सृष्टिदेवतेच्या विविध लीला दृष्टीस पडतील. मनुष्यांत तीव्र जिज्ञासा व सूक्ष्मावलोकन मात्र हवें, म्हणजे त्याला वाटेल तेथें कांहीं तरी नवीन अवश्य हुडकून काढतां येईल.

प्रवासापासून जे अनेक फायदे आहेत त्यांत विश्रांति हा एक फायदा आहे. थोडासा प्रवास केला तरी हुशारी वाटते व आपला नित्याचा व्यवसाय आपण अधिक आनंदानें व तरतरीनें करूं लागतो. कारण कामावर असतांना अहोरात्र कराव्या लागणाऱ्या चिंतेस व आपल्या शारीरिक व बौद्धिक सामर्थ्याच्या खर्चास थोडी तरी विश्रांति मिळते, व त्यामुळें आपलें काम करण्याचें सामर्थ्य वाढतें. कारण प्रवासानें संसारांतल्या दगदगीचा विसर पडतो, व श्रमल्या भागल्या शरिराला व त्रस्त झालेल्या मनाला विश्रांति मिळते. व त्यामुळें सर्वश्रम परिहार होतात. क्षणोक्षणीं बदलणाऱ्या सृष्टिसौंदर्यानें मनाला आल्हाद वाटतो. प्रवासांत मुबलक मोकळ्या हवेचा पुरवठा होतो. यामुळें खाण्यापिण्याची, अंथरूण पांघुरणाची, व निजण्याबसण्याची जरी थोडीशी गैरसोय भासली तरी शरिराला आराम वाटतो. प्रवासाला गेल्यानें निरनिराळे देश, लोक, त्यांचे वेष, भाषा, चालीरिती, हवामान इत्यादिकांचे मनोरम वैचित्र्य पाहावयास सांपडते. एकंदरींत मनाला सर्व तऱ्हेनें उत्तेजित करणारें प्रवासाखें दुसरें सुलभ औषधच नाहीं असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं.

प्रवासानें मन प्रगल्भ होतें, बुद्धि विकास पावते,

ज्ञानाचें क्षेत्र वाढतें, प्रसंगावधान येतें, स्वावलंबनाची संवय लागते व निरनिराळ्या लोकांच्या ओळखी होऊन पुढील आयुष्यक्रमांतील मार्ग सुलभ होतो. म्हणून प्राचीन-काळीं आपल्या या पुण्यशील भरतखंडांत गुरुगृहींचा अध्ययनाचा काल संपला म्हणजे, गृहस्थाश्रम स्वीकारण्या-पूर्वीं तीर्थयात्रा करावी लागे. यामुळें पूर्वीं जे या भरतभूमींत मोठमोठे विद्वान् व कवि होऊन गेले. त्यांनीं फार प्रवास केलेला असावा. एरवीं भारत, भागवत, रामायण इत्यादि प्रचंड ग्रंथ माहितीनें व विद्वत्तेनें परिपूर्ण भरलेले लिहिले गेले नसते.

हल्लीं इंग्लंड वगैरे सुधारलेल्या देशांत अशी चाल आहे कीं, यूरोपखंडांतील प्राचीन काळीं व सांप्रत काळीं सुधारलेल्या देशांत प्रवास करून आल्याशिवाय शिक्षण पुरें झालें असें समजत नाहींत. म्हणून अध्ययन संपल्यावर बहुशः सर्व विद्वान् लोक यूरोपखंडांतील व शक्य तर बाहेरीलही देश पाहून येतात. कित्येक बुद्धिवान् असतात ते त्या देशांचीं वर्णनें लिहितात, व तेथें असतांना त्या देशांतल्या भाषाही शिकतात. कित्येकांना देश निरीक्षण करण्याची आवडच असते. म्हणून ते मोठ्या शोधक बुद्धीनें बाहेर प्रवासास पडतात. म्हणून त्यांचीं प्रवासवर्णनांचीं पुस्तकेंही माहितीनें भरलेलीं अशीं असतात. या त्यांच्या आवडीमुळें अनेक देशांतील मोठमोठीं मंदिरें, देवळें, राजवाडे, नद्या, पर्वत, सरोवरें वगैरे यांचीं वर्णनें, फोटो व छापील चित्रें हल्लीं सर्वांस सुलभ झालीं आहेत.

म्हणून मोठमोठ्या प्रेक्षणीय किंवा रम्य स्थळांचीं वर्णनें

कोणासही पुस्तकांतून वाचण्याची मोठी सोय झाली आहे. तथापि अशीं स्थळें प्रत्यक्ष पाहण्यांत जो फायदा आहे, तो तीं वर्णनें वाचून व चित्रें पाहून मनाचें समाधान करणें म्हणजे दुधाची तहान ताकावर भागविण्यासारखेंच आहे. अशीं स्थळें प्रत्यक्ष पाहिल्यानें मनावर एकप्रकारचा उदात्त व टिकाऊ परिणाम होतो. तो वर्णनें वाचल्यानें अगर चित्रें पाहिल्यानें होत नाहीं. लोकांचें स्वतः निरीक्षण केल्यानें जो एकप्रकारचा फायदा होतो तो पुस्तकें वाचून होत नाहीं. आपला गांव, प्रांत व देश सोडून दुसऱ्या गांवांत, परकीय प्रांतांत अगर परदेशांत कांहीं दिवस प्रवास करणें यांतच एकप्रकारचें शिक्षण आहे. अशा प्रवासांत निरनिराळ्या प्रांतांतील लोकांच्या सामाजिक किंवा औद्योगिक स्थितीचें लक्षपूर्वक अवलोकन केलें तर त्यामुळें आपल्या विचारास एकप्रकारचें चांगलें वळण लागतें.

आतां प्रवासाच्या पूर्व तयारी संबंधानें थोडेंसें सांगतों. आपल्या गांवाहून दहावीस कोस दूर असलेल्या गांवास कांहीं दिवस राहावयास जावयाचें असेल तर आपल्याला किती तरी तयारी करावी लागते, हें सर्वांस माहीत आहेच. मग शेंकडों मैलांवर, जेथें आपली ओळख ना पाळख, ना धर्म ना गोत अशा प्रकारच्या व आपल्याहून भिन्न रीतिरिवाजाच्या देशास प्रवासास जातांना शक्य तितकी कडेकोट तयारी करून गेलें पाहिजे हें उघड आहे. लांबचा प्रवास करावयाचा असला म्हणजे काय घेऊं, काय नको असें होतें, व मन अगदीं गोंधळून जातें. एकदां पुष्कळ घ्यावेंसें वाटतें, पण दगदगीचा प्रश्न पुढें उभा राहिला कीं कांहींही घेऊं नये

असें वाटतें. अशा घालमेलींत अत्यंत अवश्य वस्तु आपण घ्यावयास विसरतों, व अनावश्यक म्हणजे जरूरी नसणाऱ्या बऱ्याच वस्तु आपण बरोबर घेतों. आणि मुक्कामीं पोंहच-ल्यावर जसजशी अडचण उपस्थित होईल तसतशी एकेकांची आठवण होऊं लागते. मग तेथें कवडीमोल वस्तुलासुद्धां पुष्कळ पैसे देऊन तीं विकत घ्यावी लागते. म्हणून प्रवा-सास निघतांना थोडा बांधाबांधीचा व ओझ्याचा त्रास पडला तरी हरकत नाहीं. परंतु अत्यावश्यक रोज व्यवहारांत लागणाऱ्या व ज्यांच्यावांचून आपलें पदोपदीं नडेल अशा अवश्यक वस्तु घ्याव्यात. त्या घेण्यांत अगदीं हयगय करूं नये.

प्रवासांतील दुसरी अवश्यक गोष्ट म्हटली म्हणजे ज्या ठिकाणीं आपणास जावयाचें असेल त्या ठिकाणची संपूर्ण माहिती मिळविणें ही होय. ही माहिती त्या त्या प्रांतांतून व देशांतून परत आलेल्या लोकांकडून मिळवावी. कारण ती त्यांच्याकडून चांगली व अनुभविक मिळते. करितां अशा लोकांना भेटून त्यांजकडून माहिती घ्यावी. अशीं प्रत्यक्ष माणसें मिळणें शक्य नसल्यास त्या त्या ठिकाणच्या लोकांना लिहून मागवावी. अगर उपलब्ध पुस्तकांतून काढावी.

ज्या ज्या प्रदेशांतून आपण प्रवास करणार आहों, त्या त्या प्रदेशाचा नकाशा, तेथील लोकांचे आचार विचार व त्यांचीं नाणीं यांची थोडी तरी माहिती करून घ्यावी. व ज्या ज्या प्रांतांतून प्रवास करावयाचा असेल त्या त्या प्रांतां-तील ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळांचें टिप्पण करून घ्यावें.

सध्यां रेल्वे, आगबोटी, तारायंत्रें व विमानें यांच्या योगानें प्रवास अत्यंत सुखकारक झाला आहे. देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत निर्भयपणें खुशाल संचार करावा. आगबोटीच्या योगानें सातासमुद्रापलीकडील देश खुशाल पाहावेत. अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, जपान यांसारख्या सुधारलेल्या देशांतील मोठमोठीं शहरें, व्यापाराच्या पेठा, विश्वविद्यालयें व लोकांच्या चालीरीति पाहाव्यात. त्या देशांतील मोठमोठे कारखाने व भव्य इमारती पाहून सुधारणेच्या प्रचंड स्वरूपाचें अवलोकन करावें. काश्मीर, मेक्सिको, ब्राझील या देशांतील सृष्टिसौंदर्य व नानाप्रकारचे निसर्गानें उत्पन्न केलेलीं सरोवरें, पर्वत, अरण्यें वगैरे रमणीय देखावे पाहावेत. सृष्टींतील भव्य वस्तूंच्या अवलोकनानें व त्यांचें वर्णन वाचण्यानें मनोवृत्तीवर फार उत्कृष्ट परिणाम होतात, हें सर्वांस ठाऊक आहे. सुदैवानें ज्यास अनुकूलता असेल त्यानें पृथ्वीवरील प्रचंड पर्वत, विशाल नद, अफाट समुद्र, व रमणीय सरोवरें यांचें अवलोकन अवश्य करावें. निदान आपल्या या भरत खंडांत व त्याच्या सीमेवर तसल्या अनेक वस्तु आहेत, त्यांचें तरी अवलोकन अवश्य करावें. हिमालय, विंध्याद्रि वगैरे प्रचंड पर्वत, सिंधु, ब्रह्मपुत्रा, गंगा, यमुना, गोदावरी, कृष्णा, वगैरे विशाल व पवित्र नद्या, व मानस सरोवरासारखीं रमणीय सरोवरें यांचें एकदां तरी अवश्य दर्शन घ्यावें. तसेंच रमणीय व कृत्रिम वस्तूंचीही या हिंदुस्थानांत कांहीं वाण नाहीं. महाराष्ट्रांतील रायगड, व प्रतापगडासारखे किल्ले, अग्र्याचा ताजमहाल व विजापूर येथील गोलघुमट

यांसारख्या इमारती, अजिंठा व वेरूळ वगैरे ठिकाणच्या लेण्यांसारखीं कोरीव कामें व दक्षिण हिंदुस्थानांतल्या देवालयांचीं आश्चर्य करण्याजोगीं शिखरें हींही पाहिल्यावांचून राहूं नये. सारांश, यात्रा,जत्रा वगैरे कोणत्या तरी निमित्तानें प्रत्येकानें केव्हांना केव्हां तरी असलीं स्थानें पाहावींत हें उत्तम होय.

कारण अशा प्रवासास बाहेर पडलें म्हणजे मनुष्यावर कित्येक बरे वाईट प्रसंग आपोआप येऊन त्यास त्यांपासून कांहीं तरी सद्बोध घेण्यास सांपडतो. प्रवासांत येणाऱ्या निरनिराळ्या प्रसंगाच्या प्रत्यक्ष अनुभवानें पुस्तकांतील शहाणपणाचे धडे पडताळून पाहाण्याचा सुयोग त्यांस येतो; व अशा मिळालेल्या अनुभवसिद्ध ज्ञानाचा परिणाम अर्थातच चिरकाल टिकणारा असतो. व त्याचप्रमाणें भिन्नरुचींच्या अनेक माणसांशीं प्रवासांत प्रसंग येतो, व त्यामुळें नुसत्या कल्पनेनें ठरविलेल्या जगाच्या बाह्य रूपापेक्षां अंतरंग किती निराळेच चित्रविचित्र असतें याचा मजेदार मासला पाहावयास सांपडतो. यामुळें व्यवहारांत संबंध येणाऱ्या कोणत्याही माणसाची तेव्हांच पारख करतां येते, व त्यामुळें लफंग्यांचें फसवणुकीचें डांवपेंच तेव्हांच ताडतां येऊन त्यांच्या जाळ्यांतून निसटतां येतें. करितां प्रत्येकानें शक्य तितका प्रवास करून आपल्या ज्ञानांत भर घालणें हें अत्यंत उचित आहे.

गास्टन्चा प्रवाशास उपदेश.

"गास्टन् नामक विद्वानानें अज्ञात प्रदेश पाहाण्यास जाणाऱ्या प्रवाशांस पुढील प्रमाणें उपदेश केला आहे:—

"आपल्या प्रवासाची रीति कशी चालली आहे याकडे विशेष लक्ष द्यावें. आपला प्रवास केव्हां संपेल अशी रुखरुख मनास लावून घेऊं नये. जेव्हां रानटी प्रदेशांतून सुधारलेल्या देशाजवळ आपण येऊं तेव्हां ही कटकट एकदांची संपेल व संकटांतून कसें तरी पार पडूं असें मनास वाटूं देऊं नये; तर साहसाच्या प्रसंगांनीं मनोहर झालेली ही वेळ निघून जाणार म्हणून मनास खेद वाटला पाहिजे. अशा तऱ्हेनें हळू हळू मार्गक्रमण करावें म्हणजे फारशीं संकटें येणार नाहींत व वाटेनें स्नेही सोबती मिळतील, व त्या प्रदेशाची चांगली माहिती होईल. कोणत्याही प्रदेशाची चांगली माहिती झाली म्हणजे त्या प्रदेशांतील संकटांतून आपणांस निसटून जातां येतें. अशा रीतीनें कांहीं महिने प्रवास केल्यावर मागें वळून पाहावें म्हणजे आपण केवढ्या लांबीचा प्रवास केला म्हणून आपणांसच आश्चर्य वाटेल. दररोज आपण तीन मैल गेलों तरी एका वर्षांत एक हजार मैल विस्ताराचा मुलूख पाहून होईल. ही गोष्ट कांहीं लहानसहान नव्हे. मला वाटतें कीं इसानीतींतील ससा आणि कासव ह्यांची गोष्ट विस्तीर्ण व अज्ञात प्रदेशांतून जाणाऱ्या प्रवाशांस अनुलक्षूनच रचलेली असावी."

(१२) परोपकार.

परोपकारः पुण्याय, पापाय परपीडनम् ॥

भावार्थः—दुसऱ्यावर उपकार करणें हेंच पुण्य व दुसऱ्याला पीडा देणें हेंच पाप होय.

सद्गुणी लोक आपल्यांकडून होईल तितका दुसऱ्यावर उपकार करितात. ते स्वप्नांतसुद्धां दुसऱ्याला त्रास देत नाहींत. जो उत्तम पुरुष आहे तो तर आपल्या शत्रूवरसुद्धां उपकार करतो. तो दुसऱ्यानें दिलेली पीडा मनांतसुद्धां आणीत नाहीं. दुसऱ्यावर उपकार केला म्हणजे जो आनंद होतो तो तर अवर्णनीय आहे. त्या समाधानासारखें समाधान तर दुसऱ्या कोणत्याही कृत्यानें होत नाहीं. चैन आणि विलास यांत द्रव्य उधळल्यानें मनाला बिलकूल आराम पडावयाचा नाहीं. पण त्याच्या दशांश, नव्हे शतांश जरी द्रव्य परोपकाराच्या कामीं खर्च केलें तरी त्यापासून अंतःकरणाला उत्तम प्रकारचें समाधान वाटतें.

मनुष्यांनीं एकमेकांवर उपकार करावा अशी परमेश्वराची योजना दिसते. कारण तशी जर त्याची इच्छा नसती तर सर्व प्राणी, निदान सर्व मनुष्यें तरी, सारख्याच स्थितींत त्यानें उत्पन्न केलीं असतीं. परंतु तसें देवानें केलेलें दिसत नाहीं. कोणी शरीरानें सशक्त असतात, तर कोणी अशक्त असतात; कोणी मनाचे सदृढ असतात तर कोणी दुर्बल असतात; कोणी विद्वान् असतात, तर कोणी मूर्ख असतात; कोणी हुशार असतात, तर कोणी ढ असतात; कोणी श्रीमंत

असतात तर कोणी दरिद्री असतात, अशा परस्पर विरोधी स्थितींत देवानें मनुष्य प्राण्याला उत्पन्न केलेलें दिसतें. याचीं दुसरीं पुष्कळ जरी कारणें असलीं, तरी एकानें दुसऱ्यावर उपकार करावा, अगर परोपकारी माणसास आपलें औदार्य दाखविण्यास संधि असावी ह्मणूनच परमेश्वरानें एकमेकींस विरूद्ध अशा दोन स्थिति उत्पन्न केल्या असाव्यात असें वाटतें. या परमेश्वरी इच्छेनुरूप प्रत्येक व्यक्तीनें दुसऱ्याच्या सुखदु:खाचा विचार करावा हें योग्य होय. जे सशक्त असतील त्यांनीं अशक्तास मदत करावी; जे विद्वान् असतील त्यांनीं दुसऱ्यास आपल्याप्रमाणें विद्वान् करण्याचा प्रयत्न करावा; जे हुशार असतील त्यांनीं मंदमतीस अभ्यासाच्या वगैरे कामीं साह्य करावें; व जे श्रीमंत असतील त्यांनीं गरिबांचा समाचार घेऊन त्यांस योग्य ती मदत करावी, हें उचित होय.

शिवाय मनुष्यावर नानातऱ्हेचीं संकटें येण्याचा संभव असतो. जे आज सुस्थितींत आहेत, ते नेहमींच सुस्थितींत राहातील याची खातरी नसते. कोणत्या वेळीं काय होऊन कोणावर काय संकट येईल याचा नियम नसतो. उदाहरणार्थ, जो आज चांगला धनोत्पादक धंदा करून ऐटीनें संसार चालवीत असतो, तोच जर उद्यां आकस्मिक कारणानें आजारी पडला, व त्याचा धंदा चालविण्यास त्याच्यासारखा दुसरा कोणी माणूस नसला तर त्याचा धंदा सपशेल बुडतो, व तो पैशाच्या अडचणींत येऊन त्याची अन्नान्न दशा होते. जो पैलवान आज आपल्या शक्तीची घमेंड मारीत असतो, त्याच पैलवानाचा दुर्दैवेंकरून

कुस्तींत पाय अगर हात मोडला म्हणजे तो अगदीं परावलंबी होतो. त्याला क्षुल्लक कारणाकरितां सुद्धां दुसऱ्याची मदत घ्यावी लागते. अशीं कांहीं उदाहरणें आपल्या दृष्टीस पडतात. म्हणून प्रत्येकानें आपल्या सुस्थितींत दुसऱ्या गरजू लोकांना आपल्याकडून होईल तितकी मदत करावी.

ज्याच्यावर संकट आलें असेल त्याचें संकट दूर करण्याचा प्रयत्न सर्वांनीं करावा, अशा योगानें संकटांत पडलेला मनुष्य संकटांतून लवकर मुक्त होतो. व त्यास मोठें समाधान वाटतें. व त्याच्या दसपट समाधान ज्यांनीं त्यास सहाय्य केलें असेल त्यांस वाटतें. कारण सहाय्य करणाराला असें वाटतें कीं, " परमेश्वरानें आपणास दिलेल्या सामर्थ्याचा आज योग्य उपयोग झाला " मग तें द्रव्यबल असो, अगर शारीरिक बल असो अगर दुसरें कोणतेंही सामर्थ्य असो. एखादा पोहतां न येणारा मनुष्य पाण्यांत बुडून मरत आहे असें एखाद्या उत्तम पोहतां येणाऱ्या मनुष्यानें पाहिलें व त्या पोहणाऱ्या मनुष्यानें आपल्या जिवाकडे न पाहतां जर उडी घालून त्या बुडणाऱ्या मनुष्यास वर काढलें तर त्या दोघांनाही आनंद होईल, यांत शंका नाहीं. परंतु ज्या मनुष्यानें जिवाची पर्वा न करतां पाण्यांत उडी घालून बुडणाऱ्या मनुष्याला वर काढिलें, त्याला तर अत्यंत आनंद होऊन एक प्रकारचें सात्विक समाधान नेहमीं वाटेल. व तें समाधान अवर्णनीय आहे.

परोपकार करण्याला पैसा हें एकच साधन आहे असें नाहीं. परोपकार करण्याचीं अनेक साधनें आहेत. व प्रत्येक मनुष्याला आपआपल्या परीनें दुसऱ्याच्या उपयोगीं

पडतां येतें. संकटांत पडलेल्या मनुष्यास नुसती शाब्दि सहानुभूतिसुद्धां पुष्कळ समाधान देते. गरीब कुटुंबांत अजारी मनुष्यास दवाखान्यांत नेऊन औषध देणें, रोग च्या अंथरुणाजवळ बसून जागण्यास कोणी नसेल तर अडचण दूर करणें; ओझ्यानें थकलेल्या म्हाताऱ्या मनुष्य थोडीशी विश्रांति देण्यासाठीं त्याचें ओझें आपल्या डोकी घेऊन, त्याजबरोबर मैल दोन मैल आपल्या शक्तीप्रम चालणें वगैरे; हीं लहानसहान परोपकाराचींच कृत्यें हो व हीं प्रत्येकास सहज करतां येण्यासारखीं आहेत.

परोपकार करणें हा दैवी गुण आहे. मौजा मारणें ऐषआरामांत द्रव्य उधळणें हें अगदीं गौण आहे. स्वा विवेकानंद म्हणतात " सर्व अनुकुलता असून जो आपल्य इष्टमित्रांना व गरिबांना कांहीं देत नाहीं तो शुद्ध प समजावा, हें खरें आहे. जे अनाथ, पंगु, आंधळे, पांग वगैरे आपल्या दाराला कांहीं तरी मागण्याच्या उद्देशा येतील, त्यांना तर रिक्त हस्तानें (रिकाम्या हातानें) केव्ह ही घालवूं नये. आपल्या ऐपतीप्रमाणें व शक्तीप्रमा त्यांना थोडा तरी दानधर्म करावा. अगदींच कांह देण्याची ऐपत नसेल तर निदान त्यांच्यांशीं गोड बोल तरी त्यांचें समाधान करावें व नेहमीं मनांत असें बाळगा कीं, आज आपल्याला ऐपत आहे म्हणून तो आपल्याक मागण्यास आला आहे. ही एक आपल्यावर परमेश्वराच कृपाच आहे. सर्व काल मनुष्याची एकच स्थिति टिके असें नाहीं. ऐश्वर्याच्या वेळीं जो उद्दामपणानें वागत नाहीं त्याला पुढें गरिबी आली तरी तो तिला जुमानीत नाहीं

अशक्तांना मदत केली असतां मदत देणारा अधिक सशक्त होतो, आणि हतभाग्यांना छळल्यानें छळणारा अशक्त होतो, हें तत्त्व ध्यानांत ठेवावें.

भूतदयेनें प्रेरित होऊन स्वार्थत्यागपूर्वक जगांतील दुःख, पाप, अज्ञान वगैरे कमी करणें याचेंच नांव परोपकार. परोपकार द्रव्यदानांतच आहे असें नाहीं. जगांत जें गाढ अज्ञान आहे, जीं हृदयद्रावक दुःखें आहेत, जीं प्राणघातक संकटें आहेत, जीं घोर पापें आहेत व नयनशल्यभूत जी कुरुपता आहे, त्यांपैकीं एखादी तरी अनिष्ट गोष्ट स्वतांला त्रास सोसून जो जगांतून कमी करील, तो आपल्या परीनें व आपल्या मानानें परोपकारी पवित्राचरणी वीरच आहे. केवळ स्वदेश बांधवांचीं दुःखें नाहींशीं करण्याकरितां आपल्या सुखाची पर्वा न करतां अहोरात्र झटणारे स्वदेशभक्त शिवाजी महाराज व रामदास स्वामी हे जसे वीर, तसेच अमेरिकेंतील एडिसनसारखे व इकडील प्रोफेसर बोससारखे ऐष आरामाची पर्वा न करितां रात्रंदिस विचार करीत राहून अनेक शास्त्रीय शोध लावणारीं कल्पक मनुष्येंही वीरच होत. जो जो मनुष्य स्वार्थत्याग करून जगांत आहे त्यापेक्षां अधिक सुख, अधिक आनंद, अधिक सौंदर्य, अधिक रमणीयता, अधिक ज्ञान, अधिक पावित्र्य, अधिक तेज, अधिक उदार बुद्धि आणील तो तो परोपकारीच होय. जगांतील अज्ञान दूर करणें, उद्योगधंदे वाढविणें, व्यापार विस्तृत करणें, अनेक शोध लावणें व कल्पकता वाढविणें मनोवृत्तींना सत्पंथ प्रिय वाटूं लागेल असें करणें, देशाभिमान वाढविणें, स्वार्थत्याग शिकविणें हीं परोपकाराचींच

कर्में आहेत. परोपकार करण्यास अंगीं राजाचेंच सामर्थ्य नको. राजेरजवाड्यांची संपत्ति असतांही, त्यांना अधिकार नसतांही, अत्यल्प सामर्थ्यानें, ईश्वरदत्त साधनांनींच केवळ परोपकार वाढवून जगांतील सुख वाढवितां येतें. थोरांनीं आपल्या थोर परोपकारांनीं जगांतील सुख बरेंच वाढविलें तरी विशेष सामर्थ्यहीन सुजनांसही आपली परोपकारबुद्धि दाखविण्यास बरीच जागा राहाते. नुसत्या गोड वाणीनें-सुद्धां परोपकार करण्याचे प्रसंग नेहमीं येतात. प्रत्येकास जलसिंचनानें वनस्पति जशा संतुष्ट व प्रफुल्लित करतां येतात, त्याप्रमाणें सदुपकारानें आपणासभोंवतील दीन जग आनंदी व हास्यमुख करतां येतें.

प्राणदान.

इ० स० १८९९ सालीं स्टेला या नांवाची एक आगबोट फुटून समुद्रांत बुडाली. त्यावेळीं तिच्यावर असलेले शेंकडों उतारू पाण्यांत बुडून मेले. ती बोट फुटली त्यावेळीं मिसेस रॉजर्स या नांवाची एक बाई तींत होती. त्या भयंकर प्रलयांत तिची वृत्ति अगदीं शांत व गंभीर होती. त्यावेळीं स्वतःच्या बचावासाठीं तिनें बिलकूल तयारी केली नाहीं, एवढेंच नव्हे तर दुसऱ्याचा जीव बचावण्यासाठीं आपला जीव गेला तरी हरकत नाहीं, असा

तिनें निश्चय केल्यासारखा दिसला ! जहाज खडकावर आपटलें त्या वेळेपासून तों अखेरपर्यंत ती यत्किंचितही डगमगली नाहीं. त्या भयंकर प्रलयांत ती डेकवर आली. ती प्रत्येक उतारूजवळ गेली. मायेच्या गोड शब्दांनीं तिनें प्रत्येकाचें सांत्वन केलें, आणि एखादी आई जशी आपल्या लहान मुलास चालण्यास मदत करिते, त्याप्रमाणें जहाजावरून खालीं उतरण्यास तिनें सर्वांस सहाय्य केलें. कोणाचीही तिनें हेळसांड केली नाहीं. सर्वांशीं मायेनें बोलून त्यांना धीर देत सर्व होड्या भरे-पर्यंत ती सारखी डेकवर गरगर फिरत होती. जीव वांच-विण्याचे रबरीपट्टे बहुतेक सर्व बायांच्या अंगावर तिनेंच बांधले व त्या सर्वांना तिनें होड्यांत उतरविलें, बहुतेक सर्व बाया उतरविल्यावर ती मागें वळून पाहाते तों एक बाई बिन पट्ट्याची राहिली व दुसरा पट्टा तर शिल्लक नव्हता तेव्हां तिनें आपल्या कमरेचा स्वत:चा जीव बचाविण्याचा पट्टा काढला व त्या बाईच्या कमरेला बांधून तिला जलदीनें होडीकडे घेऊन गेली. त्या बाईला होडींत बसविलें, त्या वेळीं खलाशी ओरडून म्हणाले:—" राजर्सबाई, तुम्ही होडींत उडी टाका. " छे छे ! होडी गच्च भरली आहे,. मीं आंत आलें तर कदाचित् होडी बुडेल, तुम्ही लवकर होडी वल्हवा " असें म्हणून तिनें सर्वांस शेवटचा राम राम केला. नंतर ती आपले हात वर करून म्हणाली— "देवा, मला पदरांत घे." नंतर लवकरच ती स्टेला आग-बोट समुद्रांत बुडाली, त्याबरोबर परोपकारी मिसेस रॉजर्स बाईही आपली धवल कीर्ति मागें ठेवून बुडाली.

पुढील पिढीस कर्तव्याची, मनाच्या थोरपणाची व परोपकाराची आठवण करून देण्यासाठीं एक कारंजें बांधून त्या थोर बाईचें स्मारक करून ठेविलें आहे.

परोपकारी महाराणी.

आपल्या महाराणी मेरीसाहेब फार दयाळू आहेत. दुःखितांचें दुःख हरण करावें, अनाथांस जवळ करावें, निराश्रितांस आश्रय द्यावा व दुबळे असतील त्यांना मदत करावी हा या सम्राज्ञींचा आवडता व्यवसाय आहे. हीं कामें करीत असतां त्या थकवा जाणत नाहींत, कंटाळत नाहींत, कीं मोबदल्याची अपेक्षा करीत नाहींत. त्या नेहमीं सत्पात्रीं धर्म करितात. रिकामटेकडे, आळशी, गांवभर भटकणारे अशा लोकांचा त्यांना फार तिटकारा आहे. दवाखान्यांतील रोगी, गोरगरिबांचीं मुलें, अपंग व दुबळे लोक ह्यांच्याकडे त्यांचा फार ओढा आहे. कैद्यांच्या मुलांचें पालनपोषण करून त्यांना सन्मार्गाला लावण्याची इंग्लंडांत एक संस्था आहे. त्या संस्थेला महाराणी साहेबांचा मोठा आश्रय आहे. अशा मुलांना सम्राज्ञी मेरी साहेब नेहमीं पहावयास जातात. त्यांपैकीं कित्येकांस " या माझ्या बाळांनो " म्हणून जवळ घेतात. रोज मजुरी करणाऱ्या स्त्रियांना विश्रांति मिळत नाहीं, त्यांना विश्रांति मिळून कांहीं वेळ तरी आनंदांत घालवितां यावा

म्हणून त्यांच्याकरितां एक विश्रांतिगृह काढलेलें आहे. त्याचें बहुतेक श्रेय महाराणी साहेबांसच आहे.

या महाराणी साहेब सहल करीत असतां वाटेंत त्यांना कोणी दीन दुबळे भेटले असतां त्यांची त्या कळकळीनें विचारपूस करितात, व त्यांच्याशीं त्या मायाळूपणानें बोलतात. त्या आपल्या नेमणुकींतून गोरगरिबांस देण्याकरितां मोठी रक्कम काढून ठेवितात, व तिचा विनियोग गरिबांचें दुःख निवारण्याकडे लावितात. कित्येक वेळां त्या बाजारांतून फुलें विकत आणितात व त्यांचे गुच्छ वगैरे बांधून दवाखान्यांतील रोग्यांस मोठ्या प्रेमानें नेऊन देतात. गरीब लोकांची स्थिति सुधारण्याकरितां काय केलें पाहिजे हें जाणण्याकरितां त्यांनीं अर्थशास्त्राचा अभ्यास केला आहे. दीन दुबळ्यांना आणि अनाथांना मदत केल्यापासून होणारा सात्विक आनंद हाच सर्वांत श्रेष्ठ आनंद आहे असें त्यांचें मत आहे. आपल्या मुलांनींही आपल्यासारखें धार्मिक व्हावें व त्यांना योग्य शिक्षण मिळावें म्हणून साम्राज्ञी ह्या फार काळजी घेतात. त्यांनीं आपल्या मुलांच्या मनावर भूतदयेचा चांगला ठसा उमटाविला आहे, हें पुढें दिलेल्या एकाच गोष्टीवरून दिसून येईल.

राजकुमाराची परोपकारबुद्धि.

महाराणी मेरी साहेबांचे ज्येष्ठ पुत्र प्रिन्स एडवर्ड हे एकदां रडूं लागले. त्यांची समजूत करण्यासाठीं त्यांची

दाई त्यांना म्हणाली:—" असें रडणें तुम्हांला नाहीं. देवानें तुम्हाला किती तरी सुख दिलें आहे. तुमचे आईबाप दयाळू आहेत. तुमचें घर सुंदर तुम्हाला निजायाला मऊ बिछाना आहे. तुमचीं तऱ्हेचीं खेळणीं आहेत. मागें मी एका मुलाला सां होतें. त्याला आईबाप नव्हते. तो एका घाणेरड्या जमिनीवरच निजे, उशाखालीं कागद घेई त्याल देखील खेळणें नव्हतें.

यावर तो राजकुमार एकदम म्हणाला:—" एकसुद्धां खेळणें नाहीं, असा मुलगा असेल असें वाटत नव्हतें. माझ्या खेळण्यांपैकीं मी एक त्याल काय ?" दाई म्हणाली, " तुमचें निरुपयोगीं जरी खेळणें त्याला दिलें तरी त्याला आनंद होईल. "

ह्यावर तो राजकुमार म्हणाला:—" माझ्या त्या मुलाला भेट पाठवावयाची आहे, आणि तूं कीं, मला निरुपयोगीं असें खेळणें मीं त्याला द्यावें त्याला नको तें दुसऱ्याला देण्यांत विशेष तें काय आमची आई सांगते कीं, दुसऱ्यासाठीं आपण सोसावी. मला पाहिजे तेंच खेळणें मी त्याला दे व त्याप्रमाणें आपलें आवडतें खेळणें त्यानें त्य पाठवून दिलें.

———

(१३). सदाचार.

उचित जाणावें मुख्य धर्म आधीं ॥
चित्त शुद्ध बुद्धि ठायीं स्थिर ॥ १ ॥
न घालावी धांव मनाचिये ओढी ॥
वचन आवडी संताचिये ॥ २ ॥
अंतरिया राहे वचनाचा विश्वास ॥
नलगे उपदेश तुका म्हणे ॥ ३ ॥

भावार्थः— आपलें मुख्य कर्तव्यकर्म काय आहे हें प्रथम ओळखावें. चित्त शुद्ध ठेवावें व बुद्धि स्थिर असावी. मनास येईल तसें वागूं नये. साधुसंतांच्या वचनांची आवड असावी; व त्या वचनांवर अंतःकरणांत विश्वास असावा, म्हणजे त्यास (निराळा) उपदेश करण्याची जरूर नाहीं. असें साधुश्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात.

मनुष्यांनें नेहमीं सदाचारानें म्हणजे नीतीनें वागावें, म्हणून थोर पुरुष वारंवार सांगतात, व त्याबद्दल त्यांनीं वेळोवेळीं पुष्कळ नियम घालून दिले आहेत. त्यांपैकीं थोडेसे नियम येथें देतों.

(१) आचारांत व विचारांत छचोरपणा असूं नये. उगाच दुसऱ्याच्या तोंडाकडे टक लावून पाहूं नये, व दुसरे कोणी बोलत असतां, आपण विनाकारण मध्येंच बोलूं नये. दुसऱ्याच्या व्यंगाबद्दल हसूं नये, व गरिबीबद्दल दुसऱ्यास नांवें ठेवूं नयेत.

(२) चारचौघांत जाऊन बसणें उठणें असेल त्यावेळीं

गचाळ पेहराव, घाणेरडे कपडे, मळ… …पाय… …ा शोभत …हा, अशा स्थितींत जाऊं नये. आपल्यापासून दुस…्यास कि… …हे. न येईल व कमीपणाही न वाटेल अशा रीतीनें च… नाना- मिसळत जावें.

(३) उद्धट किंवा दांडगे दिसणारें वर्तन सर्वथा टाळावें, गर्दींत शिरतांना आपल्यापासून दुसऱ्यास उपसर्ग …गर्दी कमी पोंचेल असें वागावें. आरडाओरड, शि… …ळी, धिंगामस्ती, आदळ आपट हीं कधींही आपल्या वर्तनांत आणूं नयेत.

(४) खिडक्या, दारें, पेट्या व फडताळे वगैरे लावतांना त्यांचीं दारें आपटूं नयेत; लांकडी दादर किंवा जिने चढतांना पाय आपटूं नयेत. जिनसा ओलांडूं नयेत.

(५) कोणीही मनुष्य आपलेकडे आल्यास प्रथमतः आपण उठून त्यास आदरपूर्वक " या बसा " म्हणावें. कोणत्याही सार्वजनिक ठिकाणीं वडील व श्रेष्ठ माणसें यांना उत्थापन देऊन त्यांच्या बसण्याची सोय पाहून मग आपण बसावें. कोणाच्याही एकांत बसण्याच्या जागीं त्याला अगोदर सूचना दिल्याशिवाय एकदम आंत जाऊं नये.

(६) भाषेंत, पाहण्यांत, पोषाखांत व चालण्यांत किंचितही उर्मटपणा असूं देऊं नये. उर्मटपणाच्या योगानें आपण इतरांस हटकून अप्रिय होतों. व कोणी आपला मान तर ठेवीत नाहींतच; पण तिटकारा मात्र करूं लागतात.

(७) [illegible] [illegible]ण्या, करारिपणा, आणि भाषामाधुर्य [illegible]ा सभ्यपणाचीं खरीं खरीं लक्षणें आहेत. दुसऱ्याच्या [illegible]शीं आपलें मत जुळत नाहीं असें त्याला सांगतांना [illegible] दुसऱ्याचें कांहीं म्हणणें नाकारतांना केव्हांही कठोर [illegible]किंवा तुसडेपणाची भाषा योजूं नये.

(८) कोणाच्याही धार्मिक समजूतीची थट्टा क[illegible] [illegible]ं, आणि धर्म विषयावर भाषण करतांना हटवादीप[illegible] [illegible]किंवा पाखंडीपणा आपल्या भाषणांत आणूं नये.

(९) कितीही सलगीचा मनुष्य असला तरी चार-चौघांत एकदम जाऊन त्याच्या गळ्यास मिठी मारणें, किंवा गोप्या, हसन्या, गण्या, नाऱ्या अशा क्षुद्र पद्धतीनें त्याच्या नांवाचा उच्चार करणें हें अगदीं पोरकटपणांत [illegible]णलें जातें. सबब असें करूं नये.

(१०) सभ्यपणानें वागण्याची पद्धत घरीं दारीं एकच असली पाहिजे. घरच्या चाकर माणसाशीं जो उद्धटपणानें किंवा हलकटपणानें वागतो त्याची ती संवय चारचौघांत त्यास फार नडते.

(११) नीट नेटका व स्वच्छ पोषाक व शुद्ध आचरण असलें म्हणजे कोणांही चारचौघांत आपण गेलों असतां आपण कधीं अप्रिय होत नाहीं. लोकांत आपल्या अंगच्या गुणांचा आदर होण्यास या गोष्टी अवश्य असल्या पाहिजेत.

(१२) नेहमींच्या भाषणांत आवेश आणि हावभाव अगदीं आणूं नयेत. डोळे मोडणें, मान वांकडी करणें, हातवारे करणें, नाक, गाल, ओंठ वगैरे मुरडणें या गोष्टी

साध्या भाषणांत केवळ नाटकी व असभ्य समजल्या जातात म्हणून त्या करूं नयेत.

(१३) खोकणें, शिंकणें, खाकरणें, नखेंखाणें, दांत कोरणें, डोकें अगर इतर अवयव खाजवणें इत्यादि प्रकार होत। होईल तितकें करून चारचौघांत व आपल्या वरिष्ठा देखत करूं नयेत. कारण इतरांना ते फारच किळसवाणें वाटतात.

जहांगीरनें विद्यार्थ्यांकरितां केलेले नियम.

प्रसिद्ध मोंगल बादशाहा जहांगीर यानें आपल्याजवळ कांहीं विद्यार्थी ठेविले होते. त्यांच्याकरितां त्यानें खालील नियम करून दिले होते.

(१) वेळ अत्यंत महत्वाचा आहे. विद्यार्थी दशेंतील एकेक निमिष, रत्नापेक्षां अधिक किंमतीचें आहे. तें फुकट जाणार नाहीं, अशी प्रत्येक विद्यार्थ्यानें काळजी घेतली पाहिजे.

(२) प्रत्येक कार्य करतेवेळीं आपणावर सर्व शक्तिमान परमेश्वराची नजर आहे, हें लक्षांत ठेवून तें करावें.

(३) दयामय परमेश्वराचा आश्रय आपणास आहे, तो आपली केव्हांही उपेक्षा करणार नाहीं, असा विश्वास बाळगून प्रत्येक कार्य दक्षतेनें करावें. केव्हांही निराश होऊं नये.

(४) ज्ञान ही परमेश्वराची साक्ष पटवून देणारी शक्ति आहे, म्हणजे याच शक्तीनें मनुष्यास परमेश्वराची ओळख पटते. यासाठीं प्रत्येकानें आमरण ज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न करावा.

(५) जगांत चाललेले सृष्टीचे व्यापार ही ईश्वराचीच सत्ता होय, हें केव्हांही न विसरतां सृष्टिचमत्काराचें अवलोकन करावें.

(६) प्रत्येकानें आपल्या मनोवृत्ति आपल्या ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. ज्याच्या मनोवृति ताब्यांत नाहींत, त्याच्यांत व पशूंत कांहीं फरक नाहीं.

(७) रात्रीं निजते वेळीं ज्या दयामय ईश्वराच्या कृपेनें तो दिवस गेला, त्या परमेश्वराची प्रार्थना करून त्याच्याजवळ कृतज्ञता व्यक्त करावी. व दुसऱ्या दिवशीं उठल्याबरोबर तो दिवस चांगला जावा म्हणून ईश्वराची करुणा भाकावी.

ईसापाचा आपल्या मुलास उपदेश.

(१) मुला, परमेश्वराची भक्ति करणें ती मनापासून व पूज्यभाव मनांत धरून करावी. त्यांत ढोंगीपणा किंवा बतावणी अगदीं नसावींत. देव सत्य, सर्वज्ञ आणि सर्व शक्तिमान् आहे.

(२)अगदीं अंतस्थ असे जे आपले विचार व कृत्यें तींही नेहमीं शुद्ध राखण्याविषयीं काळजी घे. कारण तीं जरी

मनुष्याला समजलीं नाहींत. तरी सर्वज्ञ जो परमेश्वर त्याला तीं दिसतातच दिसतात.

(३) राजे, राजपुत्र व अधिकारी लोक यांजविषयीं फार आदर बाळगावा. कारण ते अपराध्यांस दंड करितात. व निरपराध्यांचें त्यांजपासून संरक्षण करितात.

(४) आपल्या मुलांनीं आपल्याला जो मान द्यावा असें तुला वाटतें तोच मान तूं आपल्या आईबापांना देत जा.

(५) चांगल्या संगतींत आनंद मानावा. कारण त्या संगतीचें अनुकरण केल्यास कल्याणच होतें.

(६) रोज सकाळीं उठून आपल्या कामाला लागावें. चांगल्या गोष्टी तेवढ्या शिकाव्या. लोकांवर उपकार करावे. या तीन गोष्टी केल्या असतां आपणास पश्चात्ताप कधींही शिवत नाहीं.

(७) चैनीपणा, आधाशीपणा, त्याचप्रमाणें दारुबाजपणा या गोष्टींचा आपणास स्पर्श देखील होऊं देऊं नकोस. कारण दारूपासून फार अनर्थ होतात.

(८) आपण आपलें काम करावें. दुसऱ्याच्या कामांत विनाकारण पडूं नये. कोणाची निंदा करूं नये, आणि दुसऱ्यांनीं कोणाची निंदा केली तर ती ऐकूं नये. कारण निंदा ऐकण्याची संवय ज्यास लागली त्यास तोंडानें निंदा करण्याची संवय लागणारच.

(९) ज्याचें म्हणून आपल्या हातून बरें होईल त्याचे बरें करीत असावें. ज्याचें बरें करणें आपल्याला शक्य नसेल त्याचें कांहीं वाईट तरी करूं नये.

(१०) आपली सद्सद्विवेकबुद्धि आपणास सांगेल त्याप्रमाणें तूं वागलास म्हणजे तुला कशाची ही काळजी नको.

(११) जोंपर्यंत जगांत कांहीं शिकण्याजोगें म्हणून शिल्लक आहे तोंपर्यंत तूं आपला शिकत जा. कधीं आळस करूं नकोस. पैशापेक्षां चांगल्या उपदेशाची किंमत फार अधीक आहे. हें ध्यानांत धर.

(१२) आपल्या शेताप्रमाणेंच आपल्या मनाचीही मशागत केली पाहिजे. कारण मनाची शुद्धता जसजशी वाढत जाते तसतसा आपणास दैविकपणा येत जातो. तीं जसजशी कमी होते तसतसें पशुत्व अंगीं जडत जातें.

(१३) दुर्गुणी नसणें हा सद्गुणच आहे.

(१४) हेतु चांगला धरावा. चांगल्या उपदेशाचा आदरानें स्वीकार करावा.

(१५) वाईट स्थिति आली म्हणून खेद करूं नये. चांगली स्थिति आली म्हणून गर्व वाहूं नये. कारण बदल हा सर्व गोष्टींत (रहाटगाडग्याप्रमाणें) होतच असतो.

भर्तृहरी.

प्राचीन काळीं आपल्या या भरतखंडांत जीं पुरुषरत्नें होऊन गेलीं त्यांपैकींच भर्तृहरी हें एक होय. भर्तृ-

हरी हा राजा असून मोठा विद्वान् व कवि होता. त्यानें पुष्कळ काव्यग्रंथ लिहिले होते. पण ते बहुतेक नाहींतसे झाले आहेत. शृंगार, नीति आणि वैराग्य या नांवांचीं त्यानें केलेलीं तीन शतकें फार प्रसिद्ध आहेत. त्याचे "नीतिशतका" पैकीं कांहीं उतारे पुढें दिले आहेत. त्यांवरून पुष्कळ नीतिबोध घेण्यासारखा आहे.

(१). बाहुभूषणें, चंद्रासारखे प्रकाशित हार, स्नान, चंदन, पुष्पें, चांगले केश हे पुरुषांचे खरे अलंकार नव्हेत; संस्कारयुक्त अशी वाणी जवळ असली, तर ती एकटीच पुरुषास शोभा आणिते. इतर भूषणें नेहमीं झिजतात, वाणी हें मात्र खरें भूषण होय.

(२). विद्या हेंच मनुष्याचें उत्तम सौंदर्य होय. विद्या हेंच सुरक्षित धन, विद्या उपभोग देणारी, कीर्ति करणारी, सुख करणारी, विद्या गुरूंचा गुरु, परदेशीं जाण्यास विद्या हाच मित्र होय. विद्या मोठी देवता होय, विद्येचा मान राजांमध्यें सुद्धां होतो, धनाचा होत नाहीं. विद्याहीन मनुष्य केवळ पशु होय.

(३). विघ्नें येतील म्हणून हलके लोक काम आरंभीतच नाहींत, मध्यम असतात ते विघ्नें आलीं म्हणजे सोडून देतात, उत्तम असतात ते विघ्नें पुनः पुनः आलीं तरी आरंभिलेलें कार्य सोडीत नाहींत.

(४). दान, उपभोग, नाश ह्या धनाच्या तीन अवस्था आहेत. जो देत नाहीं, व उपभोगही घेत नाहीं, त्याच्या धनाची तिसरी अवस्था होते.

(५). सकाळच्या सावलीप्रमाणें मोठी, व मग कमी

होत जाणारी अशी दुष्टांची मैत्री असते. सज्जनांची मैत्री संध्याकाळच्या सावलीप्रमाणें पहिल्यानें कमी, व मग वाढत जाणारी अशी असते.

(६). सत्संगाची इच्छा, दुसऱ्यांच्या गुणांवर प्रीति, गुरुजनांविषयीं नम्रता, विद्येचें व्यसन, लोकापवादाचें भय, ईश्वरावर भक्ति, मनाचा निग्रह करण्याविषयीं शक्ति, कुसंगतीचा त्याग, हे निर्मळ गुण ज्यांचे ठायीं वास करितात, त्या पुरुषांस नमस्कार असो.

(७). विपत्तींत धैर्य, भरभराटीच्या वेळेस क्षमा, सभेमध्यें वाक्पटुत्व, युद्धांत पराक्रम, कीर्तीची आवड, विद्येचें व्यसन, हीं मोठ्यांच्या अंगीं स्वभावसिद्ध असतात.

(८). गुप्तपणें दान करणें. कोणी घरीं आला असतां आदरसत्कार करणें, दुसऱ्याचें बरें केलें तरी त्याची वाच्यता न करणें, आपल्यावर कोणीं उपकार केला तर तो मात्र चौघांत सांगणें, लक्ष्मी असतांही गर्व नसणें, दुसऱ्याची वाईट गोष्ट न बोलणें, हें तरवारीच्या धारेसारखें तीव्र व्रत साधूंस कोणीं सांगितलें. ?

(९). हस्ताच्या ठायीं दातृत्व, शिराच्या ठायीं थोरांविषयीं नम्रता, मुखामध्यें सत्य भाषण, बाहूंमध्यें मोठा पराक्रम, अंतःकरणांत स्वस्थता, कर्णांनीं शास्त्रश्रवण, हीं, संपत्तीशिवाय स्वभावतःच जे मोठे आहेत, त्यांचीं भूषणें होत.

(१०). तापलेल्या लोखंडावर पाणी पडलें तर त्याचा मागमूस देखील राहात नाहीं. तेंच कमलपत्रावर पडलें तर मोत्यासारखें शोभतें. स्वाती नक्षत्राच्या वेळेस

समुद्रांत शिंपांमध्यें पडलें तर तेंच मोतीं बनतें. यावरून असें दिसतें कीं, उत्तम, मध्यम, कनिष्ट हे गुण संगतीच्या योगानें उत्पन्न होतात.

(११). लवून उंच होतात, दुसऱ्यांच्या गुणांचें वर्णन करून आपले गुण प्रसिद्ध करितात, दुसऱ्यांसाठीं अनेक प्रकारचे यत्न करून स्वार्थ साधितात, न बोलतां सहन करून निंदायुक्त कठोर भाषण करणाऱ्या दुष्टांस दोष लावितात, अशा साधूंचें आचरण आश्चर्यकारक होय. हे जगांत कोणास पूज्य नाहींत ?

(१२). फळें आलीं म्हणजे वृक्ष लवतात. पाण्याच्या योगानें ढग लोंबूं लागतात, सत्पुरुष समृद्धीनें नम्र होतात. तस्मात् परोपकारी जे आहेत, त्यांचा नम्रपणा हा स्वभावच आहे.

(१३). कान, शास्त्रश्रवण केल्यानेंच शोभतो. भिकबाळीनें शोभत नाहीं. दानानें हात शोभतो, कड्यानें शोभत नाहीं. कृपाळू मनुष्याचें शरीर परोपकाराच्या योगानें शोभतें, उटीनें शोभत नाहीं.

(१४) लोभ सोडून दे, क्षमा धारण कर, उन्मत्तपणा टाक, पापवासना धरूं नको, खरें बोल, साधूंच्या मार्गाचें अनुकरण कर, विद्वानांची सेवा कर, मान देण्यास योग्य असतील त्यांस मान दे, शत्रूंवर कृपा कर, आपल्या अंगचे गुण वर्णूं नको, कीर्तीचें रक्षण कर, दुःखितांवर दया कर, हें सर्व सज्जनांचें आचरण आहे.

(१५). ज्यांचीं मनें, वाणी, शरीर हीं पुण्यरूप अमृतानें भरलीं आहेत, जगावर शेंकडों उपकार करणारे,

दुसऱ्याचा लेशमात्र गुण पर्वतासारखा करून अंतःकरणांत आनंद पावणारे असे कित्येक सज्जन आहेत.

(१६). कधीं भूमीवर निजतो, कधीं पलंगावरही पडतो, कधीं घोंगडी पांघरतो, कधीं उंची वस्त्रें वापरितो, कधीं भाजी खाऊन राहतो, कधीं शाल्योदन भक्षण करितो कार्यसिद्धीविषयीं उत्सुक असा शहाणा मनुष्य सुख किंवा दुःख यांस मोजीत नाहीं.

(१७). ऐश्वर्याचें भूषण सौजन्य, शौर्याचें भूषण वाक्संयम, ज्ञानाचें भूषण शांति, विद्येचें भूषण विनय, द्रव्याचें भूषण सत्पात्रीं व्यय, तपाचें भूषण अक्रोध, समर्थाचें भूषण क्षमा, धर्माचें भूषण निष्कपटपणा, सर्वांचें कारण सुस्वभाव आहे. सुस्वभाव हाच उत्तम अलंकार होय. ही गोष्ट सर्वांस लागूं आहे.

(१८). कोणी निंदा करोत. किंवा स्तुति करोत.लक्ष्मी येवो किंवा जावो, मरण आज येवो किंवा दुसऱ्या युगीं येवो,न्याय मार्गापासून शहाणे लोक पाऊल हालवीत नाहींत.

(१९). झाड तोडलें तरी पुनः फुटतें, चंद्र क्षीण झाला तरी पुनः वाढतो, असा विचार करून सज्जन लोक विपत्ति आली तरी दुःखी होत नाहींत.

(२०). अप्रिय भाषणाविषयीं दरिद्री, प्रियवचनाविषयीं संपन्न, परनिंदेपासून निवृत्त अशा पुरुषांच्या योगानें पृथ्वी कोठें कोठें भूषित आहे.

(२१). मशाल खालीं केली तरी अग्निज्वाळा वर यावयाच्याच, त्याप्रमाणेंच धैर्यवानास कितीही विपत्ति आल्या तरी, त्याचें धैर्य नाहींसें व्हावयाचें नाहीं.

(२२). सज्जनांचा परिचय करावा. त्यांनीं उपदेश केला नाहीं तरी हरकत नाहीं. त्यांचें सहज भाषण हेंच शास्त्र होय.

(२३). उंच पर्वताच्या शिखरावरून खडकांवर आपटून शरीर मोठमोठ्या दगडांनीं फुटलेलें बरें, तसेंच तीव्र आहेत दांत ज्याचे, अशा सर्पाच्या मुखांतही हात घातलेला बरा, तशी अग्नीमध्यें उडी टाकलेली बरी, तथापि सदाचार सोडणें ठीक नाहीं.

मज भणगाला वरदा । वर जरि करुणा करूनि देशील ।
तरि मानवती सज्जन मनें जयाला असेंचि देशील ॥

मोरोपंत.

समाप्त.

नीतिमार्गप्रदीप पुस्तक २ रें
यांतील कठीण शब्दांचे अर्थ.

नीति—सदाचार

घडा १

परिपोष—वाढ
निर्दालन—नाहींसें करणें
सुजनत्व—सज्जनपणा
मौन—गप्प बसणें
शम—शांतपणा
श्रुत—विद्या
दातृत्व—उदारपणा
निर्दंभता—दांभिकपणा नसणें
सच्छील(सत्+शील)चांगलें शील
तत्वता—खरोखर

घडा २

मोदभरें—आनंदानें
उद्वेग—दुःख
गौणपक्ष—कमीपक्ष
रज्जु दोरी

घडा ३

शाश्वत—निरंतर
चिकित्सक—शोधक
परिपक्क—दृढ
प्रगल्भ—प्रौढ
अगाध—खाल
व्यापकता—विस्तृतपणा
प्राविण्य—निपुणपणा
निदान—कारण
वाङ्मय—प्रौढ ग्रंथ
साहित्यशास्त्र—काव्यशास्त्र
करतलम लवत्–तळहातावरील मळासारखे
व्यग्र—चिंताग्रस्त
मंचक—पलंग

घडा ४

मंडन—समर्थन
खंडन—खोडून काढणें
सदसद्विवेक बुद्धि—चांगलें कोणतें वाईट कोणतें हें सुचविणारी बुद्धि
तत्त्ववेत्ता—मूळ जाणणारा

घडा ५

बोखटा—वाईट
कांजा— मांठ
प्रसवति—जन्म देते
सुनृता —सत्य व प्रिय

घडा ६

कृतकर्म—केलेलें काम
सर्वश्रुत—सर्वास माहीत
ओपी—घाली

घडा ७

आत्मशिक्षण—स्वतःचें शिक्षण
तत्त्वज्ञानात्मक-मूळगोष्टींचें ज्ञान करून देणारें
गुरुत्वाकर्षण—मोठ्या पदार्थानं धा० पदार्थ आपल्याकडे ओढणें

यावचंद्रऽदिवाकरौ—जोंऽपर्यंत [चंद्र आणि सूर्य आहेत तोंपर्यंत

वैगुण्य—कमीपणा

निसर्गानें—परमेश्वरानें

घडा ८

मार्दव—मृदुपणा

विपन्नावस्था—संकट अवस्था

घडा ९

शातिपंकेरुहाचें—कमळाच्या जातीचें

शैल—डोंगर

धाकेना—भीत नाहीं

नियमन—नियमबद्ध केलेलें

अष्टपैलुदार—आठबाजू असलेला

सह्य—सोसण्यालायख

घडा १०

अपरिपक्व—कच्ची

भिक्षांदेहि—मधुकरी मागणें

प्रसंगोपात—वेळ पडल्यास

रासायनिक—रसायनसंबंधीं

सोपपत्तिक—उपपत्तीसह

घडा ११

ग्रहणशक्ति—शिकलेलें मनांत ठेवण्याची पात्रता

मनोरम—मनाला रमविणारें

वैचित्र्य—निरनिराळेपणा

घडा १२.

शाद्बिक—शद्बाची

हृदयद्रावक—अंत:करणाला कळवळा आणणारी

नयनशस्यभूत—डोळ्यांत कुसळाप्रमाणें सलणारीं

सत्पथ—चांगला मार्ग

ईश्वरदत्त—(साधनें):–परमेश्वरानें उत्पन्न केलेलीं फुलें, फळें, पाणी, गवत, जागा वगैरे पदार्थ

सिंचन—शिंपडणें

डेक—गलबतावरचा मजला

अर्थशास्त्र—संपत्तिशास्त्र

घडा १३

संस्कारयुक्त—शिक्षणयुक्त

गुरुजन—वडील माणसें

वाक्पटुत्व—बोलण्याचें चातुर्य

स्वभावसिद्ध—स्वाभाविकपणें

वाच्यता—गवगवा

शाल्योदन—पक्वान्न

वाक्संयम—असत्य न बोलणें

निवृत्त—परतलेला

परिचय—सहवास

भणग—भिकारी

वरदा—हे वर देणाऱ्या

वर—इच्छित गोष्ट

मानवात—मनापासून चाहतात

शुद्धिपत्र

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
६	१०।११	मनुष्यार्शी	मनुष्यार्शी
७	शेवटची	अजच	आजच
१३	३	वधुप्रेम	बंधुप्रेम
१३	२३	पूज्यबुद्ध	पूज्यबुद्धि
२६	शेवटची	ग्रथ	ग्रंथ
३४	"	म्हणला	म्हणाला
३८	१९	सापी	सोपी
५१	१९	ज्ञाना	ज्ञान
५५	१९	त्यांन	त्यानें
५६	५	वैपुण्य	वैगुण्य
५७	१	बागदा	बोगदा
५८	१४	म्हणाली	म्हणाला
६३	७	सकटाच्या	संकटाच्या
८३	शेवटची	मान	भास
९१	७	गेले.	गेले,
९६	१९	इसानीर्तीतील	इसापनीर्तीतील
९९	२१	सांत्विक	सात्त्विक
१०२	२	असतांही	नसतांही
१०२	२	रटेला	स्टेला
१०६	१६	भला	मला